म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्रं/235/9
मंत्रालय





महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती
मंडळाचे प्रकाशन

# तेरा पोवाडे

शाहीर- मा. आ. हळबे. सातारा.

# तेरा ऐतिहासिक पोवाडे

महाराष्ट्र शाहीर

श्री. मा. आ. हळबे सातारा.

दिनांक २१-४-८४

*

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ,
मंत्रालय, मुंबई

किंमत रुपये ७-५०

मुखपृष्ठ–
चंद्रशेखर हडप सातारा.

❋

मुखपृष्ठ छपाई–
नॅशनल प्रिंटींग प्रेस,
सातारा.

❋

मुद्रक व्ही. वी. गुरव–
सरस्वती मुद्रणालय,
२७६ मंगळवार पेठ, सातारा २

## दे. भ. पद्मश्री बाबुराव गोखले, कराड

### भाषणाचा सारांश

यंदाच्या वर्षी माझे स्नेहांकित श्री. मारुतराव आत्माराम तथा तात्यासाहेब हळबे यांचे पोवाडयांचे पुस्तक महाराष्ट्र शासनाच्या कृपाप्रसादाने प्रसिद्ध होत आहे. यात स्वत: हळबे यांचा व त्यांचे पोवाडयांचा गौरव आहे. त्याच प्रमाणे शासनाचे गुणग्रहणही आहेच. श्री. हळब्यांनी आजवर कित्येक पोवाडे केले त्यातल्या निवडक पोवाडयांचा समावेश सदर पुस्तकात असून, त्यातले कॉंग्रेसच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने काही प्रसिद्ध होते इतकेच नव्हे तर त्या निमित्ताने, सातारा जिल्ह्याचा राजकीय इतिहास जो "जागृत सातारा" या नावाने प्रसिद्ध झाला त्यात श्री. हळबे शाहिरांच्या पोवाडयांची कामगिरी अशी नमूद केली आहे की, "१९३० च्या कायदे भंगाच्या प्रचाराचे काम त्यावेळी पोवाडयाच्या साधनानें फार चांगले झाले." झाशीची राणी व महात्मा गांधी यांचे पोवाडे वडगावची लढाई बाबू गेनू व कॉंग्रेसचा पोवाडा असे त्यांचे पोवाडे जनजागृतीस कारण झाले. श्री. हळब्यांच्या पोवाडयांची ही ऐतिहासिक कामगिरी लक्षात घेता त्यांचे हे पोवाडयांचे पुस्तक मराठीच्या जामदारखान्यात जाणे आवश्यक आहे.

ऐतिहासिक पोवाडा सातारा जिल्ह्यात तरी तरुणांना उठाव देण्याच्या ईर्ष्येने अवतरला. हे हळब्यांच्या पोवाडयाला भाग्य लाभले आहे. आता त्यांचे पोवाडे पुस्तक रूपाने फिरून ऐकदा लोकाहाती पडत आहे. तेंव्हा त्यांचा अपूर्व ठेवा त्याना लाभणारच यात काहींच शंका नाही.

# अनुक्रमणिका

## १३ पोवाडयांची नावे


| | | |
|---|---|---|
| १ | श्री समर्थांचा | १ |
| २ | शहाजीची सुटका | ८ |
| ३ | लोकमान्य टिळक | १४ |
| ४ | महात्मा गांधी | २२ |
| ५ | छत्रपती राजाराम | ३६ |
| ६ | कल्याण खजिना | ४३ |
| ७ | झाशीची राणी लक्ष्मीबाई | ४९ |
| ८ | हुतात्मा बाबू गेनू | ६१ |
| ९ | लेखणी तलवार भांडण | ६६ |
| १० | दारूबंदी पोवाडा | ६९ |
| ११ | बेचाळीसचे चळवळीचा | ७४ |
| १२ | वडगांव लढाई (इंग्रजांचा पराभव) | ८० |
| १३ | कॉंग्रेसचा पोवाडा | ९० |

# निवेदन

इतर सर्व साहित्य प्रकाराप्रमाणेच लोकसाहित्याचेही जतन करणे व ते प्रसिद्ध करणे हेही साहित्य संस्कृती मंडळाच्या अनेक कार्यापैकी एक आहे. त्यामुळेच पोवाडे, लावण्या, लोकगीते इत्यादीही मंडळ प्रकाशित करते. याच कार्याचा एक भाग म्हणून शाहीर मारुती आत्माराम हळबे यांचा "पोवाडा संग्रह" मंडळ प्रसिद्ध करीत आहे.

प्रस्तुत पोवाडा संग्रहाचे लेखक देशभक्त श्रीयुत मारुती आत्माराम हळबे हे जवळजवळ ८० वर्षे वयाचे आहेत व ते सातारा शहराचे सन्मानिनीय नागरीक आहेत. त्यांनी असह–कारिता कायदेभंग युगांत ...... म्हणजे ४०–५० वर्षांपूर्वी रुळलेला मार्ग सोडून स्वातंत्र्य युद्धांतील एक सैनिक म्हणून महनीय कामगिरी केली. तिची माहिती दक्षिण महाराष्ट्रातील पुष्कळांना आहे व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनानेहि त्यांना स्वातंत्र्य सैनिक पुरस्कार आणि निवृत्त वेतन दिले आहे. घरची अत्यंत गरिबी असताना त्यांनी वयाच्या १५।१६ व्या वर्षी वडिलांना न विचारता कॉंग्रेसच्या आदेशाला अनुसरून सरकार–मान्य शाळा सोडली व वरिष्ठ स्थानिक देशभक्तानी समवृत्तीच्या तरूणांसाठी राष्ट्रीय शाळा सुरू केली. त्यात नाव दाखल करून ते काही वर्षांनी टिळक विद्यापीठाची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले स्वतःच्या व कुटुंबीयांच्या पोटापाण्याचा प्रश्न बरीच वर्षे अधांतरी राहिला. पण नंतर श्री. अप्पासाहेब चिरमुळे यांनी

सातारा येथेच स्वत: सुरू केलेल्या व नावारुपाला आणलेल्या वेस्टर्न इंडिया विमा कंपनीत त्यांना नोकरी दिली आणि श्री. हळब्यांच्या तुरूंगाच्या खेपा चालूच होत्या त्यांच्यामुळे नोकरीत खंड पडत असे त्याचीही वारंवार माफी केली. योग्य वेळी ते निवृत्त झाले त्याला आता २०।२५ वर्षे झाली आहेत व वयपरत्वे शरीर दौर्बल्याने मात केली आहे. पण ऐन उमेदीच्या वयामध्ये त्यांनी राष्ट्रधुरीणांनी दिलेल्या हाकांना ओ देऊन पुष्कळ महनीय कामगिरी केली आहे. त्याकाळी प्रचलित झालेल्या प्रभातफेऱ्या, ग्रामसभा, वैयक्तिक व सामुदायिक कायदेभंग व राष्ट्रीयकार्याचा प्रचार यांत अहमहनिकेने त्यांनी भाग घेतला होता व या स्वातंत्र्य युद्धातील एक अत्यंत प्रभावी शस्त्र म्हणून स्वत: पोवाडे रचून गावोगावच्या बैठकीत आपल्या त्यावेळच्या भरदार आवाजात व डफ तुणतुणे आदि वाद्यांच्या साथीत ह्या व इतर पोवाड्यांचे गान वर्षानुवर्षे करीत राहिले. ह्यांच्या जोडीला श्री. एकबोटे नावाचेही शाहीर या कार्यात मग्न होते. दिवसा कार्यालयात काम व रात्री गावोगावी पोवाडे गायन असा कार्यक्रम ८।१० वर्षे तरी चालू होता व तो ऐकणाराला हे पोवाडे आपल्या ऐतिहासिक श्रेष्ठ पुरूषांच्या तसेच समकालीन पुढाऱ्यांच्या कर्तबगारीची नीट ओळख करून देऊन स्वत: हि राष्ट्रकार्यात भाग घेऊन इतरासही प्रवृत्त करत असत. अशा रीतीने शाहीर हळबे यांनी गतकाळामध्ये महनीय कामगिरी केली आहे, राष्ट्र जागृतीचे कामी बरीच साधना केलो आहे यांची नोंद अवश्य घेतली पाहिजे. या पुस्तकाचे मुद्रणामुळे त्यांच्या स्वराज्य संग्रामांतील कार्याची जाणीव लोकांत थोडी फार राहील व समाजाने त्यांचे ऋण थोडे फार फेडले असे श्रेयहि मिळेल.

शाहीर हळबे यांचे पोवाडे साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध होत आहेत ही फार आनंदाची गोष्ट आहे.

**सुरेंद्र बारलिंगे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
संकृती मंडळ

**यशोधन,**
मुंबई–४०० ०२०,
दिनांक–२ एप्रील, १९८४
(गुडीपाडवा)

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
मंत्रालय.

# अभिप्राय

## इतिहासाचार्य डॉ. ग. ह. उर्फ तात्यासाहेब खरे

इतिहास साधनात पोवाड्यास जे स्थान आहे त्याचा विचार करता प्रस्तुतचे पोवाडे ठीकच आहेत. पोवाड्यातील प्रत्येक शब्द नि शब्द इतिहास पूरित असेलच असे नाही. त्यात काव्य छटा येतच राहणार. तथापि श्री. हळबे यानी आपले पोवाडे शक्य तितके इतिहासाला धरुन लिहिले आहेत, पोवाड्यांचा मुख्य उद्देश सर्व सामान्य व्यक्तीत उत्तम कार्य करण्या विषयी स्फुरण यावे हा असतो. हा हेतू श्री. हळबे यांच्या पोवाड्यानी शक्य तितका अधिक साधु शकेल अशी माझी कल्पना आहे. यातील कांही पोवाड्यांचा भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या चळवळीत मराठी जनतेत तरी उपयोग झाला आहे. आणि अजूनही या पोवाड्यांचा स्फूर्ति उत्पन्न करण्यास उपयोग होईल. महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाने हे पोवाडे प्रकाशित करण्याचे योजिले आहे हे ठीकच आहे श्री. मा. आ. हळबे शाहीर यांचे मी अभिनंदन करतो.

# त्रयोदशाक्षरी

| श्री समर्थ | छ. शिवाजी | लो. टिळक | म. गांधी |
|---|---|---|---|
| श्री | हि | स्व | स |
| रा | द | रा | त्य |
| म | वी | ज्य | अ |
| ज | स्व | मा | हिं |
| य | रा | झा | सा |
| रा | ज्य | ज | मा |
| म | सं | न्म | र्गा |
| ज | स्था | सि | ने |
| य | प | द्ध | स्व |
| ज | क | ह | रा |
| य | शि | क्क | ज्य |
| रा | वा | आ | प्रा |
| म | जी | हे | प्ती |
| १३ | १३ | १३ | १३ |

# शाहिराचे दोन शब्द

मला पोवाड्याची स्फूर्ती कै. रामभाऊ दळवी शाहीर, खेड यांच्या पोवाड्यामुळे मिळाली. माझा पहिला पोवाडा "छत्रपती राजाराम महाराज हा सर्वांना फार आवडला. माझे गुरुजी कै. नाथ घाणेकर यानी त्याबद्दल माझी पाठ थोपटली कै. शिवरामपंत परांजपे यांनी उत्तम पोवाडा अशी शिफारस केली. केसरीतही चांगला अभिप्राय आला. त्यामुळे आणखी पोवाडे रचण्यास मला स्फूर्ती मिळाली. कॉंग्रेसच्या पोवाड्याला तर महाराष्ट्र प्र. कॉंग्रेसने सुवर्ण पदक देऊन जाहीर सत्कार केला दारुबंदी पोवाड्याला कै. बाळासाहेब खेरानी रु. २५ पंचवीस बक्षीस दिले १९३२ च्या तुरुंग वासात सक्त मजुरी शिक्षा असलेमुळे चोरुन शिशाचा तुकडा मिळाला व त्याने झाशीच्या राणीचा पोवाडा लिहिला व चोरुन बाहेर आणला. असहकार कायदेभंगाच्या संदर्भात आमच्या पोवाड्याने चांगली कामगिरी बजावल्याचे अनेक मान्यवर व्यक्तींनी केसरी समर्थ सारख्या वृत्तपत्रानीही त्याला दुजाराच दिला आहे. समर्थाने तर स्फूट लिहून गौरव केला आहे. तो संदर्भ आता उरला नाही हे खरे पण एकाकाळी अत्यंत प्रभावी ठरलेला हा ठेवा उजेडात आणणे जरुरीचे होते व ते काम साहित्य संस्कृति मंडळाचे अध्यक्ष डॉ. सूरेंद्र वारलिंगे व डॉ. वा. ना. कुबेर व मंडळावरील इतर सहकारी यांनी याची उपयुक्तता जाणून मंडळामार्फत माझ्या तेरा पोवाड्याचे प्रसिद्धीकरण करण्याचे मान्य केले या बद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे या कामी मुख्यत: माझे एका वेळचे सहाध्यायी व आजन्म स्नेही श्री. श्री. न. जा. तथा दादासाहेब सप्रे यांनी या कामी जे परिश्रम घेतले त्याला मोलच नाही, दुसरे माझे परम स्नेही डॉ. ग. ह. तथा

तात्यासाहेब खरे कार्याध्यक्ष भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे यांनी या माझ्या पोवाड्याबद्दल जो उत्तम अभिप्राय पाठवला त्याबद्दल त्याचा व श्री. बाबुराव गोखले कराड यांनी वेळोवेळी जे प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्या दोघांचाही मी ऋणी आहे. समर्थांच्या पोवाड्याबद्दल तर समर्थांचा त्रिशताब्दी उत्सवाचा चहुकडे नगारा वाजत असताना तर चमत्कार असा झाला की, मला तीन वेळा " अंतर निनाद " झाला त्यात ऊठ स्वस्थ कां समर्थांच्या पोवाड्याचे लिखाण कर असा इशारा झाला मी खरोखरच अंथरुणावर उठून बसलो व समर्थांच्या पोवाड्याचे लिखाणाला लागलो एका दिवसात पोवाडा तयार झाला. सुदैवाने दे. भ. श्री बाबुराव गोखले घरी आले त्याना तो पोवाडा मी ऐकवला त्यांना आवडला. लगेच " सज्जनगड पत्रिकेत तो छापणेस पाठवला व सप्टेंबर १९८३च्या अंकात तो प्रसिद्ध झाला उ. संपादक श्री. चिंचोळकरांचेही त्याबद्दल मी आभारी आहे. श्री. बाबुरावांचे माझ्याकडे चांगले लक्ष आहे त्यानी "जागृत सातारा" या त्यांच्या पुस्तकातही माझ्याबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत.

दि. २२-११-८३ रोजी सातारा नगर पालिकेने ना. सुशिलकुमार शिंदे यांचे हस्ते मला शाल श्रीफल व नटराजाची मूर्ती देऊन सत्कार केला त्याबद्दल म्यु. अॅडमिस्ट्रेटर श्री. वैद्य व त्यांचे सल्लागार डॉ. पां. के. कोल्हटकर यांचे मी ऋणी आहे त्याचप्रमाणे डॉ. मा. द. वोकील अध्यक्ष सत्प्रवृती संशोधक मंडळ सातारा यानी मी त्यांचा सभासद असल्याने पुढाकार घेऊन हा सत्कार समारंभ व पोवाडे प्रकाशनाचे जे काम केले त्याबद्दल त्यांचे व चिटणीस श्री. एस्. व्ही. कुलकर्णी यांचे मन:पूर्वक आभार त्याच प्रमाणे मुद्रक सरस्वती मुद्रणालय यांचेही मी आभार मानतो.

मा. आ. हळबे

# * श्री समर्थ रामदास स्वामींचा पोवाडा *

## चौक १ ला

धन्य धन्य समर्थ रामदास। चिरंतन वास। सज्जनगडास। यात्रा वद्य नवमी माघ मासास। समाधि दर्शन मोदचित्तास। वाटे आत्मारामतनय शाहिरास ॥

श्रीराम प्रभू जन्मला। चैत्र नवमीला। दुपारी माध्यान्हिला। त्याच वेळि समर्थ आले जन्मास। रामोपासना त्यांचे वंशास। "रामफळ" जणू समर्थ रामदास ॥

आठवे वर्षि वडिल बंधूला। नारायण म्हणाला। उपासना मला। द्या असा हट्ट धरुनी बसला। रुसूनी देवळात जाऊनी निजला उठवुनी रामे मंत्र दिधला ॥

यशोदेनें पाहुनि कृष्णाला। लोण्याचा गोळा। घेऊनी खाल्ला। पळू लागता धरला गुलामास। उघड बघू तोंड म्हणे कृष्णास। पाहुनी चकित विश्वरुपास ॥

थेट तस्सा अनुभव आला। राणुबाईला। पाहुनि नारायणाला। म्हणे काय करतोस अंधारात। ऐका उत्तर दिले तोऱ्यात। चिंता विश्वाचि करितो चित्तांत ॥

द्विज जेव्हां वदले सावधान। ऐकुनि कोण। सावध होऊन पळाले फक्त रामदास। नाना पुरश्चरणें गोदातीरास। सूर्योपासना केलि नाशकास ॥

चाल :- १

तेरा कोटी राम नाम जपले। पुरश्चरण गायित्री केले ॥
बारा वर्षे तप तिथे केले। रविसम तेज प्रगटले ॥
ग्रंथांचे ज्ञान मिळवीले। वैराग्य शुकासम लाभले ॥
हरि कीर्तन निरुपण केले। कीर्तनीं लोक डुलवीले ॥

चाल :– २

पंचाग्नि साधने समर्थ "सोन्यासम" तळपले ।
वरि सूर्य खाली गोदेंत उभे तप असले ।
समर्थांचे पाय माशांनि पार कुरतडले ।
पाहुनि घोर तपश्चर्या चकित जन झाले ।
कृपादृष्टी रामरायाची, दर्शन घडले ।
रामाज्ञे तीर्थाटन पायीं त्यांनी सुरुं केले ।

चाल मोडते :–

आसेतु हिमाचल भ्रमण । तीर्थाटन करुन । उठले पेटून । अन्नाविण तडफडणारे पाहून । मंदिरे उध्वस्त गेली होऊन । हृदय समर्थांचे गेले पिळवटून ।।

## चौक २ रा

यवनांनी मूर्ती फोडिल्या । स्त्रिया भ्रष्टविल्या । ऐकूनी किंकाळ्या । यवन सेनेचा पाहुनि धुमाकूळ । हिंदूंचा केला अनन्वित छळ । अंतरी ज्वालामुखीचा लोळ ।।

यवनांनी हिंदु बाटवून । स्त्रिया पळवून । गायि कापून । हिंदू राजांच्या राण्या पळवून । मंदिरांच्या मशिदि केल्या पाहून । उठले तत्काळ समर्थ खडबडून ।।

प्राणिमात्र जाहले दुःखी । नाही कुणीं सुखी । निर्नायका । असे सूर चित्र पाहून । उदासी वृत्ती गेली होऊन । स्वराज्य मार्ग काढला शोधून ।।

चाल :– १

डोळ्यांची झोप उडाली । जलावीण जशी मासोळी ।:

चिंतेत समर्थ माऊलीं । कृष्णाकांठि होति बैसली ।।
दृष्टांत होता उडि घाली । अंगापुरी मूर्ती सांपडलीं ।।
मिरवीत मूर्ति आणिली । चाफळी स्थापना केली ।।
रघुवीर समर्थ आरोळी । महाराष्ट्रि त्यांनी घुमविली ।।
बलहीन जनाना पटली । 'हनुमान' मूर्ति महाबळी ।।

चाल :– २

रात्रीत आकरा मारुती केलि स्थापना ।।
गांवोगांवि घुमविती तरुण तालिमखाना ।।
बजरग बलीच्या तरुण करिति गर्जना ।।
बाराशे मठ स्थापुनि महंत योजना ।।
दासबोध ग्रंथाचे सतत चाले पारायणा ।।
क्रांतिकारि योगि सत्पुरुष भेटले शिवबाना ।।
इटलीस मॅझिनी इथे समर्थ राणा ।।
"यंग इटली" त्यांची, समर्थांची महंत संघटना ।।
"कुबडीत गुप्ती" तशी करा "गुप्त संघटना" ।।
फेकुनी टाळ, तलवार दाखवा यवनांना ।।
वाघाचे बच्चे तुम्ही भिता काय शत्रुना ।।
गवसले समुद्र-मंथनी अमृत देवांना ।।
स्वातंत्र्य अमृत गवसले समर्थ शिवबांना ।।
मिळविण्या मोक्ष घ्या "रामनाम" साधना ।।
राष्ट्राचा साधण्या मोक्ष करा नामी संघटना ।।

चाल मोडते :–

रामजन्म उत्सव सुरु केले । प्रभावित झाले । क्षात्र तेजें दिपले । रामोपासना महाराष्ट्रात । घरोघर गेली जन हृदयात । झळकू लागली तरुण रक्तांत ।।

## चौक ३ रा

राम राय देव देवांचा । ज्यांने रावणाचा । वध केला त्याचा। आदर्श समर्थांनी दिला शिवबास । भेट दोघांची चाफळ गांवास ! रामोपासना त्याच समयास ॥

जनशक्ती तोंड देण्याला । राज्य घेण्याला । सिद्ध शिवबाला । वानरसेना जशी रामास । मावळी सेना तशी शिवबास । हड्डि यवनांचि नरम करण्यास ॥

समर्थ शहाजि भेट नाशकाला । अंतरि मेळ जमला । कारवाई करण्याला । शिवबाला जोर त्यांने चढला । गडकोट किल्ले बांधण्याला । राष्ट्राची शक्ती वाढण्याला ॥

चाल :– १

सकळ जनांतरिचा देव । उठविला रिताना ठाव ॥
शोधला असा उपाव । जन हृदयि मिळाला वाव ॥
जेव्हां धर्म येतो धोक्यांत । राजशक्ति हवी हातांत ॥
शिवसमर्थ जोडि मिळाली । कृष्णार्जून ती वाटली ॥
रणभेरी त्यांची गर्जली । स्वराज्याचि यांचि आरोळी ॥
स्वप्राणबळें घुमविली । स्वातंत्र्य ज्योत फुलविली ॥
जनशक्ती तरारुनी उठली । जोडिच्या पाठि ठाकली ॥

चाल :– ३

समर्थांची तेजस्वी मूर्ती । तपे तळपती । बुद्धीवान अती । प्रभावित होती हो । जनता भोंवती ॥

समर्थांचि अमोघवाणी । चैतन्यखनी । ऐकुनी कर्णी । रंगली कीर्तनी हो । तरुण मंडळी ॥

इटालीचे स्वातंत्र्य उद्गाते । मॅझिनी होते । तसेच भारताचे । रामदास होते हो । शंका ना तिथे ।।

समर्थांची पुण्याई मोठी । प्रत्यक्ष राम म्हणति । "प्रसंग हा तडातडी । करा विवेक तातडी । उठा उठा करा क्रांति । लोकोद्धारासाठी हो । मी आहे पाठी" ।।

चाल :– २

सांगुनि गीता अर्जुना युद्धा उठविले
दासबोध सांगुनी (समर्थे) जना जागृत केले ।
रामांनी दुष्ट रावणाचे हनन केले ।
शिवबांनी औरंग्यासम कैक लोळविले ।
भवानीच्या कृपेने राज्य स्थापन केले ।
थाटात राज्यारोहण रायगडीं केले ।
जिजाईचे डोळे आनंद अश्रुनी भरले ।
"जाहले उदंड पाणि" समर्थ वदले ।
भवानिला "सुवर्ण पुष्प" त्यांनी वाहिले ।
"वाढवी तुझा तूं राजा" मागणें केले ।

**चौक ४ था**

समर्थ भक्त श्री. देव अलौकिक । मोठे संशोधक । ध्यास त्या एक । लावणे शोध "शिवथर घळिचा" । लागता वाटेहा शोधचि स्वर्गाचा । आनंद मावेना गगनि त्यांचा ।।

जिथें दासबोध गंगा अवतरली । भूमी, ती सगळी । पावन झाली । नाना साहेबानी स्वर्ग समजून । तेथ शिव समर्थांना वंदून । पवित्र मातीत घेतले लोळुन ।।

चाल :– ४

हिमगिरि शंकर करि हरि चिंतन । समर्थ प्रभु चिंतन तसें करि शिवथर घळि बैसून ॥

निसर्ग सुंदर त्याच घळीचे । "सुंदर मठ" म्हणून । समर्थें नांव दिले ठेऊन ॥

इथेंचि केली गुप्त खलबते । शिव समर्थ जोडिनं । बांधिले स्वराज्याचे तोरण ॥

चाल :– १

करा आधि प्रपंच नेटका । मग परमार्थाचे वीवेका ॥
दासबोध, क्रांतिकारी ग्रंथ । साधका आधार स्तंभ ॥
परमार्थ प्रपंच सांगड । कांहि संत म्हणती हे बंड
सांगडीचे समर्थ तत्वज्ञान । वाटे अंमृत जनाजीवन ॥
स्थापक वैद्य बाबुरावांना होति तळमळ ॥

चाल :– २

हा दीप स्तंभ घेऊन समर्थ मंडळ ।
मालखीचे दर्शन होता खूष जवाहरलाल ॥
त्रिशताद्बि उत्सवी केला हलकल्लोळ ।
त्यासाठी ख्यात श्री समर्थ सेवामंडळ ।
लाखोनि लोक लोटले घेण्या दर्शन ।
व्याख्यान, लेखनाद्वारे जनजागरण ।
कीर्तन, भजन आणि दासबोध पारायण ।
जन होति थक्क उत्सव थाट पाहून ।
उत्सवी भगवा शोभतो मोठ्या डौलाने

फडकविला तोच वैकुंठी रामदासानं ।
वैकुंठि लाविली ध्वजा रामदासानं ।
वैकुंठि भक्तिची ध्वजा लाविली त्यानं ।

चाल मोडली :–

महापुरुष योगि रामदास । महाराष्ट्रास । गुरु शिवबास । आत्म आणि क्षात्र तेज समयास । लाभले स्वतंत्र देश करण्यास । नमन शाहिरांचे समर्थ चरणास.

– समाप्त –

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२३५
९
मंत्रालय.

# शहाजीची सुटका

## चौक १ ला

शिवाजीचे बुद्धीचातुर्य । तसेच औदार्य । आणि रणि शौर्य त्रिगुणाने त्याने सर्व जगतास । दिपवुनि केले चकित लोकास । कीर्तीचा डंका भारत खंडास ॥

शिवाजीने आदिलशहास । चकविले त्यास । डाव निखालस । उलटला त्याचे अंगावर खास । काटशह दिला आदिलशहास । अचूक शिवबाची युक्ती समयास ॥

कल्याण खजिना लूटला । ऐकुन वार्तेला । शहा खवळला । शहाजी पाजी असे बोलत । खलिता खरडला त्याच रागांत । राग कां, हीत करी जगतांत ॥

बंदोबस्त करा पुत्राचा । नाहीतर त्याचा घात घेण्याचा । हुकुम सोडितो आम्हा सैन्यास । प्रांत उध्वस्त सर्व करण्यास । पश्चाताप होईल मग तुम्हास ॥

चाल १ : हे पत्र शहाचे जहरी । शहाजीचे टोचले अंतरी । शहाजी होता अधिकारी । शहा नुस्ता हो नामधारी । धाडिले पत्र दरबारी । ऐकत नाही सुत वैखरी ॥ खटपट केली आजवरी । निष्फळ जाहली सारी । धाडुनी फौज त्यावरी । करा परिपक्व सत्वरी ॥

चाल २ : दरबारि होते शहाजीचे भारि वजन, विजापुरी नव्हते हालत त्याविनापात्र, शहाजीचा पाहुन दरारा कापती यवन, दःखनी शहाजी दिल्लीस शहाजान, वर्चस्व शहाजीचे करी यवन अपमान, यवनात नसावा हिंदू असे बोलून, शहाजीची फूस

शिवबास असे सांगून, शहाजीचा करु लागले द्वेष ते खान, ऐकुनी शब्द हे शहा गेला खवळून, इतक्यात दूत पातला पत्र घेऊन ॥

चाल : आगीत तेल ओतता जाते भडकून । पायाची आग मस्तकी पत्र वाचून । आताच्या आता शहाजीस आणा पकडून शहाजीस आधी पकडता स्वत: शरण येईल हात जोडून ॥

**चौक २ रा**

तय्यार झाला पकडण्या मुस्तफखान । मदतीस खानाच्या बाजी गेला धाऊन । घरभेदा करितो वाटोळे समय पाहुन । सेवक होता शहाजीचा, कलिजा हृदयाचा । काळ परि झाला करणी वरतून ॥ तय्यार झाला देण्यास शहाजी पकडून । पोशीला सर्प शहाजीने दूध पाजून । उलट तो सर्प तो जाणे काय यजमान । नावाने होता जरी बाजी, ठरला परि पाजी, स्वामी घातकी देश दुश्मन ॥

चाल : १ एके दिवशीं बाजी शहाजीला । घेऊन आला गृहाला ॥ देऊनी थाप हो त्याला । भोजना यावे करण्याला ॥ अंतरी कपटी हेतूला । पकडणें शहाजी राजाला ॥

चाल : २ पकडुनि करिन मी खूष यवनराजाला । मिळ–वीन विपुल मग द्रव्य आणि मानाला । पकडूनी मग टोचून बोले शहाजीला । लाज ना वाटे देण्यास फूस लेकाली खातांना यवन-राजाचे तुम्ही अन्नाला । हा बेटा मात्र उलटून धनी पकडला । लोका सांगे ज्ञान आपण पाषाण झाला । शिवाजीस फूस कां होती कळले नाही त्याला । कळणार कसे या देशद्रोही कुत्र्याला ।

चा. मो. : पकडुनी शहाजीराजास । आणिले त्यास । विजापूरास । करुन दाखल आदिलशहास । ठोकीला मुजरा यवन-राजास । आणिला म्हणे सिंह शहाजीस ॥

चौक ३ रा

शृंखला-युक्त शहाजीला । पाहून राजाला हर्ष जाहला । बोलु लागला त्यास टोचून । तूच लेकाला फूस लावून । टाकणार यवन राज्य उलथून ॥

कटाव १ – आदिलशहा म्हणे शहाजीस, तुझ्या किर्तीस काळीमा खास, लावतो त्याँस, यवन राज्यांस, देतो बहु त्रास तुझ्या पुत्रास, आणि वठणींस, सुटका मग खास, ना तरी जावे लागेल मृत्यु पंथास ॥ ऐकुनी शहाचे बोल, शहाजी लाल, झाला तत्काळ. परी अनुकुल, नाही हा काल, असे जाणोनी, ऐकत नाही मत पुत्र दिले सांगोनी ॥

ऐकुनी शहा खवळला, कोंडा म्हणे याला याच वेळेला खाऊन माजला, माझे अन्नाला, पुत्र वठणीला, आण तर तुला, आशा जगण्याला' ना तरी करिन कोठी बंद अजिबात सर्व बाजून ॥

चाल १ :

करुनिया विचार चित्तात । शहाजीने धाडिले वृत्त । शिवबास मनिचा हेतू कळविलासकल वृत्तांत ॥ शाहाच्या नजर बंदीत । तुजमुळे आहे कैदेत । जर असशी खरा मनपुत्र । सोडीव यातुनि मात्र ॥

चाल – चांद रोहिणी सवे कराया क्रीडा उत्तरे गगनात, किंवा शंकर पार्वती बैसे हिममय आरसे महालात । तैसे होते सई बाईस शिवाजि आपल्या महालांत । सुख दुःखाच्या गोष्टी राज्या तील बोलत ऐकमेकांत । तोच पावला दूत होऊनी पत्र टाकले हातात । क्षणभर विव्हळ होऊनी म्हणती काय करु मी हे तात । संकटमय आयुष्य जयाचे त्याला सुख लाभेल कसे। रात्रं दिन देशाची चिंता लागुन ज्याला राहतसे ॥ चंद्रावरती एकाएकी मेघ येऊनी विरस करी । विषण्ण झाला तसा शिवाजी पत्र वाचुनि खरोखरी ॥

चाल मो. :–

जाहले दुःख वाचुन तात वृत्तांत । वाटले शहाला शरण जावे चित्तांत । गेल्यास शरण, होईल स्वराज्य अंत । काय करावे याचा निश्चय सुचेना उपाय आले शिवराय खरें पेचात ॥

चौक ४ :

सईबाई चतुर धोरणी होती महालात । विचारांचे उठता काहुर त्यांचे डोक्यात । वाटले तीला विचारावी सल्ला मसलत । टाकलाच प्रश्न तात्काळ, काय सुचवाल, म्हणे पत्नीस या प्रसंगात ॥

बायका आम्ही सांगावे काय हो यात । आम्हास राजकारण नाही समजत । परि पाहुन शिवरायाचा आग्रह बहुत । सईबाई होती पटाईत सल्ला देण्यात । काट्याने काटा हे उचित । ऐकुनी वाटले समाधान इतक्यात । शक्कल सुचली तात्काल नामी डोक्यात । शहाजहानास कळवावा सर्व वृत्तांत । कल्पना अजब ही खरी, परी सत्वरी । पाठवुनि पत्र आणली आमलात ॥

चाल :- १

समजोनी मित्र स्वस्त्रीला। शिवबाने घेतला सल्ला । निर्बुद्ध वाटे स्त्री ज्याला । त्याने पहावा हाच दाखला ।। स्वातंत्र्य योग्य न स्त्रीला । वाटते असे ज्या कोणाला । अवलोकुनी शिवचरित्राला त्याने पहावा हाच दाखला ।

चाल :-

शहा विजापुरि हाति शहाजी म्हणूनी होता गर्वात गर्व नाही परि करित कुणाचा घात विहित हे जगतात । येईल आंता शरण शिवाजी ऐसे मांडें खाण्यात । दूत पातला पत्र घेऊनी । दिल्लीपती दरबारात, पाहुनि खलिता शिवराजाचा मोह जाहला चित्तात । यावेळी जर मदत केलि तर दुःख येईल, न हातात पोक्त करुनि हा विचार, लिहीला खलिता त्याने, तो त्यात ।

चाल :- २

सोडून द्यावे शहाजीस पत्र देखत ना तरी असा तय्यार आम्हाशी गाठ, वाचुन असे बादशहांचे पत्र चकित वासले तोंड शहाचे तेथल्या तेथे विरघळुन जातो, ढेकूळ पडता पाण्यात तसा शहा गेला विरघळून दरबारात, त्याचेच दात घातले त्याचे घशात, मोकळें केले शहाजीस पत्र देखत ।

चाल मो. - नभिसूर्य येता सरसरा । चांद घाबरा । होतो पांढरा । शरण येतसे सूर्यराजास । तसा सुलतान शहा शिवबास । आला घेऊनी किल्ले मलखास ।।

## चौक ५ वा

होताच मुक्त शहाजीला । पाहूनी शिवबाला । प्रेमभर आला । चांद पाहून भरति सिंधूस । वत्स पाहून पान्हा धेनूस । तसे प्रेमाचे भरते शहाजीस ।। भेटुन म्हणे शिवबास । माझ्या

वैऱ्यास । बाजी अधमास । ठार केले तरिच वंशास । येऊनि सार्थक केले जन्मास । कलंक ना तरी माझ्या नांवास ।। शहाजीचे शद्ब ऐकून । शिवाजी खवळून । सांगे निक्षून । ठार जर करिन तुमच्या वैऱ्यास स्वर्ग दावीन बाजी अधमास तरीच दावीन वदन तुम्हास ।।

चाल :– १

यवनास काळ जो झाला । बाजीचे भय काय त्याला ।। जणु सिंधू फार खवळला । क्रोधाने लाल शिव झाला ।। कि सिंह उसळूनि आला । । सह्याद्रि सिंह कोपला ।।

चाल – घेऊनी सैन्य शिवराज मुधोळा आला । चढविला अचानक बाजीवरतीं हल्ला । पाहुनी शिवाजी, बाजी मनी चरकला । सैतान जणू हा पुढे येऊन ठाकला जणु मेघ येती एकाकी नभो मंडळा । सुरवात झाली युध्दास खणखणाट झाला तलवारी ढाली दोघांच्या चमकु लागल्या । गगनात बिजलीचा कडकडाट जणू झाला । शिवाजीने करुनिया हल्ला शत्रु कापला । घेतला सूड जनकाचा पुरा त्या काळा । निःपात देशद्रोह्याचा करुनि टाकला । घातला सडा रक्ताचा शत्रू ना उरला ।।

कटाव १ परिकुठे आहे तो बाजी, म्हणे शिवाजी हरामखोर पाजी, ज्याने शहाजी, पकडुनी माजी, केली दुष्कीर्ती, करुनीया ठार धाडतो त्याला मी वरती ।। इतक्यात बाजी, नजरेंस पडला तो त्यास, द्वंद्वयुद्धास, एकमेकास ठार करण्यास, झाली सुरवात, बशिवाने तोच उडविले शीर गगनांत ।।

चाल मो. लावुनि त्याचेच रक्ताचा टिळा विजयाचा । तात सूडाचा । लाऊन शहाजीस केले वंदन । म्हणे शत्रुचे केले कंदन । धन्य ते माता पिता नंदन ।।

# लोकमान्य टिळक पोवाडा

धन्य धन्य लोकमान्य टिळक कीर्ति अलौकीक देशोद्धारक म्हणुनि गाजला भरत खंडात, याला नाही जोड अखिल जगतात यासम हाच म्हणुनि म्हणतात ॥

एकोणिसशे पाच पर्यंत, होते नेमस्त, कॉंग्रेस भरवित, नव–युगारंभ तेथपासून बालरवि उदयांचली येऊन, तरुण जागृत तेज पाहून ॥

टिळकासम कार्यक्षम वीर विलोकून, किर्ती प्रभेने दिपून, तरुन गेले हरकून, वाटे अंतरापासून, हा एक मार्ग दावील, हो देशास स्वराज्य देईल ॥

चाल :– १

टिळकांचि ऐकुनि किर्ती, उज्वल कृती, तशींच देशभक्ति, तेजस्वी मूर्ती, हो वाहवा म्हणती ॥ जणु पाणिदार मोतिदाणा। टिळक शहाणा, चे तरी तरुणा ऐकवुनि त्यांना हो स्वराज्य कणी।, टिळकासम पाहुनि हिरा. अष्टपैलू खरा, तेजस्वी तारा. दिपुनि गेला सारा हो तरुण सभोवरा ॥ कॉंग्रेसचे रोपटे लावून दादा--भाइन वाढविले छान! करिल परि कोण, हो तिचे रक्षण ॥

चाल मोडते - वृद्ध झाले दादाभाई जणु पिकले पान, कन्या कॉंग्रेस लहान, चिंता मनात थैमान, चिंता जाळी बलवान, पालनकर्ता शीलवान, कोणी दिसेना महान उगवला तोच तेजाळ हो रवि टिळक शत्रुचा काळ ।

**चौक २ रा**

खवळून जाता स्फोटक द्रव्ये पृथ्वीचे पोटात, पोट फाडुनिया त्यात, होई भूकंप वेफाट, तशी चळवळ जोरात . वंगभंग भर त्यांना आली स्वदेशाची लाट कर्झन म्हणे हो तोऱ्यात दाबुन टाकीन

क्षणात, करुन दडपशाही, मारुन जनमता लाथ, म्हणें तुम्ही काय करणार हो निशस्त्र असेच मरणार।

चाल दांगड :- एकोनिसशे पांच सालाला, कर्झन साहेबाला, उमाळा आला बंगालची फाळणी करण्याला हिंदुमुसलमान फोडण्याला, वंगभंगाचा उपाय काढला, करायला कर्झन एक गेला झाले परि भलते प्रसंगाला, वंगभंग करण्यासिद्ध झाला, तेजोभंग त्याचापरि झाला, आकरा साली स्वत: बादशहाला, कायदे रद्द करणे प्रसंग आला, काँग्रेसचा पहिला विजय झाला कसा तो सांगतो या वेळेला, रुसो, जपान लढा झाला, जपान विजयाने जागृत झाला, काळया गोऱ्यांचा लढा सुरु झाला गोऱ्याला गार चीत केला, स्वाभिमान हिंदुस्थानचा सगळा, फुंकर घालिता अग्नि फुलला, टिळकानी फुंकर घालण्याला, ज्वालामुखी जणू जागृत झाला, तसा स्वाभिमान जागृत झाला, एक संस्कृति भाषावाला एकरक्ताच्याहो लोकाला, प्रांत बंगाल फोडण्याला कर्झन जेव्हां पूर्ण तयार झाला, लाथाडून अर्ज विनंत्याला, सारा बंगाल खवळून उठला, दर्या जणु फार खवळून गेला, समुद्र मंथनी रत्ने देवाला, जन सागरी हो देशाला, मिळाले काय सांगतो हो तुम्हाला, देह देशार्थ अर्पण्याला, तयार नररत्ने मिळाली आम्हाला, स्वदेशी बहिष्कार शस्त्र हाताला अचुक हा बाण मिळाला आम्हाला, शत्रूच्या मर्मी जाऊन बसला, कारण इंग्रज व्यापारि पडला, देशभर पुकारा याचा केला, लाल बाल पाल यावेळेला दत्तात्रय अवतार जणू झाला काँग्रेसचा भाग्यकाल आला, स्वदेशी पुकारा सर्वत्र केला वंगभंगाचा वणवा पेटला, तरुण खडबडून जागृत झाला, हिंदु-मुसलमान एक झाला, तिटकारा इंग्रजांचा आला, विदेशी कपड्याच्या

होळचा केल्या क्रांतिकारक जन्मा आला, हरताळ सर्वत्र दिसू लागला, वंगभंग जोवर नाहीं गेला बहिष्कार ब्रिटीश मालाला, शपथा सर्वांनी अशा घेतल्या, त्यावेळी दादा ॥

चाल मो. – जळि स्थळीं जसा कृष्ण कंसाच्या मनांत, तसा कर्झनच्या चित्तांत, दिसे टिळक कृतांत, कृती टिळकांची अचाट, पाहुन चळवळीची लाट, भिति वाटे हृदयात, उलथूनी राज्य टाकिल हा डोईजड खास होईल ॥

## चौक ३ रा

चाल मो. – पुष्पानी वृक्ष बहरला, तसा कॉंग्रेसला, तरुण गोळा झाला अखिल कॉंग्रेस कलकत्त्याला, दादाभाई स्थानाला स्वराज्य मंत्र ज्यानी बोलला ॥ जरि होते ब्याऐंशी वर्षाचे, हृदय परि त्यांचे होते तरुणाचे, स्वराज्य घोषणा त्यांनी कलकत्त्यास, दिसेल कां स्वराज्य माझे डोळ्यास, लागला ध्यास त्यांचे चित्तास ॥

स्वराज्य हे ध्येय आमचे, सिद्ध करण्याचे साधन साचे स्वदेशि बहिष्कार राष्ट्रिय शिक्षण, चतुः सुत्रीचे जाहीर घोषण ज्यांने देशांत झाले आंदोलन ॥ आजवरी मवाळ झाला कॉंग्रेस-वाला त्यांना कलकत्त्याला, स्वदेशि बहिष्कार नाहीं रुचला, झीज अंगास लागेल असला, मार्ग का रुचतो मवाळाला ॥

चाल १:- सुरतेची कॉंग्रेस आली तेथे जहाल मवाळबंडाळी। दादाभाईची इथे राज्य आरोळी, गोखल्याना पसंत न पडली। त्या ठरावाची खांडीळी, करण्यास मंडळी जमली। टिळकांनी मख्खी ओळखली, सुरतेचि कॉंग्रेस उधळिली। कॉंग्रेसची झाली चिरफाळी, जहाल मवाळांची दुफळी मवाळांची फज़ीती केली,

टिळकांची सरशी झाली । प्रतिपक्षी चीत करण्याची अजब हातोटी । सरकारि धोरणावरी केसरी पत्रीं । टिळकांचि टीका फार कडक अशी आहे ख्याती ।

त्यामुळे त्यांचेवर वळली सरकारी दृष्टी । पहिली सजादीड वर्षाची परी न त्या खंती ! येताच सुटून सुरु झाली त्यांचि देश भक्ती । दिनरात देह झिजविला स्वदेशासाठी । स्वदेशी -ची चळवळ केली टिळकांनी । सार्वजनिक शिवाजि आणि गणेश उत्सवाची दाटी । केसरी मराठा गर्जना करी महाराष्ट्री । स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क टिळकांची उक्ती । दारु पिकेटिंग चळवळ त्यांनी केलि मोठी । त्यानि केले यत्नराष्ट्रीय शिक्षणासाठी । स्वातंत्र्य ज्योत फुलविली अशी महाराष्ट्रीं ॥

चाल मोडते:– धरण्यास स्वराज्य धुरा, लाभला खरा टिळकासम हिरा, म्हणुनि कांग्रेस पाऊल जोरात, वंगभंगाची चळवळ जोरात. टिळकांची कीर्ती झाली जगतात ॥

**चौक ४ था** -- रोमरोमी तेजस्वीपणा, टिळकाचा बाणा, पाहुनी तरुणा, येई चैतन्य त्यांचे रक्तांत, नको हें राज्य वाटे चित्तात परि बोलण्याची चोरी देशात ॥ येतांच सूर्य उदयाला, तिमिर विलयाला, तसे देशाला, टिळक देशाचे दास्यतिमिरास, अहर्निश झटले दूर करण्यास., म्हणुनि वाटयास त्यांच्या कारावास ॥ फितवितो टिळक तरुणाला, करी चळवळीला, त्यावरी खटला, राज्यद्रोहाचा सरकारने केला, वाटावी दहशत लोकाला, सहा-वर्षाचे दिली सजेला ॥

चाल :– १ ऐकुनी त्यांचे शिक्षेला, सारा देश फार हळहळला। चंद्राविण तारांगणाला, नसे शोभा वद्य पक्षाला। जाताच टिळक तुरुंगाला, निस्तेज देश जाहला। तुरुंगात जरी हा गेला, तरि नाही सुटत याचा चाळा। तिथे नाहीं स्वस्थ हा बसला, गीता-रहस्य ग्रंथ काढिला। टिळकांच्या कीर्तिमंदिराला, ग्रंथाने कळस चढवीला। अनभिशिक्त राजा झाला, टिळक हा खरा देशाला। पुन्हा सुटून येता देशाला, महायुद्ध वणवा पेटला। स्वराज्याचे हक्क मिळण्याला, हा मोका चांगला आला॥

चाल :– २ कांग्रेस थंडावली होती सहा वर्षात। येतांच मंडालेहून परत देशात। चैतन्य येऊं लागले पुन्हा देशात। होमरुल चळवळ केली त्यांनी जोरात। बेझंटबाईनी केली मोठी मदत चळवळीस। सुरतेचा सूर अद्याप होता देशात। गोखले टिळक हा वाद आला रंगात। जहालमवाळांचा हा वाद होता निश्चित। जहालास वाटे कांग्रस न्यावी जोरात। मंवाळास वाटे कांग्रेस असावी ताब्यांत।

चाल मो. – सरकार आहे संकटात, महायुद्धात, मवाळ म्हणत, मागण्या मागून सरकारला त्रास, देऊं नये वाटे त्यांचे चित्तास, धडाडी कळाली पूर्ण देशास॥

**चौक ५ वा**–महायुद्ध संधि चांगली, म्हणे लाभली, बेझंटबाई भली, केलि खटपट तिनें जोरांत, कराया समेट जहाल मवाळात, तोंच गोखले गेले स्वर्गांत। टिळकांनी रात्रंदिन फिरुन, मोठ्या धडा-डीनें अखिल हिंदुस्तान, होमरुल चळवळ केली जोरात, अपूर्व स्वागत त्यांचे दौ-यात, स्वराज्य बीज पेरले लोकात। हिंदु-मुसलमान एक केला, टिळकानी लखनौला, म्हणुन कांग्रेसला भारतमंत्र्याचे पाचरण खास, स्वराज्यहक्क देतो तुम्हास, तुमचे सहकार्य हवे आम्हास॥

चाल :- १हिंदुमुसलमान एक होऊन स्वराज्याची मागणी जोरात। असे संघटन पाहून, मांटेग्यू गेला घाबरुन। संकटीं होता म्हणून, इंग्रज आला धावून। देतो स्वराज्य असे सांगून, चळवळ टाकली दाबून। संपता युद्ध दारुण गेले वचन पार विसरुन। सुधारणा पोकळ देऊन, कशी पहा केली बोळवण ॥

चाल मो. – एकोणीसशेवीस सालाला, आगस्ट पहिलीला घात जवा झाला, काळाने नेले बाळटिळकास, मायभूमिच्या भालतिलकास, पुसुनि दुर्दैव तिच्या वाटयास। मायभूमि ढाळि। अश्रुला, दास्य शृंखला, तोडणारा गेला, म्हणे मग दया माझे पुण्यास, येतिका कोणा सदयहृदयास, तोंच पातले गांधि समयास।

धन्य धन्य लोकमान्य टिळक, कीर्ति अलौकिक देशोद्धारक, म्हणुनि गाजला भरत खंडात, याला नाहि जोड अखिल जगतात, यासम हाच म्हणुनि म्हणतात ॥

एकोणिसशे पाच पर्यंत, होते नेमस्त, कॉंग्रेस भरवील नवयुगारंभ तेथ पासून, बालरविउदयाचलि येऊन, तरुण जागृत तेज पाहून ॥

टिळका सम कार्यक्षम वीर विलोकून, किर्ती प्रभेने दिपून तरुण गेले हरकून, वाटे अंतरापासून, हा एक मार्ग दावील। हो देशास स्वराज्य देईल ॥

(चाल) टिळकांचि ऐकुनी कीर्ती, उज्वल कृती, तशिच देशभक्ति, तेजस्वी मूर्ती, हो वाहवा म्हणती ॥ जणु पाणिदार मोतिदाणा, टिळक शाहाणा, चेतवी तरुणा ऐकवुनि त्याना, हो स्वराज्य कर्णा ॥ टिळकासम पाहुनि हिरा अष्टपैलु खरा तेजस्वी तारा, दिपुनि गेला सारा हो तरुण सभोंवरा ॥ कॉंग्रेसचे

रोपटे लावुन दादाभाइन, वाढविले छान, करिल परि कोण, हो तिचे रक्षण ।। ( चाल मोडते ) वृद्ध झाले दादाभाई जणु पिकले पान, कन्या काँग्रेस लहान, चिंता मना तयै मान. चिंता जाळी बलवान पालनकर्ता शक्तिवान, कोणी दिसेना महान उगवला तोच तेजाळ, हो रवि टिळक शत्रुचा काळ ।। खवळुन जाता स्फोटक द्रव्ये (चाल - २ )पृथ्वीचे पोटात, पोट फाडुनी या त्यात, होई भूकंप बेफाट, तशी चळवळ जोरात, वंगभंग भर त्यात, आली स्वदेशाची लाट, कर्झन म्हणे हो तोऱ्यात दाबुन टाकीन क्षणात, भरुन दडपशाही मात, मारुन जनमता लाथ, म्हणे तुम्ही काय करणार हो निशस्त्र असेच मरणार । ( चाल दांगड )- एकोणी– सशे पाच सालाला कर्झन साहेबाला, उमाळा आला, बंगालची फाळणी करण्याला, हिंदु-मुसलमान फोडण्याला, वंगभंगाचा उपाय काढला, करायला कर्झन एक गेला, झाले परि भलते प्रसंगाला, वंगभंग कराया सिद्ध झाला, तेजोभंग त्याचा परी झाला, अकरा- साली स्वत: बादशहाला, फायदे रद्द करणे प्रसंग आला, काँग्रेसचा पहिला विजय झाला कसा ते सांगतो या वेळेला, रुसी जपान लढा सुरु झाला, जपान विजयाने जागृत झाला, काळ्यागोऱ्यांचा लढा झाला, गोऱ्याला पार चित केला, स्वाभिमान हिंदुस्थानचा सगळा, फुंकर घालिता अग्नि फुलला, टिळका तो फुंकर घालण्याला, ज्वालामुखि जणू जागृत झाला, तसा स्वाभिमान जागृत झाला, एक संस्कृती भाषावाला एकरक्ताच्या घ्या हो लोकाला प्रांत बंगाल फोडण्याला, कर्झन जेव्हां पूर्ण तयार झाला लाथाडुन अर्ज विनंत्याला, सारा बंगाल खवळुन उठला, दर्या जणु फार खवळून गेला, समुद्रमंथनी रत्नें देवाला, जन सागरी हो देशाला

मिळाले काय सांगतो हो तुम्हाला, देह देशार्थ अर्पण्याला तयार नर रत्ने मिळाली आम्हाला, स्वदेशि बहिष्कार शस्त्र हातात अचुक हा बाण मिळाला आम्हाला, शत्रुच्या मर्मी जाऊन बसला कारण इंग्रज व्यापारि पडला, देशभर पुकारा याचा केला, लाल बाल पाल यावेळेला, दत्तात्रय अवतार जणूं झाला, काँग्रेसचा भाग्य-काल आला स्वदेशी पुकारा सर्वत्र केला, वंगभंगाचा वणवा पेटला, तरुण खडबडुन जागृत झाला, हिंदुमुसलमान एक झाला, तिटकारा इंग्रजाचा आला, विदेशि कपडयांच्या होळया केल्या क्रांतिकारक जन्मा, आला हरताळ सर्वत्र दिसू लागला, वंगभंग जोंवर नाही गेला, बहिष्कार ब्रिटीश मालाला, शपथा सर्वांनी अश्या घेतल्या, त्यावेळीं दादा ॥

# महात्मा गांधींचा पोवाडा

## चौक १ ला

ठेवुनी हात स्वातंत्र्य देवि पदकमला।
स्वातंत्र्य–प्रतिज्ञा करूनि नित्य कार्याला।
कसुनिया कास देशार्थ फकिर जो झाला।
जयाचा देव सखा बनला ॥

( चाल : धन्य धन्य धन्य छत्रपती )

ज्यांचि कीर्ति गाजे जगतांत । भरतखंडांत । साधुसंतांत । गांधि जाहले पूर्ण विख्यात । वंद्य जे झाले सकळ लोकांत । महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ॥

पाहुनी हाल दीनांचे । कळवळे सांचें । हृदय गांधीचे । हिंदुचे दुःख दूर करण्यांत । हाल सोशिले अफ्रिका खंडात । महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ॥

तन मन धन अर्पुनी । लंगोटि लावोनि । फकिर होवोनी । देश--स्वातंत्र्य एक चित्तांत । ध्यास लागला ज्यास दिनरात । महात्मा म्हणुनि त्यास ० ॥

म. रा. सा. स. म. ग्रंथालय
ग्रंथालय



परस्त्रीस माता समजोनी । विलास सोडोनी । इंद्रियदमनी
मिळवुनी विजय जाहले ख्यात । ऐन तारुण्यबहर कालांत
महात्मा म्हणुनी ० ॥

चाल १:--समजोनि बहिण स्वस्त्रीला । मारिली लाथ सौख्याला
अवघड विश्वामित्राला । तो विषयपोश तोडिला ॥
दोन तपे ब्रम्हचर्याला । पाळुनी विरक्त जाहला ॥
वैराग्य असे जगताला । पाहुनी अचंबा वाटला ॥

चाल २:-वैराग्य लाभलें श्रीरामासम ज्याला ।
रामासम वाटे गांधि शांतिचा पुतळा ।
एकपत्नि वचनि एकबाणी या त्रिगुणाला ।
पाहूनि त्रिगुण गांधिजीपाशी जगताला ।
श्रीराम जणू कलियुगीं वाटे अवतरला ।
नेसुनी वल्कलें राम निघाले वनाला।
नेसुनि खादि गांधिजी गेले आफ्रिकेला ।
त्याने सीतादेवी याने कस्तुरबाई जोडीला ।
मारुनी लाथ राज्याला राम नीघाला ।
सोडोनी पाणि वैभवावरी हा गेला ।
वनवास चौदा वर्षांचा त्यानें भोगिला ।
आफ्रिका त्रास यानें चौदा वर्षे सोशिला ।
वानर साह्य त्याला सत्याग्रहि वश याला ।
त्यानें लंकापति यानें लंडनपति हलवीला ।

चाल मोडते -- हिंदूचे हाल पाहोनि । गेले धावोनि । सत्याग्रह करुनि । केले रक्षण आफ्रिका खंडांत । गर्व गोऱ्यांचा जिरविल । त्यांत । महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ॥

चौक २ रा – रौलेट बिलाचा वरवंटा । सत्याग्रह सोटा ।
दावूनी मोठा । गांधिनी दूर पळवलें त्यांस । जागृत
केलें हिंदुस्थानास । बनविले सहनशील लोकांस ।।
हरताळ सर्व देशांत । पडला कडकडित । चळवळ
जोरांत । पाहूनी क्रुद्ध झालें सरकार । दिल्ली शहरात केला
गोळिबार । तिकडे गांधिजी गेले सत्वर ।।

चाल १ लीः– गांधिजी तेथे जातात । पकडिलें त्यांस
इतक्यात ।। खळबळ झाली लोकांत । रौलेट-
बील निषेधार्थ ।।
भिती पडली सरकारात । सोडिलें गांधि मुम्बईत ।
सरकार पडलें पेचांत । पाहुनी सत्याग्रह शस्त्र । शांतता,
भंग सदरांत । गोळीबार पुन्हां दिल्लींत ।।

चाल ४ थी :– स्वामी श्रद्धानंद दिल्लींत । चालले होते शिस्तींत
गोळिब।र झाला इतक्यांत ।। स्वमिचा घात ।
करण्याचा हेतु हृदयांत । स्वामिचा सवाल गुरख्यास ।
कारण काय गोलिबारास । ऐकुनी सवाल म्हणे त्यास ।
आले रागास । छेद देंगें तुमकू म्हणे त्यास ।। जी ।
छातीचा करुनि कोट । दावूनि धैर्य अलोट ।
मै खडा सामने ताठ । म्हणे मुझें काट ।
आला गोरा तेथें इतक्यांत ।। जी ।।
रोंखिल्या हुकुमावांचून । बंदुका त्यांनी दडपून ।
शिपायाच्या गळल्या हातून । गोरा पाहून ।
अशि फजिती केलो धैर्यांन ।। जी ।।

चाल बदलः- गांधिनी साहच करुनिया महायुद्धांत ।

इंग्रजा दिला मिळवून विजय हो त्यांत । पाजुनी
दूध पोशिला सर्प गृहात । तो सर्प जसा घे प्राण ।
तसें शिरकाण । करूनि देशाचि केलि धुळधाण ॥ जी

कटाव ३ राः— जालियनवाला बागेचे । केलें रक्ताचे ।
अंगण साचें । कत्तलिचा असा नाही दाखला ।
कलंक हा इंग्रजी राज्याला । सांगतो ऐका प्रसंगाला ।
जालियनवाला बाग केला । पिंजरा लोकांना कोंड–
ण्याला । वाघापरि ठार मारण्याला । वीस हजार लोक
सभेला । विमान घारीपरि हो घिरट्याला । घालु
लागले त्या समयाला । हत्यारबंद शिपाई दाराला ।
पाहून गर्भगळित लोक झाला । भिती आहे जिवाची
प्रत्यकाला । भितीवरून चढुन जाउ लागला । जाऊ
दिले नाही परी कोणाला । वाघ जणु पिंजऱ्यात सांप–
डला । तसा सारा लोक कोंडला गेला । गोळीबार
त्यांनीं सुरू केला । मुंग्यापरि लोक ठार केला । रक्ताचा
चिखल जमिनीला । अगणित लोक ठार झाला । इतक्यां-
मध्ये दारू गोळा संपला । नाहीतर आणखी कांही
स्वर्गाला । पाठविण्याची इच्छा होती डायराला । कांही
लोक लोळुन जमिनीला । वांचवूं पाहती प्राणाला । असें
पाहुन हुकूम झाला । गुडघे टेकुन जमिनीला । ठार करा
तुम्ही निजलेल्या । प्रेतांचा ढीग तेथे झाला । काय वर्णावें
प्रसंगाला । सांगा तुम्ही दादा? ॥

चाल मोडते-- जालियनवाला बागेंत केला गोळीबार । मुंग्यापरि
करूनिया कैक लोकांना ठार । डोळ्याची धुंदी परि नाही

उतरली पार। राव रंक सारे सरसकट। जाण्या फरपटत
पोटानें सरपटत। लावी सरकार ॥ जी
उपकारफेड ज्यांनि केली करूनी अपकार।
राक्षसी अशि डायर कृत्यें करणार।
सरकार त्यास पेनशन देण्या तय्यार।
पाहुनीं अमानुष छळा। गांधि खवळला। पुकार केला
दुष्ट सरकार ॥ जी जी ॥

चौक ३ रा-एकोणीसशे वीस सालाला। आगष्ट पहिलीला। घात
जवा झाला। कालानें नेलें बाल टिळकास। मायभूमिच्या
भाल तिलकांस। पुसुनी दुर्दैव तिच्या वाट्यास।

मायभूमि ढाळी अश्रुला। दास्य शृंखला। तोडणार
गेला। म्हणजे मम दया माझ्या पुत्रास। येती कां कोणा
सदय हृदयास। तोंच पातले गांधि समयास ॥ जी ॥

असहकार त्यांनीं पुकारून! देश हालवून। जागृति
करून। दुःख मायभूचें कमी करण्यास। पारतंत्र्याचे पाश
तोडण्यास तुरुंगवासाचा सोशिला त्रास ॥ जी ॥

कटाव २:- असहकार कर्णा फुंकिला। त्याचा नाद देशभर झाला
खडबडुन जागृत केला। जणु सिंह खावया उठला। इंग्रजां
बहिष्कार घाला। नका जाउ त्याच्या कोर्टाला। सोडा
त्यांच्या शाळा कॉलेजाला। करूं नका त्यांचे नोकरीला।
कौंसिली बहिष्कार घाला। नका घेऊं त्यांच्या पदविला।
नका घेऊ विदेशी माला सर्वांगी बहिष्कार घाला। शरण
येण्याला ॥

चाल २ :- एक कोटी एका महिन्यांत फंड जमविला ।
खादिचा धंदा त्यांतूनि त्यानी सुरू केला ।
जिकडे बघावें तिकडे पाहून गांधि–टोपिवाला ।
क्रोधाग्नि नोकरशाहिचा त्यानें भडकला ।
मुस्कटदाबी कैक लोकांची केली त्या काला ।
गोऱ्याच्या पोटाला चिमटा खादीनें बसला ।
पकडिले त्यानें त्यावेळी म्हणूनी गांधींला ।
कांही वेळा ढगाच्या आड सूर्य जाहाला ।
जातांना ढग बाजूला सूर्य तळपला ।
कारागृह एका वर्षात त्यांचा संपला ।
भगवान कृष्ण गोकुळी जसा जन्माला ।
मोहन गांधी होतसे हिंदुस्थानाला ।
कंसाच्यां कैदखान्यात कृष्ण जन्मला ।
इंग्रजांचा जेल पुरणार याच्या जन्माला ।
मोहनी त्यानें गोकुळां यानें भारताला ।
कृष्णानें सुदर्शनानें कंस वध केला ।
यांचे चरखा–चक्र मारितें मँचेस्टरवाला ।
लक्ष्मी सदा सेविते त्याचें चरणाला ।
धांवते लक्ष्मी या मागें नित्य कार्याला ।
अर्जुना गीता सांगूनी निर्भय केला ।
शिकवुनी अहिंसा यानें धीट देश केला ।
त्यानें कौरवा शीयुद्धार्थ अर्जुन सिद्ध केला ।
यानें हिंदी केला तय्यार कायदेभंगाला ।

चाल मोडते:— असहकार काळ संपला । चला हो चला

२३५ / २

कायदेभंगाला । मुंबईकर ज्यामध्यें ख्यात । ज्यानी केली इंग्रजांवर मात । त्याचें वर्णन पुढील चौकांत ।। जी ।।

चौक ४ था-- सायमन कमिशन नेमून । केला अपमान । घेतला लाठी मारून लालाजीचा प्राण । पाहून जाहला जागृत देश-अभिमान । स्वातंत्र्य ध्येय जाहीर । करण्यास धीर तरुण तयार । करण्या बलिदान ।

कटाव ३:- जसा कृष्ण भगवान गेला । शिष्टाई करण्याला दुर्योधनाला सामोपचारानें वळविण्याला । धर्माची हो बाजू मांडण्याला । हिताची गोष्ट सांगण्याला । दुर्योधन ऐका काय बोलला । माति जेवढी सुईच्या आग्राला । नाही देणार पांडवाला । पांच गांवांची गोष्ट कशाला । कपटानें घेउन राज्याला । दुर्योधन मस्त फार झाला । दुरुत्तर भगवानाला बोलला । ब्रुडत्याचा पाय खोलाला । गर्व जसा त्याचा हरण केला । थेट तसा प्रसंग झाला । ऐका तुम्ही दादा ।।

दुर्योधनापरमाण झाला । इंग्रज मातला । विचार नाही त्याला । सत्याची चाड नाही त्याला । कृष्णापरि शिष्ठाई करण्याला । गांधी गेले व्हाइसरायच्या भेटीला, गांधी म्हणे व्हायसर साहेबाला । एका वर्षाचा काळ सरला । सरकार काय तयार देण्याला । नेहरु रिपोर्ट मान्य का तुम्हांला । सरकारचा इचार काय झाला सायबान दिल उत्तराला । तयार नाहीं वचन मी देण्याला अजून नाहीं इचार पुरता झाला । सायबाच्या ऐकुन या बोला । गांधी गेले लाहोर कॉंग्रेसला झटक्यानं दादा ।।

स्वातंत्र्य पुकारां केला। गांधीनीं लाहोरला तरुण हालविला । एकोणीसशें तीस आरंभला। जानेवारी सव्विस तारखेला। स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचला जागृत सारा देश झाला। गांधी म्हणे कायदेभंगाला। सुरूं करणार याच काला। कायद्याची भीति लोकांला कोणी म्हणे थांबा या वेळेला। गांधि म्हणे भिऊ नका कायद्याला। भिऊ नका मुळिच तुरुंगाला। वाघाचे बच्चे प्रंसगाला। भिऊनि पळता कां संकटाला। वाघ असुनी कां शेंळी बनला। आरसा इतिहासाचा डोळ्याला। दिसतो का नाही तुम्हाला। त्यांत पहा शूर पूर्वजाला। त्यांत पहा शिवाजी राजाला पारतंत्र्यात राहण्याला। लाज कशी नाही चित्ताला। काळिमा पूर्वज किर्तीला। हाती घ्या सत्याग्रह शस्त्राला सविनय कायदेभंगाला। तयार व्हा त्वरितचि कार्याला आज तुम्ही दादा ॥

चाल ४ थी :- सविनय कायदेभंगाचा। जन्मसिद्ध हक्क हा साचा। पाठिंवा ज्याला सत्याचा। विजय हो त्याचा। सिद्धांत सर्व धर्मांचा ॥

मीठ कायदाभंग करण्याला। गांधि निघाले मार्च बाराला। सत्याग्रही ऐंशी लोकाला। घेऊनि मदतीला। चालत गेले दांडीला ॥ लोटले लोक बघण्याला। उधळती फुलें पैशाला। धन नको लोक या काला। 'पाहिजे मजला' असें सांगुन कायदा तोडला ॥

शस्त्रासि टक्कर देण्याला। शस्त्रहीन सिद्ध कसा झाला परदेश लोक लोटला युद्ध पहाण्याला। आश्चर्य

वाटे जगताला ॥

कटाव २- आदर गांधिविषयी वाढला । जगीं साधु म्हणून गाजला । धर्मात्मा म्हणुन गाजला । राजकारणी म्हणून गाजला । रामदासापरि त्रिगुणानें गांधी चमकला । जी । सहनशीलपणा दुष्टाला । शरण येण्या लावतो त्याला । असा परसंग एकनाथाला । यवनानें मुद्दाम आणला एकनाथ गेले स्नानाला । यवन बसला त्यांचे वाटेला । एकनाथ परत चालला । पाहून आंघोळ केलेला । यवनानें विडा हो थुंकला । एकनाथ परत स्नानाला । स्नान करून परत चालला । यवन विडा खाऊन रंगला । येतांच पुन्हा लाल केला । असा एकशें आठ हो वेळेला । यवन त्याच्या आंगावर थुंकला । यवन त्यांना शरण मग आला । एकनाथ ह्मणें यवनाला । एकशें आठ स्नान करण्याचे पुण्य दिले मजला ॥ जी ॥

चाल २ री एकनाथ, प्रल्हाद, तुकाराम या कसोटीला । उतरून झाले जर विजयी त्या प्रसंगाला । सामुदयिक रीतोने तसे सोसू कष्टाला । सोसुनी हाल देशार्थ मिळवु विजयाला । उतरले सत्याग्रही सर्व या कसोटीला । करणार म्हणे गांधिजी मिठागरी हल्ला । करुं गोळीबार जर कराल मिठागरी हल्ला । प्राणाची पर्वा देशार्थ नाही हो ज्याला । तो भिईल काय सरकारी गोळीबाराला । सत्याग्रही कैक तय्यार हल्ला करण्याला । सरकाने असे पाहुनी पकडले गांधिला ॥ जी ॥

स. ना. आ. ग्रं. ग्रंथालय

चाल -- ( धन्य बाबु गेनू )

सेनापती गांधी गेले तुरुंगाच्या दारांत । कायदेभंगाची सुरवात । केली चळवळ जोरात । परि सरकार तोऱ्यांत म्हणे गोळीबार चहुकडे । ठार करू जशी माकडे ।। जी ।।

चौक ५ वा

माकड साहचें श्रीरामाने रावण केला ठार । मस्त झाला होता फार गेला रसातळा पार। असे मी मी म्हणाणर। गेले कैक मृत्युपंथांस । इंग्रज जाईल खास । जी।।

लवणागिरी करून स्वारी घेऊया हातांत । झेंडा लावोनिया त्यांत। करु इंग्रजावर मात । शंका नको अंतरांत। एक जूट करून सत्वरी । चला जाऊं शिरोडचा-वरी ।। जी ।।

सत्याग्रही लवलाही आले शिरोड्यास । ज्यांना स्वातंत्र्याचा ध्यास । पूर्ण अनत्याचारास । मनि धरूनिया खास नरवीर झाले तयार। खाण्यास लाठिचा मार ।। जी ।।

कटाव ३:– धर्मानंद कौसंबी सेनापती । शिरोड्याप्रती । ज्याचे हातां खालती । शाहीर दामु आण्णा सुभेदार। ज्यांच्या तुकडीला लाठी मार। सरकारनें दिला बेसुमार। हल्ला केला मिठागरावर । लवणागिरी केला त्यांनी सर। झेंडा रोविला त्यांत सत्वर। स्वातंत्र्य ध्वजा फडकविणार। जगांमध्ये श्रेष्ठ खरे ठरणार। बघुनि माय बहिणि लाठी मार । जखमा कैकांना डोक्यावर। रक्तानें न्हाले कैक वीर। मावळे बघणारे चिडले फार। देवा म्हणे दया कधि येणार। शत्रुपापाचा घडा भरणार। तोंवर असले

अत्याचार । केले धारास्ना वडाळयावर । घातलें घोडे अंगावर । सोडला नाहीं तरी अनत्याचार । आज्ञा सेनापती गांधी करणार । सत्य अहिंसेचा पूर्ण. अवतार । विजयी झाले मिठागरावर । त्यावेळी दादा ।।

चाल ४ थी:– पेशावरला केला गोळीबार । राक्षसी असे सरकार । लोकांत अनत्याचार । बाणला फार । घेतल्या गोळया छातीवर ।। जी ।।

सोलापुरी गोळीबार करून । दिसला तो ठार मारून लष्करी कायदा पुकारून । घेतले छळुन बंद व्हावी चळवळ म्हणुन ।। मुंबईत रोज लाठो मार । खाण्यास लोक तय्यार । चिळकांड्या भराभर । रक्ताचा पूर । निर्दयी असे सरकार ।। जी ।।

राष्टीय झेंडा वंदन । कांग्रेसच्या होई हुकमाने । योग्य त्या अझाद मैदान । स्त्रियांना सरकारन । दिला लाठ.मार सपाटून ।। जी ।।

कटाव ४ :– शिस्त पांडवांसम पाळाया देश सर्व हा तयार झाला । झेंडा वंदन करावयाला । स्वयंसेविका जमल्या अबला । अझाद मैदानावरती आल्या । राष्ट्रीय झेंडा त्यांनी रोंविला । सरकाराने लाठीवाला । पोलिस ताफा आंत सोडिला । केला स्त्रियांवर लाठी हल्ला । स्त्रियां गरोदर किती पडल्या । डोक्यावरती जखमा झाल्या रक्ताचा तो चिखल झाला । एक सुंदरशा तरुणीला । दुःशासनाने जशि कृष्णेला । सार्जंटाने कृष्णकुमारिला । वेणी धरुनी पाडलि तिजला । लाठि मारूनी तिजवर

हल्ला । करुनि जखमी केले तिजला । ऐशा सरकाराच्या लीला । कितीक वर्णू मी या काला । घ्या ध्यानिं तयांचे मर्म विनवि तुम्हांला ।।

चाल बदलतेः— मस्त हत्ती खातो जेव्हां अंकुशाचा मार । मस्ति उतरती पार । तसे इंग्रज सरकार । ज्यांचे जीवन व्यापार । मुम्बईने केला ठार । नाक दाबुन तोंड उघडिले समेटाचे बोलणे सुरु केले ।।

चाल २ रीः- साठ हजार लोक तुरुंगांत कायदेभंगात लाखोंनी लाठिमार खाल्ला याच युद्धांत । गोळिबार तसा चहुंकडे सर्व देशांत । सरकारी लाठी - गोळीबार तुरुंग ही शस्त्र । जाहलीं सर्व बोथट शस्त्र विहिनांत. जाहला सत्य-अहिंसेचा मार्ग हा श्रेष्ठ । राष्ट्राचा दर्जा वाढला सर्व जगतांत । पांडवांसारखी शिस्त दिसली देशांत । देशार्थ त्याग ही वृत्ति बाणली त्यांत । याचें सर्व श्रेय गांधिना आहे निश्चित । गांधिजी होते बिन मुदत जरी तुरुंगांत । सोडिलें त्यांना बिनशर्त करण्या वाटाघाट । दिल्लीस गांधि आर्यविन झाला समेट । बहुतेक सर्व सत्याग्रहि झाले मुक्त । आनंदी आनंद झाला सर्व देशांत ।।

चाल बदलतेः— समेटाची शाई वाळली नाहीं इतक्यांत । त्याचा भंग करण्यांत । घाई झाली सरकारांत । जुलुम सारा वसुलांत । पाहुन गांधी म्हणतात । चौकशी याची करण्यास । नेमावी पंचायत खास ।।

नोकरशाही तयार नाहीं चौकशी करण्यास । पाहुन गांधी व्हाइसरायास । म्हणे राऊंड टेबलास । घालुं बहिष्कार खास । कळले इंग्लंड सरकारास । त्यांचा हुकुम व्हाइसरायास । करा मान्य गांधि तत्वास । पाठवा त्यांना इंग्लंडास ॥

मान्य होता सरकारला चौकशीची आट । गेलें मुंबई शहरांत । गर्दी झाली अटोकाट । जनसमुह अफाट । असा स्वागताचा थाट । जणुं देशाचा सम्राट । धरली इंग्लंडाची वाट । जसा वामन गेला बळिकडे । तसे गांधि इंग्रजाकडे ॥

चाल ३:– वामन गेला जसा बलिकडे तसे महात्मा गांधी । इंग्रज राजाकडे चालले करण्याला संधी ॥ दर्भ हातीं कटि लंगोटीचा वामनाचा थाट ।

टकळी हाती कटि लंगोटी मोहनाचा थाट । सर्व शक्ति देवांनी दिधल्या बटू वामनास ।

पस्तिस कोटि जनांची शक्ति लाभलि गांधीस ॥

त्रिपाद भूमी दान मागण्या गेला वामन ।

स्वातंत्र्याचे दान मागण्या गेला मोहन ॥ बळी लागला उदक सोडण्या त्याच्या हातांत ।

उदक पडेना म्हणुनि पाहतो वामन झारींत ॥
शुक्राचार्य बैसले पाहुनी घेउनि दर्भांकुर ।
त्याचा डोळा फोडुनी पाडलें उदक हातीं झर झर ॥
शुक्राचार्यासम येईल जो जो स्वातंत्र्या आड ।

गांधि घेउनी टकळी त्याची मोडतील खोड ॥
वामनमूर्ति थोर कीर्ती त्यांची जगतांत ।
उक्ति कृतीचा मेळ दाविती जे आचरणांत ॥
चाल ४:– धैर्य सत्य अहिंसेचा तिरंगी विख्यांत । झेंडा घेउनी हातांत । गांधि गेले इंग्लंडांत । लंडन राउंड टेबलांत । काँग्रेस बाजू मांडण्यांत । सत्याचा विजय करणार । गांधिजी विजयी होणार ॥
चाल मोडते:– काँग्रेस केले सरकार । गांधिनि सत्वर । राष्ट्राला प्यार । हुकुम काँग्रेस जो जो करणार । तो तो पाळण्याचा करा निर्धार । तरिच स्वातंत्र्य हाती येणार॥
आत्माराम तनय शाहिरास । स्फूर्ति पोवाड्यास ।
गांधिमुळे खास ।
नमन मी करतो त्यांचे चरणास । तसेच मम ।
माता पिता चरणास ।। आणि मज प्यार महाराष्ट्रास

**

# छ. राजाराम महाराजांचा पोवाडा

चौक १ ला

धन्य धन्य धन्य छत्रपती । राजाराम नृपति । पराक्रमी अति । दाविला हात औरंगजेबास । घेतला सूड तयाचा खास । राखिलें छत्रपतिच्या नांवास ।। धृ. ।। शिवाजीच्या मागें संभाजी । झाले रणगाजी । कलुशा परि पाजी । राज्य अधिकार ज्यांचे हातांत । गुंग केला । राजा त्यानें व्यसनांत । व्यसन नाही करित कुणाचा घात ? ।। संभाजी संगमेश्वरांत । गुंग व्यसनांत । विषय ख्यालांत । दंग झाले म्हणुनि औरंगजेबास । सिंहाच्या धरितां आले छाव्यास । शूर परि भीत नाहीं कवणांस ।। बादशहा ह्मणे संभाजी । पिंजऱ्यांमाजी । गवसला आजी । मोकळ करुनि देतों जिवदान । सोडुनी स्वधर्माचा अभिमान । हात जरी असाल आता मुसलमान ।। चाल १ ली हे बोल ऐकुनी खोल हृदयांत टोंचले शल्य । फिरवुनी नयन गरागर बोलला संभाजी वीर । मुसलमान होतों सत्वर । दे बेटी तुझी गुलजार ।। चाल २ री ।। ऐकुनी खवळला बादशहा म्लेंछांचा । खुपसुनी सळचा डोळ्यांत लाल लोहाच्या । काढुनी नयन डोळ्यांच्या केल्या दोन खाचा । अद्याप कर स्वीकार यवनधर्माचा । ऐकुनी खवळला पुत्र शिवाजी राजाचा । प्राण गेला तरी बेहेत्तर नाही डरायाचा । स्वधर्मी बरें मरण याच तत्वाचा । सुंभ जळाले परि राहतो पीळ हो त्याचा । केला अमानुष वध डोळे काढूनि त्याचा । जसा टोपिवाल्यानें केला तात्या टोप्याचा । ( चाल मोडते ) हाहाःकार झाला चहुकडे । राष्ट्र खडबडे । शत्रूचें नरडें । कापण्या

सर्व झाले तय्यार । स्वातंत्र्य युद्ध ज्यांच्या निर्धार । धनाजी संताजी झाले पुढियार ॥ १ ॥

### चौक २ रा

राजाराम नजर कैदेंत । रायगडांत । ऐकुनी वृत्त । कष्ठी जाह्ले तोंच किल्यांत । लोक अधिकार देती हातांत ज्यांनी केली बादशहावरी मात ॥ बालशिवाजी राजा समजोनी । साक्षी भवानी । राजारामांनी । शपथ घेतली सर्वांदेखत । देह जहो राहो देशाप्रीत्यर्थ । तशी सर्वांनी केली शपथ ॥ बंदोबस्त करुनि रायगडी । निघाले तातडी । सेना फाकडी ठेउनी बाल शिवाजी किल्यांत । येसूबाई माता त्यांच्या सांगांत । चतुर मोठी होती राजकारणांत ( चाल १ ली ) झुल्पिकारखान रायगडी आला । जोराचा चढविला हल्ला ॥ बळकट रायगड किल्ला । नाही भेद त्याचा लागला ॥ सूर्याजी पिसाळ वश केला । सत्वर किल्ला घेतला ॥ ( चाल २ री ) दाविल्या स्वार्थी पिसाळानें शत्रूला वाटा । स्वार्थांध फिरवितो देशावर वरवंटा । पकडुनी नेले बालशिवाजी येसुबाई माता । ऐकुनी खवळले राजाराम ही वार्ता । लागले शत्रू त्यांच्याच पाठिशीं आतां । पन्हाळा गेला तत्काळ शत्रूच्या हातां । गडामागून गड शत्रूनें घेतले हातां ।( चाल मोडते ) बादशहा ह्मणे अंतरी । कामना पुरी । झाली खरोखरी । दख्खनदेश जिंकण्याची । शिवाजीवर सूड उगवण्याची । भरतभूमालक होण्याची ॥ २ ॥

## चौक ३ रा

खंडो बल्लाळ धनाजी संताजी । प्रल्हाद निराजी । खंडेराव गाजी । पातले सर्व रांगण्यावर । फौज जमऊनि झाले तय्यार । स्वामीरक्षण हाच निर्धार ॥ राजाराम रांगण्यावर । यवन पाठीवर होते चितातूर । सुचली तत्काळ नामी शक्कल ॥ वेषांतर करावे सर्वांनीं । राजाराम वाणी । ऐकुनी कर्णी । यात्रेकरु बनले सर्व सरदार । जिंजीगड होता मोठा आधार । जिंजीचा रस्ता धरिल सत्वर ( चाल १ ली ) बंगलूर गांवी मुक्काम । घेतला तेथें आराम । गांवच्या धर्मशाळेंत । मुक्काम त्याच वेषांत । सेवक पाणी घालीत । राजचरण होते चोळीत । राजाचे तेज पाहात । पाहुनी लोक चकीत ( चाल २ री ) संशय पाहूनी आला गांवच्या लोकांना । बोलत होते कानडी एकमेकांना । कानडी बोली ठाऊक होती थोडयांना । ऐकुनी खंडो बल्लाळ ह्मणे राजाला । बोभाटा होईल गावांत लागा मार्गाला । काढला पळ राजाने पाहून हेरांना । धावतो चांद पाहून राहुकेतूना ( चाल मोडते ) स्वामीनिष्ठ खंडोबल्लाळ । यवनांचा काळ । स्वराज्य तळमळ । प्राणाचें मोल स्वामी प्रीत्यर्थ । होळी स्वार्थाची केली निस्वार्थ । राहिला तेथे देशकार्यार्थ ॥ ३ ॥

## चौक ४ था

चौकीत वर्दी हेरांनी । दिली त्या क्षणी । सुभेदारांनी पलायन केलें धाव ठाकीत । मुसक्या बांधूनी नेलें चौकीत । तीन इसमास नेले ठोकीत ( कटाव ) तुम्ही कोण कुठें

चालला । कोठूनी आला । बाकीचे बोला । कोणत्या गांवाला कोणकोण गेला । चोरांनो बोला । वेळ चालला । सांगा आम्हांला । बोला बोला खरें नाही तर मुकाल प्राणाला ।। आम्ही गरीब यात्रेकरु खचित । लिंगायत जात । रामेश्वरी जात आमुच्या सांगात । गोसावी सात । होते मागत । पान विडा कात । वेळ लइ झाला । ते गेले कुठें तें ठाव नाही आम्हाला ।। सुभेदार ह्मणे हे चोर । दरोडेखोर । चाबकाचा मार । दिला अनिवार । दगड डोईवर । तोंडी भरपूर । राख कोंबून बुक्यांचा मारा अनिवार तोंड दाबून । तिन दिवस अन्नावाचून हाल सोसुन । हात जोडून । गयावया करून । यात्रेकरू म्हणुन । बोल बोलून । खातरी झाली । सर्वांची सुभेदारांनी सुटका केली ।। ( चाल १ ली ) उपाशी तीन दिवसांचे । सोडिले वाघाचे बच्चे । चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्म पदीहो नाचे ।। तोबरे खावे राखेंचे । स्वातंत्र्यपदी ते नाचे ( चाल २ रो ) पातले वायुवेगानें । स्वामीचरणांशीं । मन गेले आधि मग शरिर स्वामीपायाशीं । राजाराम त्यांना घेऊनी आले जिंजीस । तेथे येऊन केलें खलबत स्वामिनिष्टांसी । संताजी धनाजी सोडिले शत्रूपाठिशी । रामचंद्रपंत देशांत किल्ले पाहाणीशी । अष्टप्रधान दर्दी नेमिले राज्य व्यवस्थेशी वेवस्था केली जिंजीत खंडोजीनें खाशी । (चाल मोडते ) वेवस्था अशी सुंदर केली । भराभर । सर्व सरदार । मिळाले एका चढिस हो एक । मावळे स्वामिनिष्ठ अनेक । औरंग्यासारिके लोळविले कैक ।। ४ ।।

## चौक ५ वा

रामचंद्रपंत पटाईत। अंतर्व्यवस्थेत । महाराष्ट्रांत। मावळे जमा करूनी एक जूट । देश उध्वस्त केली लुटा लूट । यवनसैन्यांत दहशत फूट ॥ संताजी धनाजी खंबीर। वीर रणधीर। सैन्य भरपूर । ठोकिले यवन धरुनिया शिस्त । धान्याचे लुटले तांडे दरोबस्त । सळो की पळो यवन झाले त्रस्त ॥ राजाराम राजकारणी । मोठे धोरणी । ऐकुनी कर्णी । उकळला वसुल यवनमुलखांत । वतन मराठ्यांस त्याच मुलखांत। वतनानें यवन राजावर मात ॥ (कटाव १ ला) संताजी धनाजी जोडी । निघाली तातडी । गोदावरी थडी । शिस्त फार करडी। मावळे गडी । फौज फाकडी । घेति रणि उडी । पाहुनी यवन । हर हर महादेव बोलून केलें कंदन ॥ दोघांची झाली चकमक । यवन मस्तक । उडाली कैक । कैकाचें नाक । कान आणि मुख। कितीक नायक । तसेंच सहायक । आणि सैनिक । हजारोंवर । कापून केला यवनांच्या रक्ताचा पुरा। (कटाव २) मराठ्यांचा अचूक मारा। केला मुलुख उध्वस्त सारा । अन्नावाचुनि यवन सारा। झाला त्यांचा जीव घाबरा। धनाजीने यवन सामोरा। बादशहाचे तंबूवर मारा । तंबुच्या दोऱ्या करकरा। सोन्याचे कळस बारा । कापुन आला माघारा । असा धनाजीचा दरारा। कापे यवन थरथरा। घोड्याला सुद्धां दरारा। पाणी पाहुनी घोडा खरखरा। जमिन उकरी टाच भरभरा । पाहतो कावरा बावरा । मालक विचारी मैतरा । जलि दिसतो धनाजी कां खरा । मराठ्याचा असा उज्वल कीर्तीचा डंका ॥ ( चाल १ ली ) मराठ्यांचा

गनीमी कावा । यवनांस नव्हता हो ठावा ।। यवनानीं करावा मारा । मराठ्यांनीं करावा पोबारा ।। जाताच यवन माघारा। शिरकाण करिती चरचरा ।। ( चाल २ री ) पकडून यवन लूटला धान्याचा तांडा । जाऊन शत्रू तंबूत कापिला झेंडा ।। यवनांची दाढी कापूनी केला हो भुंडा । यवनाची केली दूर्दशा दरारा त्रीखंडा । पाऊस नाही अंधार देंशाचा वंदा। बैसुनि घोड्यावर खाति भाकर कांदा । हातांत बर्चीं तरवार धनुष्य खांदा । शत्रुची हड्डी नरम करण्याचा धंदा । ( चाल मोडते ) पराक्रम वर्णावा किती । यवन फजिती । त्याची नाही गणति । खवळला यवनराजा अनिवार । राजाराम पकडण्याचा निर्धार । धाडिले खासे खासे सरदार ।।५।।

**चौक ६ वा**

झुल्पिकार जिंजि वेढ्यांत । होता लढत । वर्षे पुरी सात । आलि मग फौज खाशी ताब्यांत । सिंह गवसला जणू जाळ्यांत । राजाराम तसा जिंजि किल्यांत ।। राजाराम सर्व सरदार । झाले चिंतातूर । शत्रुचा घेर । फोडूनि जाऊ ह्मणे देशांत । जबर मरांठ्यांची तेथे यवनांत । सातारा राजधानी झोकात ।। खंडो बल्लाळ म्हणें राजाला । सोडा चिंतेला । सिंह निसटला । जसा उंदीर साह्य घेऊन । तसे शिर्क्यांचे साह्य घेंऊन । जाऊं शत्रुचे जाळे तोडून । ( चाल १ ली ) तात्काळ शत्रुसैन्यांत । खंडोजी गेला निर्धास्त ।। जाऊनी शिर्के-गोटात । कळविला मनाचा हेत ।। शिर्के म्हणे खंडोजीपंत । तुम्ही वेडे आहांत ।। संभाजी होते करीत । शिरकाण डोळ्यांदेखत ।। होवो त्या कुळाचा अंत । मज नाही तयाची खंत । ( कटाव

१ ला ) खंडोजी म्हणे शिर्क्याला । ऐक वचनाला । माझ्या बापाला । संभाजीने दिला । हत्तीपायाला । पायाखाली मेला । मेला तो गेला । आम्ही हिंदु राज्यरक्षणीं झटतो या काला ।। तुम्ही त्याचे नातेवाईक । देशोद्धारक । कबिले सेवक । नेण्या झटा ऐका । असें कराल तरी वाजेल कीर्तीचा डंका ( कटाव २ रा ) शिर्क्याने केला मूजरा । धन्य धन्य खंडोजी वीरा । देशार्थ पाणी घरदारा । पितृघात विसरलां वैरा । मूर्तिमंत देशप्रेमी वीरा । स्वामिनिष्ठ तुझ्यासम दुसरा । त्रिभुवनी नसे चतुरा । विनवितो तुला मैतरा । दाभोळचे वतन उदारा । देतूंच माझा आसरा । स्वार्थांध जाणिना समया । दिलें वचन त्याच समयाला । झाला तयार शिर्का देशांत राजा नेण्याला । ( कटाव १ ला ) मध्यान रात्री समयाला । वसूदेव गेला घेऊन क्रुष्णाला ! जसा गोकुळाला । आनंद झाला । तसा राजाला । खंडोजीने नेला । सातारा शहराला । देवाने केली खैरात आनंद झाला । ( चाल २ री ) मदतीस खानाच्या सैन्य आलें धाऊन । खान चढला होता गर्वास सैन्य पाहून । सर केला किल्ला नेटाचा हल्ला चढवून । गर्वाचें घर परि होते खाली मागुन । घेतला गड परि सिंह गेला निसटून । या अल्ला म्हणति भिस्मिल्ला तोंड वासून । जसा चांद होतो मोकळा ग्रहण संपुन । राजाराम झालें मोकळें संकटातून । राजधानी केली सातारा तेव्हांपासून ( चाल मोडते ) आनंदी आनंद झाला । सर्व जनतेला । पाहून राजाला । जयाचा चरणरजाचा वास । लाभतो आत्माराम-तनयास । आणि या महाराष्ट्र देशास ।।

# कल्याण-खजिना

धन्य धन्य शिवाजी राजे । दिगंती गाजे । उदाहरण ताजें । स्वतंत्र्य ध्वजा महाराष्ट्रांत । लाविली अवघ्या पाव शतकात । याला नाही जोड अखिल जगतांत ।। स्वातंत्र्य सूर्य उगवला । महाराष्ट्राला । आनंद झाला । शिवप्रभु घेउनी अवतारास । येउनी दास्यतिमीर विलया । काटशह दिला अदिलशाहास ।। ग्रहमाला जशी सूर्यास । तशी शिवबास शोभते खास । तानाजी बाजी रत्नाची खाण । सिद्ध शिवबास अर्पण्या प्राण । ज्याने यवनाची केली धुळधाण ।। सूर्याची आकर्षण शक्ति । ग्रहा फिरविती । सूर्याभोवती । तशी शिवबाच्या भोवती खास । लोकसंग्रह शक्ति वीरास । स्फूर्ति देत असें देशकार्यास ।।

( चाल १ ) स्वातंत्र्य प्रेम तरुणांत । शिवबानें केले जागृत ।। स्वातंत्र्य ज्योत तरुणात । फुलविली महाराष्ट्रात ।। तरुणास वेड स्वातंत्र्य । तरुणांस स्वप्नस्वातंत्र्य ।। स्वातंत्र्य समर करण्यांत । लागली होड वीरांत ।। स्वातंत्र्य देवी पदी हात । ठेवुनी करिती शपथ ।। धरणीस पडेपर्यन्त । करणार युद्ध सतत ।। स्वातंत्र्य मिळेपर्यंत देह झिजवू राष्ट्रकार्यात ।। रक्ताचे सडे समरांत । वाहवू रक्ताचे पाट ।। एक दिल असे समस्त । मिळुनिया ठरविला बेत ।। छातीचा करुनिया कोट । फोडिला तोरणा तट । तोरणा घेउनी हातांत स्वातंत्र्य तोरण त्यात । तात्काळ भवानी माता शिवबाचे आली स्वप्नांत ।। किल्याचे तटबंदीत । धन विपुल

आहे निश्चत ॥ शिवबाचे आलें हातात । धन अमित तटबंदीत तात्काळ तरुण अगणीत । स्वखुषीने आले सैन्यांत । सक्तीनें । नव्हते करीत । इंग्रजासम रिक्रूट ।। कल्याण शत्रुचा प्रांत घेण्याचा ठरविला बेत । घेणार शत्रुचा प्रांत । दरोडेखोर म्हणतात । होताच यशस्वी मात । त्यासच राजा म्हणतात ।।

( चाल २ ) देशार्थ शत्रुमुलखात उकळणे कर । राज्यांत स्वतःच्या उकळूं नयें कधि कर । देशात सर्व खाणारे कांदा भाकर । तनमन देशा अर्पूनी झाले चाकर । यासाठी स्वदेशा लादू नये कधी कर । असे होत लुटारु शिवबा मनाचे थोर । वरी उग्र परी अंतरीं दयासागर । वात्सल्य स्वपुत्रासम केलें प्रजेवर । ऐका ऐका दयाळु नोकरशाहीचा कर ! झाडुनी साऱ्या हिंदूना केलें नोकर । इंग्रजी कायदा सुधारणेचा कहर । शिरकवुनी कर देशांत उकळणें कर । किती मऊ भूमि लागते खुपसा कोपर कागदी करुनी रिपोर्ट वाढला कर । युद्धाची वेळ येतांच पालटे नूर । स्वातंत्र्य देतो तुम्हांस चला सत्वर । सक्तीनें व्यक्तीपासून घ्यावे वारलान । सक्तीनें नेले ओढीत तरुण घरोघर शिवबाचे तुम्ही मावळे लढवय्ये वीर । चणे खाऊन तुम्ही राहतां मराठे शूर । आम्ही गोरे पाव बिस्कूट रोटी खाणार । युद्धात मराठा सर्व तोफे पुढार । राहतो तुमच्या रक्षणा मागें आम्ही शूर । संपले युद्ध या सुधारणेचा वर । नीतींत इंग्रजी नीती आहे खरोखर । वरी वरी दिसते निर्मळ अंतर काळ । हृदीं हलाहल जिव्हाग्री मधाचे पोळे । यास्तव झाला लुटारू शिवबा वीर । राज्येंच्या राज्यें चावूनी होतीना चोर । होतील चोर येतांच चोरावर मोर । शिवबाचे नाहीं येणार केंसाची सर ।

चाल ...... कोंदणी हिऱ्याचा थाट । तसा तरुणांत । शिवाजि सम्राट । समर गर्जना ज्याची युद्धांत । घुमे कर्णात सतत मराठ्यांत । निपुण जे सर्व गनिमी काव्यांत ॥ विजापूरशहा अस्वस्थ । ऐकुनी वृत्त । जाहला त्रस्त । मुल्लाना अहमद सरदार । कल्याणप्रांताचा होता सुभेदार । आला सत्वर घेण्या समाचार ॥ कल्याण खजिना नेण्यास । विजापुरास । सोडला त्यास । हुकूम हें वृत्त गुप्त सकळास । भिंतीचे कान ऐकती खास । तत्व हें ठावे नाही कवणांस । कल्याण खजिना जाणार । गुप्त समाचार सांगती हेर । ऐकुनी शिवबा झाले तयार । खजिना लुटण्याचा केला निर्धार । धाडिला आबाजी हा सरदार ॥

चाल १– सुभेदार वसुल घेऊन । चालला उंट भरुन ॥ वरि वित्त विपुल लादून । चालले उन्ट वाकून ।, हत्यारबंद शिपाइ भोवतून । चालले चांदण्यातून ॥ आबाजी खजिना पाहून । तात्काळ गेला हरकून ॥

चाल– २ मावळे मागे आबाजी पुढें पुढीयार । रोखिला मार्ग यवनांचा त्यानें सत्वर । बैसला आबाजी दबा धरुन चौफेर । साधून किरण बैसतो व्याघ्र दरिवर । येताच भक्ष पकडीत सुटावा तीर । फोडतो नरडे प्राशून टाकितो रूधिर । धावला तसा आबाजी मुल्लानावर । दोघांची झाली चकमक समोरासमोर । मावळे सर्व धावले फोडला घेर ॥

( चाल कटाव ) चकमकती विजा गगनांत । तशा सेन्यांत । कट्यार हातांत । मराठे लोकांत तृषा सर्वांत । शत्रु

सधिरांत । आणि मांसात । कराव्या पूत । नग्न तरवारी, अर्पण्या सिद्ध शिरकमल भवानी पायी ।।

जाहले युद्ध घनघोर । यवन बेजार । जाहले फार कैक सरदार । आणि लढणार । करुनिया ठार । केला सभोवार । रक्ताचा पूर । त्यांत चौफर । यवन शिरकमल । जणु रूधिर तटाकीं कमळें आली लाल ।।

मावळे घुसले सैन्यांत । यवनावर मात । केली लुटालूट । पाहून फूट । पळविले उंट । गोण्यासकट । बीनबोभाट । पळविले थेट । शिवाजीपाशी । देशार्थ म्हणती आणिल्या राशी ।।

आबाजीने यवन चौफेर । पळविले दूर । त्यांत सुभेदार । केला गिरफदार । आणि सुंदर । पकडिली नार । जिचा भ्रतार पुत्र सुभेदार । रूपमनोहर । यौवन भर । जणू सुरनार । अशा रमणीला पाहुनी नाही जो भुलत तोची जगी विरळा ।।

(चाल मो.) आबाजीने खजिना लुटला । यवन कापला । उध्वस्त केला । प्रांत कल्याण आला हातांत । वाढली युद्धतृष्ण सर्व मराठ्यात । मोद मावेना त्याचा गगनांत ।। पकडूनी सुभेदाराला । आणि यवनीला । घेउनी गेला । ऐकुनी सर्व समरवृत्तास । शिवाजी म्हणे भले शाबास ।। सुभेदार जसा कांही चोर । शिवाजी समोर नंदीसम स्थिर । नंदिला वाचा नाहि परी यास । वाचा आहे ह्मणुनि विनवि शिवबास । सांब शिवबांनें मुक्त केले त्यांस ।। कल्याणसुभेदार केला । आबाजीपंताला । बाकी फौजला। पाहुनी ज्याचे त्याचे शौर्यास।। ढालतलवार धनामानास ।

देऊनी खूष केलें सकळांस ॥

(चाल १) आबाजीनें रूपवती बाला । अर्पण केली शिव बाला ॥ संतुष्ट करूनि शिवबाला । मिळविण्या धनामानाला ॥ अन्तरी धरूनी हेतूला । स्वार्थाचे पडे मोहाला ॥

(कटाव १) पाहुनी बिजली सम रमणि । जाहले मनी मोहवश क्षणी । सर्व ते स्थानि । परी ती रमणी । गेली घाबरूनि । पाहूनी धरणि । आणिते नयनि । टपटपा पाणी । न्हाणि धरणीस । प्रार्थिते रक्षि हे धरणि करी करणीस ॥

(कटाव २) निस्वार्थ नीतीमानाला अर्पूनि परस्त्री त्याला । समजून आत्मसम त्याला । कलंकित त्याला करण्याला । स्वार्थान्ध सिद्ध जो झाला । बघुनियावरती सूर्याला । थुंकण्या तयार झाला । त्याचा थुंका त्याच्यावर आला । कधी सूर्य कलंकित झाला असे घडेल काही बोला बोला । निस्वार्थी मानव विरळा । असामान्य नीतीमत्तेला । जागृत ठेवी सदरेला । बाळगी अतुल धैर्याला । जगी वंद्य तोच जाहला । आशा शिवाजि नितिमानाला । जै सिद्ध झाला करण्याला । मंबाजी तुकारामाला । मोहीत अर्पुनी त्याला । लावण्यवती नारिला । तुकाराम नीतीचा पुतळा । हरिभक्त डंका गाजला । देवाचा लाडका त्याला । पाडतो कोण मोहाला । थेट तस्सा प्रसंग झाला । अर्पण्या आबाजी गेला । सौंदर्यवती रमणिला लज्जयुक्त यवनीला । पाहुनीया त्या नारीला । नत शिवाजी राजा झाला ।।

(चाल २) शिवराज म्हणें आबाजि सोनदेवाला । लाभते असे सुस्वरुप माझे मातेला । सुस्वरूप मीही जन्मलो । असतो

मातेला जागृत ठेवि किर्ति थोर नीतिमत्तेला । यास्तव नीतिचा ध्वज वैकुन्ठि गेला । पोचती केली तात्काळ यावनी स्त्रीला । देऊनी उंची भूषण आणि वस्त्राला । बैसुनी पालखीमाजि गेलि सासरला । माहेरि आल्यासारखे झाले त्या स्त्रीला । असा नीतिमान शिवराज जगी गाजला । धन्य तो भुलत जो नाहि कनक कांतेला मोठे मोठे उतरले नाही या कसोटीला । साठ हजार वर्षे संपुर्ण केले तपाला । परि विश्वामित्र मेनकेला भुलुनिया गेला । पडतात असे परनारीच्या मोहाला । रावणासारीखा घाला येतो वाटयाला । जाणती सूज्ञ परनार विषाचा पेला जाहला पूर्ण उतीर्ण कसोटीला । नीतीमान शिवबा म्हणुनी डंका गाजला ।। (चाल मोड) सूर्याची प्रभा फाकते । दिगंती जाते । जगात चालते । तशी शिवबाचि किर्ति जगतात । भरुनि राहिलि महाराष्ट्रांत म्हणुनि स्वातंत्र्य सूर्यशिव ख्यात ।।

**

# झाशीची राणी इचा पोवाडा

चौक १

लक्ष्मी देवी आली भूवरी स्वर्ग सोडोनी । जणू वीज गगनिची आली वाटे कडकडूनी । स्वातंत्र्य देवि जणू आली वाटे अवतरुनी । भरघाव घोडा फेकित । इंग्रजा चिरीत, धन्य ती आली, झाशिची राणी ॥ जी ॥

जशी यावी शुक्र चांदणी । सरसरत गगनीं । झाशिची राणी । करण्यां मायभूचें दास्यमोचन । चरित्र पहा जरा उघडा लोचन । गुणाचे करुन घ्यावे शोधन ॥ १ ॥

लक्ष्मीबाई झाशीची राणी । नांव त्रिभुवनीं स्वातंत्र्यचरणीं। बिजलीसम गाजविली तलवार । रणांगणीं केला शत्रू संहार । इंग्रजा धडकी भरली अनिवार ॥ २ ॥

बाई असोनी भव्य मर्दानी । होति देखणी । जणू हिरकणी । रोहिणी जशी शोभे चंद्रास । लक्ष्मीबाई तशी गंगाधर पंतास । अतुल ज्यांची कीर्ति भरतखंडास ॥ ३ ॥

शिक्षण तिला बापाचें । क्षात्र तेजाचें । वीर वृत्तीचें । म्हणून परतंत्र देश पाहून । कृष्ण कृत्यें इंग्रजांचीं निरखून । बाईचें हृदय गेलें करपून ॥ ४ ॥

चाल १:– बावीस उमर बाईचें । तारुण्य मुसमुसें साचें ॥
दांडपट्टा भाला फेकीचें । कौशल्य अजब बाईचें ॥
दुर्दैव तोंच बाईचें । वैधव्य पदरीं येण्याचे ॥
नाहीं मिळाले सौख्य पुत्राचे । आयुष्य गेलें दुःखाचें ॥

चाल २:– भर्त्यानें पुत्र दत्तक मृत्युसमयाला ॥
कारभार त्याच्या नावानें केला ॥

सरकारनें परी दत्तक नामंजूर केला ॥
पार्लमेंटकडे राणीने अर्ज ठोकला ॥
उपयोग त्याचा राणीला नाहीं पर झाला ॥
होईल कसा इंग्रजांचा स्वार्थ वाढला ॥
दरबार राणीचा इंग्रजांने भरविला ॥
जाहीर केले खालसा मुलुख हा केला ॥
अशी कैक राज्यें खालसा केली त्या काला ॥
ऐकुनि प्रजा राणीची ढाळी अश्रुला ॥
प्रतिपाळ स्वपुत्रासम राणीनें केला ॥
यास्तव सरकारचा राग प्रजेला आला । जी ॥

चाल ३ :– इंग्रजी लोकांचा कावा । ख्रिस्ती हा देश बनवावा । हिंदुंना जाहला लावा । दुहेरी दावा । त्यामुळे पेटला वणवा ॥ काडतूसें दिली हातांत । गाईची चरबी ज्या दाट । घालुनि तींच तोंडात । तोडा झटक्यांत । ऑर्डर अशी शिपायांत ॥ ॥ शिपायास कपाळी गंध । लावण्या केला प्रतिबंध । ज्यांना शिक्षणाचा नाही गंध । तोडिला बंध । हिंदु धर्मांध ॥ मंगलपांड्याने केला । बंडाचा ओनामा पहिला । अधिकारी गोरा ठार केला । यास्तव त्या दिला सर्वांपुढे फासाला ॥

चा. मो. – नाखुष इंग्रजी राज्याला । प्रजाजन झाला । फार योग्य संधीची पाहती वाट । तोच स्वातंत्र्य युद्धाची लाट । उसळला सर्व हिंदुस्थानांत ॥

चौक २

सरकार करिल धर्मभ्रष्ट । तयाला नष्ट । कराया स्पष्ट । झाले तयार सर्व देशांत । गोरा दिसला तो ठार करण्यांत । गुंतले तरुण

सूड घेण्यांत ॥ तुरुंगाची दारे फोडून । दिले सोडून । लोक जमवून । तात्या टोप्यास केलें पुढियार । सेनापती नाना पेशव्यांचा प्यार । ज्यानेइंग्रजा केलें बेजार ॥ कानपूर हातीं घेऊन । विजय मिळवून झेंडा रोवून । सर्व गोऱ्यास दिले हाकलून । जाउ लागतां गंगा उतरून । ठार केलें कैक गोळ्या घालून ॥

चाल १ :– हॅवलाक वृत्त ऐकून । तात्काळ गेला खवळून ।।
धावला सैन्य घेवून । दिला हल्ला तेथें चढवून ॥
कबजांत कानपूर घेवून । कत्तल केली सपाटून ॥

कटाव ४– अमानूष नील साहेबानें, होउनी बेभान, केली जोराने, राक्षसी कत्तल कानपुराला, जो जो तेथे दिसला बंडवावाला, ठार तात्काळ त्यांस केला, बंडवाल्याचा सूड घेतला, प्रेतांचा खच तेथे झाला, रक्ताचा पूर वाहू लागला, एवढ्याने शांत नाही झाला, मोर्चा बीबी घरावर आला, ऐका तिथें प्रकार काय झाला, रक्ताचा थेंब सांडलेला, चाटण्याचा हुकूम त्यांनी केला, आधी चाटा नाही तर प्राणाला, मुकावे लागेल याच काला, काही लोक जिवावर उदार झाला, चाटणार नाही त्यास बोलला, ठार केले त्यांना त्याच क्षणाला, कैक असा तेथे ठार केला, कैकांचा छळ त्यांनी केला कृत्ये अशीं करणाराचा पुतळा, तुमच्या उरावर त्यांनी बांधला, इंग्रज आहे असा नीतिवाला, डंका जगभर त्याचा गाजला, दादा दादार जी जी दाजा ॥

चाल २ – नाना साहेब आले काल्पीला घेऊनी टोप्याला ।
सैन्याचा पुन्हा जमाव दोघांनी हो केला ।
झाशिची राणी अंतस्थ होती सहाय्याला ।
संशय असा राणीचा सरकारला आला ।

बाई पाहून इंग्रज हल्ला करण्यास धावला ।
इंग्रजाने झाशि किल्ल्यास वेढा घातला ।

चाल ४– बाई असोनि इंग्रजावर घऊनि हाति तलवार । स्वातंत्र्य युद्धा तयार । झाली सत्वर । जमविला लोक अनिवार ॥

तुम्ही यावे सैन्य घेऊन । टोप्यास असें सांगून । करते मी मारा वरतून । तुम्ही खालून । इंग्रजा टाकू चिरडून । झाशिच्या किल्यावर हल्ला । सर ह्युरोजनें चढविला । तोफेचा मोर्चा बांधला । चारी बाजुला । तोफांचा धडाका सुरू केला ॥

चाल मोडत

गोळ्यांचा वर्षाव केला । डाव परि फसला । गोळा नाहीं गेला । एकही तोफेच्या किल्ल्यांत । पाहुनि खजिल झाला चित्तांत । सर ह्यूरोज म्हणे जाहला घात ॥ जी ।

चौक ३ रा

राणीने किल्ल्यावरतून । तोफा डागून । हल्ला चढवून । तोफखाना त्यांचा बंद पाडून । इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवून । पाणी इंग्रजा पाजल पाडून ॥

आशेचा किरण इतुक्यांत । इंग्रज सैन्यांत । आला जोरात । तोफेचा गोळा गेला तटावर । पाडून खिंडार मार्ग सत्वर । इंग्रजा पाहुनि वाटला धीर ॥ जी ॥

इंग्रज त्याच मार्गान । घुसला जोरान । परी बाईन । स्वतः त्यावर हल्ला चढवून नेले रेटीत सैन्य कापून । ऐकां वर्णन लक्ष देऊन ॥

चाल १– झाडून साऱ्या लोकाला । बाईनें नेले युद्धाला ॥
भय नाहीं तिच्या चित्ताला । सैन्याच्या गेली सदरेला ॥
कापते बिजली मेघाला । कापिले तसे शत्रूला ॥

कटाव १ घेऊनी हाती तलवार । आली तटावर । जणु सुस्वार । देऊनी धीर । म्हणे सत्वर । बोला हर हर । शत्रू संहार । करुं भराभर । जा तरी लाज । झाशीची कोण राखील बोला हो आज ॥ घेउनि स्त्रिया बरोबर । घुसली ती नार फिरली तलवार । चमकली धार । गोरा केला ठार । विजय त्या दिवशी दाउनि । शौर्य राणिनें राखिली झाशी ॥ खिंडार पाहुनी भिती, राणिच्या चित्तीं, शत्रूची होती, म्हणुन त्या रातीं, तटाच्या भिंती, बांधुनि केला, शत्रूचा मार्ग तो बंद एका रात्रीला ॥ ५ ॥

चाल २– खिंडार बंद पाहूनी चकित रिपु झाला ।
तारीफ बाईची केली शत्रूनें काला ॥
इतक्यात सैन्य घेऊनि तात्या टोपे आला ।
तात्यांस पाहुनी आनंद बाईला झाला ।
जीवास जीव देणारा जणु भेटला ।
परि सर ह्युरोज पाहुनी सैन्य चरकला ।
इंग्रज परि संकटी नाही डगमगला ।
धैर्यानें तोंड तात्यास दिले झटक्याला ।
बाजार बुणगा सैन्यात तात्याच्या भरला ।
नेटाचा हल्ला इंग्रजानें जवा चढविला ।
सैरावैरा तात्याचा लोक धावू लागला ।

तात्याचा धीर पार त्याचमुळे हो खचला ।
तात्काळ काल्पीचा मार्ग त्यानें सुधारिला
बाईनें परि धैर्यानें किल्ला लढविला ।

चाल ४– टोप्याच्या तोफा बंदुका । इंग्रजाला मिळाल्या फुका झाडुनी त्याच बंदुका ठार केले लोका, याच्याहि पुढची मजा ऐका ॥ जी ॥ तोफेचा मोर्चा चुकलेला, दावण्या कोण पुढे आला, हिंदुच फितुर ना झाला, त्यामुळे गेला, किल्लाच शत्रू हाताला ॥ जी ॥ इंग्रजानें झांशी गांवात, केली फितुरी जावून लोकांत, त्यासाठी यत्न अटोकात, पैसा खर्चीता फितुर हातांत ॥ जी ॥

चाल मोडते– येताच फितुर हातात । बाईवर मात । केली जोरात । इंग्रजाने हल्ला पुन्हा चढवून । तोफेंचे मोर्चे पुन्हा बांधून । चार बाजूने सैन्य धाडून । जी ॥

चौक ४ था

इंग्रजाने तोफेचा पल्ला । पाहुन सुरु केला । चौफेर हल्ला । तोफेंचे गोळे पाहूनी किल्यांत । सर ह्युरोज म्हणे आता इतुक्यात । झाशीचा किल्ला घेतो कब्जात ॥ जी ॥

वर्षाव गोळ्यांचा झाला । इंग्रज मातला । आग डोंबाळा । झाशी किल्यात सर्व झाला । ज्वालामुखी जणु जागृत झाला । बाईचा धीर पार सुटला जी ॥

चाल १ किल्ल्यांत पहावें जिकडे । तोफांचे गोळे चहूकडे ।
त्यामुळें मोठाले वाडे । जमिन दोस्त झाले ओसाडे ॥
बाईचे हृदय गडबडे । ऐकूनि बालकांचे रडें ॥

चाल २ विझविण्या आग धांवली बाई किल्ल्यांत ।
घेऊनी लोक विझविण्या केली शीकस्त ।
परी नाही जाहली सर्व आग ती शांत ।
अंबर फाटले तिथे ठिगळ काय करत ॥

कटाव १– बाई म्हणे फितुराने घात, केला निश्चीत, नाही धडगत, परी शिकस्त, यत्न अटोकाट, करु जोरांत, भिती तिळमात्र, नाही हृदयात, धैर्याची पुतळी, हरमहादेव ठोकळी तिने आरोळी ॥ जी ॥

कटाव ४– दोघांची झाली खडाजंगी, सेना चतुरंगी, सामना चौरंगी, झाली सुरवातही युद्धाला, एकमेकांने हल्ला केला, तोफांचा धडाका सुरु झाला, गोळ्यांचा पाऊस तेथे पडला, मुंग्या परी लोक ठार केला, शिकस्तीचा हल्ला बाईनें केला, दिवसभर सारा लोक लढला, पोट बांधूनी लोक लढला, कसुर नाही केली हो लढचाला, नाहीं परि कोणि कोणास हटला, बाईचा लोक फार मेला, प्रेतांचा ढीग हो किल्याला, बाईन विचार रात्री केला, ऐका तुम्ही दादा. ॥ राणीने लोक जमविला, विचार करण्याला राजवाडचाला तोच बगा काय प्रसंग घडला, वाडचावर गोळा एक पडला, मजले फोडून खाली आला, इजेचा कडकडाट झाला, आगीचा लोळ जणू उठला, राणी शेजारी येवू लागला, राणीचा पराण जाण्याला, वेळ काही नव्हता प्रसंगाला, देवपरि धावला साहाय्याला, राणीचा प्राण वाचवीला, देव जिला साह्य प्रसंगाला, कोण मारील ठार तिजला, राणी आली घेऊन लोकाला, वाडया-बाहेर मैदानाला, विचार करण्यास वेळ कुठला, लोक म्हणाले राणी साहेबाला, फितुर जिथ वश इंग्रजाला, निभाव तिथं लगेच काय आपुला, आपण जाऊ आतांच काल्पीला, बाई

म्हणे भेद फार केला, तिजोरिच्या किल्या मिळाल्या त्याला, मोर्चाच्या जागा कोणी दावल्या, दुष्टपणा असा कोणी केला, देशावर निखारा कोणी ठेवला, देशद्रोही अशा दुष्टांना ठार करा आतांच्या आता त्याला, राणीला क्रोध फार आला, राग तिचा अनावर झाला, रागाने देह लाल झाला, प्रसंग जाणून केला क्रोध तिनें पार आवरीला, बेत काल्पीचा कायम केला, त्यावेळी दादा ॥ जी जी ॥

चाल मोडते – बाईने केली शिकस्त । नाही आटोपत । इंग्रज युद्धांत । लोक म्हणे जावू किल्ला सोडून । पलिकडे शत्रू फळी फोडून । रात्रीच्या वेळी बेत ठरवून ॥ जी जी ॥

चौक ५

बाई असून झाली तय्यार । चतुर ती नार । घोड्यावर स्वार । घेवूनीं हाती नंगी तलवार । पुत्र पाठीशी प्राणाहून प्यार । चालली करीत शत्रूसंहार ॥ जी जी ॥

काळाच्या तावडीतून । गेली निसटून । घोडा उडवून । बिजली जशी जाते मेघ भेदून । गेली तशी शत्रू फळी फोडून । शत्रूच्या हातीं तुरी देवून ॥ जी ॥

लक्ष्मीबाई एका रातीत । घोडा उडवीत । आली काल्पींत । बाईचें पाहून धैर्य अलोट । शत्रु तोंडात घालतो बोट । गेली छातीचा करुनीया कोट ॥ जी ।

चाल १ :– बाहेर जाता सिंहीण । आपल्या गुहे मधून ।
पारध्याने तेथे येऊन । टाकावी पिलें मारुन ।
राणीचे तसे प्रजानन । ठार केले गोळ्या घालून ।
धन नेले त्यांनी लुबाडून । बायाहि कैक पळवून ।

असें शौर्य तेथें दावून । आम्ही विजयी म्हणे तोऱ्याने ।

चाल २ :– तारीफ केली बाईची नानासाहेबानं ।
बाई म्हणे गप्पा मग शत्रू आला मागून ।
इंग्रजांची आली इतक्यात फौज धावून ।
पराभव केला नानाचा तेथे इंग्रजानं ।
ग्वाल्हेरकडे जावू या सर्व मिळून ।
राणीने असें सुचवितां गेले झटक्याने ।
शिंदे तय्यार असें सहाय्यास पाहून ।
शिंद्याची फौज घेतली सामील करुन ।
होतांच पराभव शिंदे गेला पळून ।
ग्वाल्हेरला आले इंग्रज त्याला घेऊन ॥

चाल ४ :– ग्वाल्हेरचा विजय पाहून । नानासाहेब गेले हुरळून । उत्सव केला जोराने । पेशवे म्हणून । खाण्यात गुंग पक्वान्ने । बाई बोले त्यांना रागाने । तुम्ही असे लाडू खावून । पराभव घ्याल करून इंग्रजांकडून । पश्चाताप होईल मागून ॥ असे म्हणून बाई झटक्याने । शत्रूची चाहूल ऐकून । भरधाव घोडा फेकून सैन्य घेऊन । मांडणी केली हुषारीने ॥ जी ॥

चाल मो. – सैन्याचा असा बंदोबस्त । केला दरोबस्त करून शीकस्त । पाहूनी नाना म्हणे बाईस । सेनापती तुम्ही याच संधीस काळिमा नाही तुमच्या कीर्तीस ॥ जी ॥

चौक ६

तात्काळ चारी बाजूस, नानासाहेबास, तात्या टोप्यास, राहिल्या दोन बाजू घेउन । स्वतः तोफेचे मोर्चे बांधुन । सर्व सैन्यास सांगे निक्षून ।। जी ।।

कटाव १ – हातात नंगी तलवार, घोड्यावर स्वार, पोषाख रुबाबदार करुन ती नार, लढण्या तय्यार, स्वातंत्र्य देवी, येऊनी तेथे जणु युद्धकर्णा वाजवी ।। जी ।।

कटाव १– हातात नंगी तलवार, घोड्यावर स्वार, पोषाख रुबाबदार करुन ती नार, लढण्या तय्यार, स्वातंत्र्य देवी, येऊनि तेथें जणु, युद्धकर्णा वाजवी ।। जी ।। देशार्थ करु बलिदान अर्पुया प्राण, करु धुळ धाण, शत्रू शिरकाण, तरिच स्वातंत्र्य, नातरी देश होईल खास परतंत्र ।। जी ।। सेनापति सर हुरोज. प्रचंड फौज समरिं तरबेज, पाहुनि अंदाज, म्हणे करुं मौज, आज युद्धांत, जमिनदोस्त करुन टाकतो सर्व इतुक्यांत ।। जी ।। युद्धास झाली सुरवात, तारा गगनांत, जशा दिसतात, खड्गं हातांत, तसे दिसतात, आणि सैन्यांत लक्ष्मिबाई त्यांत, जणू गगनांत. शोभे चंद्रकोर, चमकत होती सैन्यात चतुर ती नार ।।

कटाव ४– दोघांची झाली खटपट, केली जोरांत, कत्तल सरसकट, गोळ्यांचा पाउस तेथे झाला, तोफांचा धडाका सुरु झाला, हिंदु हिंदुला कापू लागला, एक रक्ताचा विसर पडला, इंग्रजासाठी लढुं लागला, उडवि शिरकमल आस्मानाला, असा

संहार फार झाला, तात्या टोप्यास हटविण्याला, इंग्रजाने हल्ला जवा केला, लोक तात्याचा पळूं लागला, पाहुनि बाईने सवाल केला, त्यावेळी ।। दादा ।।

बाई म्हणे त्यांना त्वेषांत, कोठे इतक्यांत, जाता नरकांत, देशाचा नाश हो करण्याला, पळून कां जातां हो नरकाला, मर्द तुम्ही मराठा जातिवाला, मराठा कधी पळून नाहीं गेला, पराभव ठावा नाही त्याला, भागूबाई सारखे हो पळण्याला, लाज कां नाही हो तुम्हाला, खड्ग द्या फेकुन धरणीला, भरा बांगडया याच काला, पळून जा मग तुम्ही घरला, ऐकुनि मागे लोक फिरला, बाईने जोराचा हल्ला केला, नेले रेटीत इंग्रजाला, देश-द्रोही धाडीले स्वर्गाला, बाईन ।। दादा ।।

कटाव २– इंग्रजाने चौफेर हल्ला, बाई एकटी पाहूनि केला।
नानासाहेब पळूं लागला, तात्या टोपे त्याच मार्गाला ।
शिकस्तीचा हल्ला एक केला, एकटी करील काय बोला।
बाईचा धीर पार गेला, रक्तानें देह लाल झाला ।
धडगत नाही या काला, मी आहे जातिची अबला।
पराजय आहे ठरलेला, परक्याचा स्पर्श देहाला।
होईल म्हणून बाजूला, बाईनें घोडा काढला।
दौडत घोडा चालला, पाणी पाहुन घोडा थबकला।
बाईचा घात तवा झाला, देशाचा घात बघा झाला।
विजेमागे जशी मेघामाला, तसा शत्रू मागे धांवला।
काळाने पाश टाकला, शत्रूनें भाला मारला।

बाईचा डोळा पार गेला, बाहेर येवून लोंबु लागला।
बाई तात्काळ आली धरणीला, शत्रूचा सूड घेण्याला।
विश्वासू स्वार धावला, शत्रूला त्यानें निजविला।
बाईला मग बोलला, बांधितो तुमच्या जखमेला।
बाई म्हणे शत्रू पाठीला, नाहीं दिसत तुमच्या डोळ्याला।
गंजित टाकुनि मला, पेटवा त्वरित गंजीला।
बोलती तोच प्राण गेला, देशार्थ प्राण देणारी धन्य ती
अबला।
स्वार्गीची लक्ष्मी जणूं, गेली पुन्हा स्वर्गाला ॥ जी ॥

❋❋

# हुतात्मा
# बाबू गेनू याचा पोवाडा

धन्य बाबू गेनू यान् झेंडा जगतांत। लावोनिया झाला ख्यात।साऱ्या मुंबई शहरांत। पिकेंटिंग करण्यांत। केलि सर्वावर मात प्रियप्राण नसति कोणास। अर्पिले देश कार्यास ।।
धन्य झाली माय बाबुरावाला प्रसवून। गेले कुळ उद्धरून हाक भूमिची ऐकून। गेला तात्काळ धाऊन। तिचे पांग हो फेडून। जाहला वंद्य सकळास। या सर्व भरतखंडास ।।

चाल:– महाळुंगे पुणें प्रांतांत। सुंदर गाव हो त्यांत ।। एकोणिसशे आठ सालांत। जन्मला बाबु विख्यात। शिक्षण दहा वर्षांत। जाहलें त्याच गांवांत। पंतोजि गोपिनाथ पंत। शिकविले ज्यांनी भारत ।। इतक्यात दिवंगत तात। बाबूचा जाहला घात ।।

चाल:– शिक्षण थोडें झालें होते परंतु संस्कार। उच्च जाहला होता त्याचे अंतरंगीं फार ।। ऐकुनिया शिवचरित्र त्याला वाटे हुरहूर। दास्यमुक्त भूमाता करण्या जावे सत्वर ।। शेतीवरचें लक्ष उडाले पाहुनीया माय। रागावुनि बोलली काळजी आहे तुज काय ।। बाबु म्हणे आईस आमची माय असे दास्यांत। मुक्त कराया जातो आतां पाडु नको पाशांत ।। सर्व संग सोडुनी महात्मा बैरागी झाला। कायदे-भंग सुरवात कराया दांडीला गेला ।। स्वातंत्र्याविण आश्रमि पुनरपि नाही येणार। ऐशि प्रतिज्ञा करुनि हलविला देश खरोखर ।। हाक गांधिची ऐकुनि जाणें

कर्तव्यचि माझें । कर्तव्याच्या आड नको हें वात्सल्यचि तुझे ।। ऐकुनि उत्तर माय बोलली जाऊ नको बाळ । आठरा विश्वे दारिद्राचा कंठु कसा काळ ।। दूर कराया या दैन्याला गांधी अवतरला काय करिल तो अनुयायाविण या दारिद्राला ।। तळ हातावरी शीर घेऊनी मावळा तयार झाला । त्यांच्या मदतिनें घेता आलें स्वराज्य शिवबाला ।। आण गळयाची बाबू तुजला जाऊ नको आता । परोपरीने विनवु लागली बाबूला माता ।। माय भूमिची हाक कां आईची आतां कर्तव्या कर्तव्यतेचा पेच पडे चिता ।।

चाल मोडतेः– त्याच राति विचार येति बाबूच्या डोक्यांत । झोप येईना निवांत । बेत करूनि मनांत ।चालू लागे रातोरात कायदेभंग वणव्यांत । काळास तोंड देण्यास । मारुनी लाथ सौख्यास ।। जी ।।

चौक २

चाल मोडतेः– बाबू गेनू आला भांडून मुंबई शहरांत । सत्याग्रह शिबिरांत । वडाळचाच्या सेवकांत । नांव घालोनिया त्यांत । मिठागरांवर मात । करुनिया दावि शौर्यास । तत्क्षणी पकडले त्यास जी ।। सहा महिने झालि शिक्षा नेले येरोडायास । भिती नसे अंतरास । हाल भोगोनिया. खास । आला महाळूंगे गांवांस । मातोश्रीला भेटायास । भेटोनी गेला तत्काळ । हो पातला निकट तो काळ ।।

चाल बदलून :– स्वातंत्र्याच्या धर्मसंगरीं असंख्य जन ये ती स्वातंत्र्यास्तव प्राण अर्पुनी स्वर्गाप्रती जाती ।। नानासाहेब, तात्या

टोपी, झाशी मर्दानी । गाजउनी तलवार विजली गेली चमकोनी। बंदीजनांचे हाल पाहुनी जतींद्र तो गेला । अन्नत्याग करुनी त्याने कवटाळुनी काला ।। तैसा बाबूगेनु विदेशी बहिष्कार काजी । प्राण अर्पुनी कैसा गेला या ऐका आजी ।। पिकेटींग मुंबईत करिती विलायतीवर । तरुण वृद्ध अबला या कार्यी असती तत्पर।। पिकेटिंग करतांच पकडते जुलमी सरकार। हसतमुखाने अबला तो पाहुणचार ।। कैदखाने भरुनी जातां देति लाठिमार। पुष्पवृष्टिसम सहन कराया कितीक तय्यार ।। मँचेस्टर व्यापारि प्रतिनिधी जार्ज फ्रेजर । व्यापाराने देश लुटूनिया झाला शिरजोर।। विलायती मालाचे गठ्ठे आणण्या मोटार । घेऊनि गेला हनुमान गल्लीमध्ये सत्वर ।। करील कोणी आपल्यावरती पिकेटिंग म्हणुनी। गेला तो पोलीस आणण्या सरकाराकडुनी ।। संरक्षक पोलिस घेऊनी व्यापारी आला। चाकर जणु याच्याच घरांतील ते तैनातीला ।। नेउ लागला हनुमान गल्लीमधुनी मोटार । स्वयंसेवक म्हणती नाही आम्ही जाऊ देणार ।। गोरा झाला लाल ऐकुनी ऐसें उत्तर । गुलाम बोलुनि चालुनि त्यांचें कोण ऐकणार ।। आला तो तात्काळ काळबादेवी रस्त्यांत । गर्दि जनांची झाली तेथे रिघ नाही त्यांत ।।

चौक ३

कटाव:– इतक्यात्त स्वयंसेवक, पातले कैक। एकाचढि येक, बाबु नायक, सांगतो एक, म्हणे गोऱ्याला, हा माल परत ने कोठाराला। तात्काळ पुढें पोलीस, आले सर्वास, स्वयंसेवकास दूर करण्यास, परि सर्वास, पकडिलें खास, तोंच मोटार, घेउनि चालला गोरा तो बिनघोर।। इतक्यात मोटार आडवून, रस्ता रोखून, धरिला पाहून,

लाठि मारून,दिलें हाकलून मार्ग तो केला, चालली हळू मोटार पुढे रस्त्याला ॥ तात्काळ बाबु रस्त्यांत कराया पुत, देह देशांत पुन्हा सरकत, मोटार मार्गात येऊन पडला, पाहुनी हिंदु ड्रायव्हर घाबरुनि गेला ॥ ढकलून त्यास तात्काळ, बाबूचा काळ, गोरा तो लाल, जणू कलिकाळ, सोडीला ताळ, धरुनि चक्राला, हो दूर नाहि तर ठार करिन म्हणे त्याला, मोटार नेली त्या वरुनि त्याच वेळेला ।।

कटाव– मोटार पुढें रस्त्याला । नेताच बाबु धरणिला । रक्तानें लाल तो झाला । रक्ताचा सडा रस्त्याला । रक्ताचा चिखल फार झाला । चिळकांड्या उडती रस्त्याला । पाहुनी लोक गहिवरला । गोऱ्याचा राग फार आला । स्वार्थाची धुंदी डोळ्याला । प्राणाची पर्वा काय त्याला । समुदाय भडकुनी गेला । मारामारी चा प्रसंग आला । परी बाबु म्हणे सर्वाला । सत्याचा विजय करण्याला । शांतता धरा या काला । स्वातंत्र्य प्राप्ति करण्याला । प्राणांचें मोल देण्यांला । सिद्ध व्हा त्वरित कार्याला । स्वार्थांध घेइ प्राणाला । निस्वार्थि देई प्राणाला । बोलोनी स्तब्ध तो झाला तात्काळ त्याला हो नेला । राष्ट्रीय दवाखान्याला । डॉक्टरने डोस पाजला । बांधुनी त्याचे जखमेला । उपयोग नाहीं पर झाला । बाबुगेनू कालवश झाला । देशार्थ प्राण देऊनी धन्य तो झाला ॥ जी ॥

मरणाची भीती नको मला, मरण चुकलय का कधि कोणाला, मेलो तर जाईन स्वर्गाला, चळवळ येइल जोराला, जगलो तर पाहिन स्वातंत्र्याला, गोऱ्याला दिले आव्हान मोटार

नेण्याला। भारतरक्त प्राशुनी लाल जो झाला। बाबूची दया येईल कशी गोऱ्याला। प्राणाचि पर्वा काय अशा स्वार्थि गोऱ्याला॥

चाल २– बाबुची माय पातली त्याच समयाला। नको जाऊ म्हणत मी होते माझ्या लाडक्याला। परी होता कुठे तो शब्द श्रवण करण्याला। न्हाणील दुःख अश्रुनी आईनें त्याला। हंबरडा फोडूनी तिनें शोक बहू केला। जरि यास माझ्या उदरात जन्म मी दिला। परी खरी माय भूमाता जिनें पोषिला। तो पुत्र खरा जो माय भूमिस्तव मेला। लाभोत असे सत्पुत्र भरतभूमिला। लाखोनि लोक लोटले दर्शन घेण्याला। सुमनांच्या माला अर्पुनी त्यास सजविला। फुले आणि पैसे उधळती त्याचे पालखिला। किती माता पाहूनी त्यास ढाळी अश्रूला। अंतरी म्हणते सत्पुत्र असा लाभला। होईल तरिच सार्थक येऊन जन्माला। जाहले दुःख हिरा हरपला॥ जी॥

चाल मोः– खालीं यावा तारा जसा तारांगणांतून। क्षणामध्यें हरपुन। जावा नयना पुढून। असें भाग्य विलोकून। असे मरण यावें म्हणतात। त्यासम राष्ट्रकार्यांत॥

***

# लेखणी तलवार भांडण

शिवरायाच्या दोन स्त्रियांचा, वाद लागला गमतीचा। सवती सवती भांडण करिती, न्याय असे हा जमतीचा ।। दोन सवतिचे भांडण ऐका, घरोघर भांडति बायका। कोण सवति ह्या असाव्यात हा, सवाल कविचा तुम्ही ओळखा ।। खरे पतीचे प्रेम कुणावर, भांडणास या सुरवात। चवताळुनि जाऊनी भांडती, एकमेकिवर करि मात ।। पहिली म्हणे दुसरीस पतीचे खरे प्रेम गे मजवरती। म्हणुनि ठेविती मलाच संन्निध संरक्षण करण्या-साठी ।। अधिक प्रेम मजवरती पतीचे, म्हणूनि ठेविती कानाशी। गुजगोष्टी मी सदैव करिते जवळी बैसुनि त्यांच्याशी ।। लुडबुड करिशी उगाच म्हणुनी, कापुनि टाकली तव जिभली। व्यर्थ कशाला वटवट करिशी, तुजहुनि पुष्कळ मीच भली ।। नावडती तू कोण पुसे तुज सदा ठेवि पति बंदीत। ऐट कशाला उगीच दाविशी, कोंडुन घे जा म्यानांत ।। खरे पतीचे प्रेम म्हणूनि मज, नग्न ठेविगे मज शेजेला। कृष्ण मुखी अप्रीय म्हणुनि तुज, घेत नाहि पति शेजेला ।। राजकारणीं क्षण ना पतिचा, माझ्या विण गे चालतसे। हुकूम तुजला मीच सोडिते, बटिक माझी तूच असे ।। तूच बटिक ठेविती म्हणुनि तुज रात्रीं कोंडुनि खोलींत। मीच खरी आवडती म्हणुनी, रात्रीं घेइ मज महालांत।। दासि म्हणुनि तुज पती समजतो, म्हणुनि ठेवि तुज महालांत। मला पूर्ण विश्रांती घेण्या, मुभा पतीच्या मर्जित ।। रात्रि कोण पाहील ढुंकुनी, तुजसम कृष्णमुखी स्त्रीला। म्हणुनी तुजवरी मुळीच नाहीं, पति प्रेमा ठाऊक मला ।। दिल्लीपती सम बादशहाला, मीच सोडिते हुकुमाला। भर दरबारीं म्हणुनी

लाभतो, सदापती सहवास मला ।। अफजुल्याला लोळवुनी मी, पतिचे संरक्षण केले । म्हणुनि खूष पति आहे मजवरि, पट्टराणी मी खरी ठरले ।। शहाजिचे मी रक्षण केले, आदिलशहाच्या हातून । किती जाहला मोद पतीला, प्रिय मी झाले तुजहून । सदा लावतो नाक घासण्या, म्हणुनी नकटी झालीस । ऐट कशाला उगीच करिशी, कर जा काळे बालीश ।। पांढऱ्याव काळे करणे, हा तर माझा गे धंदा । जीव घेण्याचा हिंसवृत्ति हा, कोण चांगला म्हणे धंदा ।। दुष्टांचे निर्दालन करणे, ही हिंसा कां वाईट । कळली अक्कल तोंड बंद कर, पुरे आता ही वटवट ।। तुजवरी हा म्यानात राहुनी, गंजजरी इतका चढला । पट्टराणि मी म्हणुनि मिरविशी, फुकट कां ग त्या तोऱ्याला ।। वाद मिटेना म्हणुनि शेवटी, बेत शेवटी काय केला । धाडुनि खलिता पति-राजाला, विनंती शिवबाला ।। प्रेम कुणावर खरे आपले, निकाल सांगा आम्हाला । न्यायि खरे तुम्ही विनवितो आम्ही स्वीकारा या विनतीला ।।

चांद रोहिणी सवे कराया, क्रिडा उतरे गगनात ।
किंवा शंकर पार्वती बैसे, हिमालय आरसे महालांत ।।
तैसे होते सईबाई सह, शिवबा आपुल्या महालांत ।
सुख दुःखाच्या गोष्टी राज्यातिल, बोलत एकमेकांत ।।
तोंच पातला दूत घेऊनी, पत्र आपल्या हातात ।
पत्र वाचुती मौज वाटली, हसू लागले गालात ।।
पट्टराणी सईबाई बिचारी, प्रश्न असें कां हसलात ।
प्रिये काय मी सांगु तुला गे, ऐकुनि येशिल रागास ।।

राग नाही येणार मुळीही, वचन देतसे तुम्हाला । आहे त्या खलित्यात काय ते, लवकर कळुद्या की मजला ।। ऐक प्रिये

सांगतो मी तुला, सवती भांडण या काला । राग परि येणार नाही हे, वचन मघा दिधले मजला । खरे पतीचे प्रेम कुणावर, भांडण ऐसे सुरु झाले । वाद मिटेना म्हणुनि मजकडे । आले भांडण हे सगळे ।। सवति कोण ह्या असे मनाशी, सईबाई चिंतन करिते । तोंच शिवाजी म्हणे प्रियेला, हिरमुसली कां गे दिसते ।। मजवर नाहीं प्रेम आपुले, म्हणुनि चिडवता काय मला । बोलणार मी नाहि शब्दही, गुढ काय कळु द्या मजला ।। पहा राग तुज खरेच आला, वचन पार विसरुनी गेली । सवती मत्सर तुझ्यामध्येही, यास्तव रागाला आली ।। सवति मत्सरें राम धाडिला, कैकयिनें वनवासाला । सवति मत्सरें प्रिये आजवर, राज्ये किति गेली धुळीस, माझ्यावर आपले प्रेम हा गर्व मनीचा अजि जिरला । आतातरि बोलावे कोण ह्या, दोन सवति मजशी झाल्या ।। प्रिये असे वेड्या सम बोलशी, ऐक सवतिची तव नावे।। एक लेखणी दुजि तलवार, आहे कां हे तुज ठावे ।। आता कां तुज हसू आले, प्रेम तुजवरी म्हणुनी ना । खरे प्रेम परि या दोघीवर, म्हणुनि जाहलो मी राणा ।। बरे तर जा त्यांचे संगे, संमति माझी तुम्हाला । सवति अशा तुम्हि कितीक केल्या, भीत नाहि मी कोणाला ।। चांद रोहिणी सह असताना, कितिक चांदण्या सवति तिजला । तेज तिचें परि होत नाहि कमि, ठाऊक हा सिद्धांत मला । तुझ्या अधि त्यांच्याशी झाले, लग्नतुला कुठे ठाऊक । म्हणून जाहला मुक्त देश हा, त्याच जाहल्या सहायक ।। त्यांच्या संमतीनें मी केले, तुझ्या बरोबर हे लग्न । त्यांच्याविण ना काही चाले, जर राज्यावर आले विघ्न ।। मान्य मला ह्या श्रेष्ठ मजहुनी जगात आहे मान । त्यांच्याविण जे जगात असती, त्यांच्या माथीं अपमान।।

❋❋

# दारुबंदी पोवाडा

प्र/२३५/१

महाराष्ट्रातील एक यशस्वी होतकरु शाहीर श्री. मारुतराव हळबे यांनी दारुबंदीचे प्रसंगी केलेला पोवाडा खाली छापला आहे. श्री. हळबे यांना पूर्वी म. प्रां. कॉं. कमेटीनें मागवलेल्या कॉंग्रेसच्या पोवाड्यामध्ये बक्षिस (सुवर्ण पदक) मिळाले असून त्यांनी साताऱ्च्या त्यांच्या शाहीर मंडळास पुष्कळ कवने करून दिली आहेत. महाराष्ट्र सरकारनें दारुबंदी पोवाड्यास रु. २५ बक्षीस दिले आहे.

दारुबंदी कॉंग्रेसकरी मुंबई शहरांत । त्याची चळवळ जोरात होणार ऑगस्ट महिन्यांत । पंधरा ऑगस्टला सुरवात । हिंदू मुसलमान त्यांत । गिरणी मालक मजुरांत । आणि गरीब श्रीमंतात । भेद नसे कवणांत । चढा ओढ लागे त्यांत । असे कार्य जिथे होणार । यश खात्रिनेच मिळणार ॥

मदिराकरी खरोखरी सर्वस्वाचा नाश, नसे क्षणाचा अवकाश बळी पडे जो व्यसनास, झोळी येईल हातास, होळी संसाराची खास, मानधन विलयास, रावरंक एक रास, शेवटी घेई प्राणास, मान्य नसे कवणास, हो असें दुष्ट व्यसन हे खास ॥

पिऊन दारु झिंगुन आला, दौलता घरांत, पत्नी सारजा दारात, गेली दुर्गंधी नाकात, झाली चकीत क्षणांत, पति निशेच्या भरात, झोका गेला त्या दारांत, पति अशा स्थितित पाहुनी । हो लोटले अश्रु लोचनीं ॥ २ ॥

(चाल शाखांवरी)– पतिरायाला सारजा म्हणे सोडा दारुला । अशी अवदसा कां आठवली करील घाताला ।। घेईल मदिरा अंती तुमच्या खासचि प्राणाला । संसाराची राख रांगोळी करता कां बोला । निशेत पहिले उत्तर दिधले काय कळे तुजला । लज्जत दारुचीया माहित आहे ग मजला ।। ब्रम्हानंदाहुनी गमे मज मजा दारुची या । घेई न जो या पेया त्याचा जन्म जाई वाया ।। पूर्ण निशा दारुची चढली पाहुनिया पतिला । निराश होऊनि स्वस्थ बैसली करिल काय बोला । दुसरे दिवशी त्या वेळेला दौलू चालला । गुत्याच्या बाजूस पाहुनी पत्नि म्हणे त्याला ।। आज तरी ऐका हो माझे दारु नका घेऊ । पदर पसरुनी भीक मागते नका पुढे जाऊ ।। लाथाडुनि पत्नीस चालला तोंच पुढे आला । मालु नका आईस ऐसे बाळ त्यास वदला ।। त्यालाही मारुनी पातला दौलू गुत्याला । दया न माया व्यसनधिन जो झालेला त्याला ।। घेऊनि मांडीवरि बाळाला उगे करी त्याला । अश्रुपूर परि तिच्या लोटला होता नयनाला ।। पाहुनि तिजला बाळ विचारी रडसी कां काला । सांगणार ती काय, कंठ परि गहिवरुनी आला ।।

(चा. मो) झिंगुनि पडला होता दौलू इकडे गटारांत, गर्दि झाली तिथें दाट, जो जो म्हणे याचि वाट, काय करावि इतक्यांत, गांधिसेवक काढि वाट, म्हणे दूर सरा सर्वास हो, म्हणे आम्ही नेतो घरीं यास ।।

चौक २ रा

दारूपायि पैसा गेला जमिन जुमला पार । बायकोला देई मार, मोल मजुरि करणार, त्याचे पैसे मिळे चार, त्यावर गुजराणा

करणार, परि दौलू ते घेणार, हो मग पोट कसें भरणार ।। १ ।।

कटाव:– सखे जाऊ चला मुंबापुरीं, करुया नोकरी, पैसा मिळे भारी सुखाची सरी, काय वर्णु तरी, जिवाची मुंबई करु या ग ।। पतिराज ऐका वैरवरी, मीठभाकरी, एथलि हो बरी, नको ती नोकरी मुंबईचि भारी, आक्काबाई परी, करिल धुळधाणि संसाराची ।। २ ।। पोटासाठी आला दौलू मग मुंबईस तिथें पगार चाळीस, परि दारुपायी बीस कासावीस, कधि खर्ची सत्तावीस, कधि पगार खलास करणार, हो मग मुले काय खाणार ।।

चाल शाखांवरी – बाळ आजारी पडला परि ना उपचारा पैसा । पडली चिंता आई म्हणे हा वखत रे कैसा ।। समजु लागले बाप जाहला दारुबाज ऐसा । बाळ म्हणे आईस सागुकां मार्ग पहा खासा ।। अधीर झाली ऐकायाला बाळाच्या बोला । सांग म्हणे मज गोड बोल लवकुर – वाळुनि त्याला ।। आठवतो कां आई तुला तो गांधीचा चेला । पडलेल्या बाबांना घेऊनी नव्हता कां आला ।। दाविल ग तो मार्ग चांगला आई आपल्याला । पहातोच जर केव्हा दिसला गांधीचा चेला ।। नामि काढलिस युक्ती बाळा आई म्हणे त्याला चाळीत आपुल्या येईल तेव्हा विचारीत त्याला ।। दुसरे दिवशीं आला जेंव्हा तो काँग्रेसवाला । सांगुनि सगळी स्थिती विनवले औषध द्यायाला ।। काँग्रेस इस्पीतळात घेऊनि चला तुम्ही बाळा । तेथे औषध पाणी उत्तम मिळेल बाळाला ।। दारुबंदी करण्या झटते काँग्रेस सरकार । व्यसनापासुनि येतिल तुमचे पति ताळ्यावर ।। दारु चोरुनि घेईल त्याला तुम्ही काय करणार । दारुबाज जो अट्टल त्याचा कैफ कसा जिरणार ।।

जो जो घेईल दारु त्याला शिक्षा होणार। चिंता त्याची नको तुम्हाला खंबिर सरकार ॥ तुमच्या तोंडी पडो साखर गांधि खरा देव। भाकर देईल बेकारांची त्यास खरी कीव ॥

चाल मोडते – गांधी चेला घेऊन बाळा माते बरोबर। कॉंग्रेस दवाखान्यावर। दिले औषध सत्वर। चिंता नको खरोखर। असें म्हणाला डॉक्टर। परि मातेचे अंतर, काळजीने गेले करवून। हो इतक्यात दुःख दारुण ॥

चौक ३ रा

पिऊन दारु दौलू चाले होऊनि बेहोष दिसे भिकाऱ्याचा वेष, चढला दारुचा आवेश मुखीं दारुचा संदेश, जगा देई उपदेश नसे भीती लवलेश, स्वारि डुलत डुलत चालली हो मोटार खालि सापडली ॥ कॉंग्रेस सेवक धावत आला दौलताजवळ गर्दी जाहली पुष्कळ घेऊनी पाण्याची ओंजळ, मुखि घालुनिया जळ हाक मारली प्रेमळ परि शुद्धिवर येईना हो तात्काळ नेले दवाखान्या ॥

(चाल– शाखांवरी) पाहुनि त्याला पति सारजा घाबरुनी गेलीं। गरिबामागे दुःखे यती कोणि न कां वाली॥ पुत्र आजारी पति शय्येवरि शुद्ध न ज्या काहि॥ अंत किती रे देवा पाहसि दया न कां तुजशी॥ घाबरु नका येईल शुद्धी दौलूला आता। औषध जाता शुद्धीवर तो आला दौलता॥ आनंदी आनंद दाटला माता पुतांना। धन्यवाद मग त्यांनी दिधले गांधि सेवकांत ॥ दौलूनें मग प्रणाम केला गांधि सेवकांना। पुनर्जन्म तुम्ही माझा केला दास मी चरणाचा कॉंग्रेस सेवक म्हणति असे हा प्रताप गांधीचा। करा प्रतिज्ञा आतां सोडा नाद दारुचा॥ घरदाराचे झाले वाटोळे कॉंग्रेसचे ऐका। दारु सोडा पैसा जोडा। समय आला बाका॥

दारुपायी कितीक राज्ये गेली विलयाला । दारुपायी किती आजवरि मुकले प्राणाला ॥ व्यसनाधिन होऊनी करु नका घट्ट दास्य पाश । निर्व्यसनी होउनी संघटित तोडून पाश ॥ देशा देईल स्वराज्य एकचि संस्था काँग्रेस । दारु सोडुनि मदत करा तुम्ही दारुबंदीस ॥ दौलू म्हणाला पटले तुमचे म्हणणे आज मला । गांधि लोक तुम्हि खरेच वाली गरिबांना झाला ॥ केलि प्रतिज्ञा पिणार नाहीं दारु पेयाला । दौलु लागला दारुबंदी प्रचार कार्याला ॥

(चा. मो.) दारुबंदी जारी करी काँग्रेस सरकार, बहुजनांचा आधार, दारुबाजाचा उद्धार, करी कलाल संहार, शत्रूलाहि ठार करि, स्वातंत्र्य त्वरित येणार, हो जर शिस्त सर्व पाळणार ॥

(कटाव)– गल्ली गल्ली मध्ये व्याख्यानाचि घाई, त्यात पोवाडे मिठाई, शाहीर दामुअण्णा देई, कोणी करी रोषणाई, काय वर्णावी नवलाइ, गर्दी झाली ठाई ठाई, गांधी टोप्या डोई, कोणी करी तो शिष्टाई, दारुड्याची चपळाई, परि तिथे पोलिस भाई पाहुनि होई त्याची शाई, पोलिस अधिकारी जाई, चहुकडे पाहुन येई, मंत्रीकरी चतुराई, कार्यक्रम नीट होई, जन थक्क होऊन जाई काँग्रेस कार्य करणार, हो तिचे तिथें काय नाही होणार ॥

टिळकांपासुन पिके–टिंग चळवळ जोरात । झाली अखिल देशांत, त्याचे पायी तुरुंगात, हाल सोशिलें अगणित, यत्न केले अटोकाट, परि इंग्रजांचा हात, काँग्रेस द्रोह करण्यात, त्यातें यशाची ना वाट, दिसली कोणाच्या टप्यात, येता काँग्रेस अधिकारांत, केली इंग्रजांवर मात, दारुबंदीच्या कार्यात, यास्तव स्फूर्ति कवनास, हो आत्माराम तनयं शाहिरास ॥ ❋❋

# ४२ चे चळवळीचा पोवाडा

चौक १

(चाल – धन्य धन्य शिवाजी महाराज )

रजकुंड पेटले प्रचंड जग्ल व्याळ। देशार्थ मृत्युमुखि कैक सोशिली हाल । पर गार काय दास्यान तुम्हास सवाल गांधिचा सवाल ऐकुन। ऐकुन तरुण खडबडून। झाला जागृत व्याघ्र बिकाळ ।। जा सोडुनि आमचे हिंदुस्थान । आम्हि करु शत्रुपासून देश रक्षण । नको त्याचि चिंता, तुम्ही करा इथून पलायन । साम्राज्यशाहिचे युद्ध। हे युद्ध नव्हे लोक युद्ध, निशाण बंडाचे रोविले छान ।।

चाल– कॉंग्रेस सभा मुंबईस। गांधिनी दिला संदेश मरु किंवा होऊ स्वतंत्र । करु नष्ट इंग्रजी यंत्र ।। मनि धरा अहिंसा मंत्र । सांभाळिन मी ते तंत्र ।।

चाल २– तात्काळ पकडिले सर्व पुढारि लोकास । हरताळ, सभा मिरवणूक बंदी सर्रास। खवळला तरुण देशार्थ प्राणास देण्यास । किति मोर्चे नेले सरकारि कचेरी कोर्टास । उखडिले रुळ तोडिल्या तारा निखालस । गोळिबार चिडुनि सरकारने बहुत गावास । जालियन बागे सम कत्तल केली सर्रास हजारो लोक निःशस्त्र प्राणास । बाँब हल्ले निःशस्त्र प्रजेवर खास । इतकेचि करुनि थांबले नाहि चिमुरास ।

चाल मोडते– गोऱ्यांनी कितिक बायका केल्या तेथे भ्रष्ट सरकार आहे असे हे खरोखर दुष्ट । भनसाळी धावले दूर करण्या अरिष्ट। पाहुनि अमानुष छळा हो छळा तरुण खवळला म्हणती हे राज्य करुया नष्ट ।।

चौक २

रावण गेला सिते पायी यमसदनास। तसा दुःशासन खास मुकला कीचक प्राणास। ओढी द्रौपदी वसनास। तशी दुर्बुद्धी गोऱ्यास। ओढी हिंदभू वसनास अशी अनिती जिथें होणार हो ते राज्यलया जाणार ॥ भगवान धावुन गेले भगिनीचे रक्षणास। तसे मनसाळीं चिमुरास। गेले अण्याकडे खास। दया येऊ द्या तुम्हास। भगिनीची म्हणे त्यास। त्याची चौकशी करण्यास। नेमा पंचायत खास। आता चला चिमुरास। परि दया कशी येणार हो म्हणे विरुद्ध आहे सरकार ॥

चाल १ भनसाळी गेले खवळून। प्राणांत केले उषोषण ॥ लावीले धसा प्रकरण। सरकार गेले हादरुन ॥ आला समय मोठा दारुण। चिंतेत सर्व हिंदुस्थान ॥

चाल ४– रमाबाई तांबे जाऊन। चिमुरास स्वतः होऊन। भगिनीचे दुःख दारुण। त्यानी पाहून, जाहिर केले धैर्यान ॥ तो खरा भाऊ ती भगिनी। संकटी जाते धावूनी प्राण ही पणा लावुनि भगिनी रक्षणा। जो करी कवटाळुनी मरणा। शरिराचे स्वतः होऊन। तिळतिळ रक्त खाऊन। असें करीत सोडणें प्राण फार हें कठिण। असा गेला जतींद्र होऊन ॥ ऐसष्ट दिवस संपूर्ण भनसाळींचे झाले उषोषण। सरकार शुद्धिवर येऊन। दिले अश्वासन। चौकशी करू संपूर्ण ॥ असा बिजय जाहला पूर्ण। बेअब्रु सरकारची करुन। पार पडले दिव्यातून। ख्यात होऊन गाजले महात्मा म्हणून ॥

चाल – वणव्यापरी चळवळ भारी जाहली जोरात। लहान थोर आले त्यात स्त्रिया कित्येक तुरुंगात। भीती नाही हृदयांत हिंदूभूसाठी मरणार। हो स्वातंत्र्य म्हणती घेणार।

चौक ३

तरूणांनी कॉलेज सोडून। एकजूट करुन जोरात। युद्ध विरोधाची चळवळ जोरात लागली होड एकमेंकात। निपुण जे झाले गनिमी काव्यात ॥ सरकार महायुद्धात। आहे संकटात। याच मोक्यात। करु जर हल्ला आता जोरांत। इंग्रजी यंत्र तोडू झटक्यात। स्वातंत्र्य ज्योत पेटे हृदयांत ॥

चाल १– किती तरुणतरुणी तत्काळ जाहले शत्रुचे काळ। पैशाची पडली रास, उत्साह आला कार्यास। लागला एक मनीं ध्यास शत्रूचा करावा नाश। देशार्थ देह देण्यास। पातले तरुण समयास ॥

चाल २– लाभले पुढारी गुप्त काम करण्यास। अच्युत, अरुणा लोहिया याच कार्यास। जयप्रकाश आला फोडुनिया तुरुंगास। किसनवीर पांडू मास्तर बहादूर खास। नांना पाटील कासेगांवकर वीर निखालस। इंग्रजा हातीं तुरी दिधल्या त्यांनी खास। शिवाजीने जसे फसविले औरंगजेबास। स्टॅलिनने फोडिले तुरुंग कैक वेळेस। केले चकित सुभाषचंद्राने तसे इंग्रजास, कोणी दाढी काढुनी मुल्ला जाहले खास, कोणी मुंडण करुनी घेती येती वेशास, कोणी साहेब जणु उतरले आता मंबईस, अशा कैक युक्त्या योजिती गनिनी काव्यास, शिपायाच्या पुढुनी जातात फसवुनी त्यास स्त्री वेष कुणी पोलीस येता शोधास, अशी फजिती केली सरकारची कैक वेळेस, चिडुनिया गेले सरकार पाहुनी

शौर्यास ।।

चाल मोडते – लढा आला असा रंगाला । तरुण सिद्ध झाला। स्वार्थत्यागाला । मारुनी लाथ घरदारास । स्त्रियाही कैक याच युद्धास । स्वातंत्र्य तृष्णा लागली ज्यास ।। गोळिबार चिडुन सरकारन । होऊन बेभान । केला जोरान । चहुकडे हाहाःकार झाला । मुंग्यापरी लोक ठार झाला । काळिमा इंग्रज राज्याला ।

चाल दांगड– वडुजला झाला गोळीबार । घारगे पुढीयार सर्वाना प्यार । हजारो तरुण गोळा केला । अपूर्व स्फूर्ति लोकाला । मोर्चा सरकारी कचेरिला । झेंडा घेऊनी घारगे चालला । शांतपणे मोर्चा पुढे गेला । गांधींचा जयजयकार झाला । काँग्रेसचा जय जयकार केला । रोखिला लोक तोंच सगळा, पोलिसानी दादा ।।

कटाव २– तोऱ्यात फौजदार आला । जा परत म्हणे लोकाला । बावळट कशाला इथे आला । चलेजाव म्हणे घारग्याला । ना तरी करीन ठार तुला । बेअकली बेंडगिरी त्याला । काय ठावे देशप्रेम त्याला । दया कशी येइल साम्राज्यशाही दगडाला ।। घारग्याचे ऐका उत्तरा । चले जाव तूच फौजदारा, देशाचा वैरी तू खरा । देशाचा वैरी तो गोरा । मालक आम्ही फत्तरा । नाहि भीत तुझ्या गोळीबारा । फिरणार नाहि माघारा । धैर्याचा मेरु तो खरा। वय अवघे त्याचे आठरा । अहिंसेचे कवच सभोवरा। वरी धरी सूर्य छत्तरा । धरणी दे खाली आसरा । हिंसेशी देण्या टक्करा । सिद्ध तो पुढारी खरा । बांधावे त्याचे मंदीरा। अद्भूत प्रसंग सारा। वर्णवे कुणाची गिरा । झेंडयाला करुनी नमस्कारा । केला पुन्हा गांधी जय जयकार । त्यांचा नाद प्रचंड घुमुनि राहिला अंबरा ।।

चाल २– गर्जना ऐकुनी अंकली चिडूनिया गेला, नि:शस्त्र लोकावर त्याने गोळीबार केला, स्वार्थांध होऊन हाहा:कार उडवील। पोटार्थं देशावर त्याने निखारा ठेवला, लागता गोळी धारग धरणीला पडला, परि झेंडा त्याचे हातुनीं नाही तो सुटला जगिं अमर म्हणुनि धारगे वंद्य जाहला, गोळीबार असा इसलामपूरी जाहला, पंड्या वीर गोळीबारांत ठार जाहला कुलाब्याचे कोतवालाचा डंका गाजला, बाबू गेनू नाहीका असा चमकुनी गेला असे कैक बळी आजवरी इंग्रज गोळीला, जालियन बाग ती उभी अशा साक्षीला ॥

चौक ४ था

(चाल दांगड) गांधीना कळले तुरुंगात। गोळीबारात कैक गेले त्यात। खलिता त्यांनी लिहिला व्हाइसरायाला। काँग्रेस नाही जबाबदार याला। अत्याचार ठाव नाही आम्हाला। पुढारी पकडूनी आरंभ केला। चिडविले तुम्हीच लोकाला। गोळीबार त्यांचे वर केला। चिडल्यावर कोण शांततेला। तरुण कवटाळुनी बसेल बोला। सांगा तुम्ही दादा ॥

व्हॉईसराय म्हणे गांधीला। खलिता पाहिला चवताळुनी गेला। तुम्हीच म्हणे जबाबदार याला। चळवळ घ्या मागे म्हणे त्याला। संकटी पाहूनी सरकारला। अडविता तुम्ही खात्री आम्हाला। शत्रुला जाऊन काय मिळाला। ठराव घ्या मागें मग बोला। ना तरी दडपू चळवळीला। अशा ताठ्यात व्हॉइसराय बोलला। त्यावेळी दादा ॥

चाल मोडते– गांधीनी उपोषण केले, एकोणीस दिवस झाले, मृत्युमुखी चालले, परी सरकार आपल्या ताठ्यात, सोड-

णार नाही म्हणे तोऱ्यात, दया दगडाच्या कशी हृदयात ॥

गांधांनी उपोषण करुनी, एकवीस दिवसानी, विजयी होऊनी, जाहले पूर्ण जगीं विख्यात, झाला आनंद सर्व जगतात, नोकरशाहीच्या धडकी हृदयांत ॥

चाल १– उपासाने गांधीचे कथन । जगतास पटले संपूर्ण ॥
नोकरशाही हट्टी म्हणून । सर्वांना कळले छान ॥
चहूकडून आले दडपण । गांधीना द्यावे सोडून ॥
परि मस्त राज्य महान । जनमत तुडवीले त्याने ॥

चाल २– चहुकडून अशी बेअबु सरकारची झाली । गांधींची म्हणून सरकारन सुटका केली । जिना गांधी भेट विख्यात मुंबईत झाली । लागले जगाचे डोळे जमली मंडळीं । काँग्रेस लीग एकीची परि खांडोळी । देशाची साडेसाती अजूनी नाही संपली । त्यावेळी टीका जगतांत बहुत झाली । ऐक्यार्थ सप्रु योजना पुढे हो आली । योजना संघणेसाठी त्यांनी काढीली । त्याकडे गांधींची दृष्टी आज लागली । भुलाभाई आदी समेटार्थ हलू लागली । काँग्रेस ऐक्याची आशा दाटु लागली । आशेचा किरण सुटली पुढारी मंडळी । समेटार्थ सिमल्याला सर्व जमली मंडळी । वेव्हेल योजना विचारार्थ पुढें आली । परी हट्टी जिनांनी त्याची केली खांडोळी । ऐक्यार्थ शर्थ काँग्रेसने केली त्यावेळी परि व्यर्थ गाढवा पुढे गीता वाचली ।

चाल मोडते– तळहातीं घेउ जर शीर । स्वातंत्र्य वीर । गाठू धरा धिर । स्वातंत्र्य नाहीं फारसें दूर । विनवी आत्माराम तनय शाहीर । काँग्रेस सेवक असें जांहीर ॥

**

# वडगांवची लढाई

चौक १ ला

ते धन्य धन्य नरवीर बारभाई जाणा । स्वातंत्र्य देवी पदी घेऊनी शपथा आणा । देशार्थ झाले तय्यार अर्पण्या प्राणा । धडधडाड तोफा झाडून । धुव्वा उडवुन केले जमीनदोस्त त्यांनी इंग्रजांना ।। १ ।।

जगीं धन्य झाले बारभाई । अजब चतुराई । राखली पेशवाई । रग इंग्रजांची पार जिरवून । विजय वडगांवी पूर्ण मिळवून । आणिले शरण हात बांधून ।। २ ।। नारायणराव पेशवा झाला । नाही बघवला । राघोबा दादाला । जाहला राज्यलोभ अनिवार । पुतण्या मारण्याचा केला निर्धार । बाईल बुद्धचाला कुठला सुविचार ।। जी ।। आनंदीबाईन गारद्याला । पुतण्या मारण्याला । तयार केला । देउनि पैसा अमित गारद्यास । शपथ घेण्यास लाविलें त्यास । कटाचा थांग नव्हता कवणास ।। जी ।। पर्वती दर्शन घेउन । सुग्रास जेंऊन । सासुरवाडीहून । नारायणराव पेशवे आले वाड्यास । तोंच गारद्यांचा गराडा त्यांस । पळुं लागला भिवूनी गारद्यांस ।। जी ।।

चाल १– तलवारी पाहूनी बुजल्या । गाई दावें तोडुनी धावल्या ।।<br>
गारद्यांच्या अंगावर गेल्या । गारद्यांनीं गाई कापल्या ।।<br>
इतक्यांत नारायण आला । शोधित राघोबा दादाला ।।<br>
येईल आडवा त्याला । दुष्टांनी कापून काढीला ।।<br>
राघोबांच्या धरुनि कमरेला । नारायण विनवूं लागला ।।<br>
वाचवा काका पुतण्याला । मारितो गारदी मजला ।।<br>
मारण्या सिद्ध जो झाला । तारील दुष्ट काय त्याला ।।

चाल २– ऐकूनी शब्द पुतण्याचे काका गहिवरला ।
नका मारु राघोबा त्यास म्हणू लागला ।
गारद्यांना परी त्यावेळी खूनहो चढला ।
व्हा दूर नाहींतर दोघे जाल स्वर्गाला ।
होताच दूर राघोबा वार त्यानें केला ।
विश्वासू एक नोकर येऊन मध्यें पडला ।
गारद्यानें तत्क्षणीं ठार केलें दोघाला ।
गारद्याचा वार त्याचे पोटावर लागला ।
साखरभात पोटांतून नारायणाच्या आला ॥ जी ॥

चाल ४– भडकले तरुण घरोघर । ऐकूनी खुनाची खबर । मामापेठे खवळले फार । घेऊन समशेर, धावले गारद्यावर ॥ जी ॥ गारद्यास चढला होता खून । मामास म्हणे पाहुन । ठार करीन गोळी घालून । यावे एकट्यानें यास्तव गेले मुकाट्यानें ॥ जी ॥ मुर्खाच्या नादीं लागून । गच्छंति होईल जाणून । राघोबाच्याकड जाऊन बोले दणक्यानें । काय केले पुतण्या मारुन ॥ जी ॥ बाजीराव पोटी येऊन । असा दिवटा निघाला पाहून । हि-यापोटीं कोळसा म्हणून । तुम्ही जन्मून । अपकिर्ती घेतली करुन ॥ जी ॥

चाल मोडते– राक्षसी कृत्याला । काळिमा आणिला । पूर्वज कीर्तीला । लोक खवळले राघोबावर । सूड घेण्यास झाले तय्यार । बारभाईचा कट सत्वर ॥ जी ॥

## चौक २

सखाराम बापू नायक । नाना सहाय्यक । सेनानायक । शिंदे हरिपंत चौकडा खास । बुद्धी बहादुरी जिथे सहाय्यक । विजय

मिळणार त्याच पक्षास ॥ जी ॥ राघोबा पेशवा झाला । आनंद झाला । आनंदी बाईला । बाईच्या हाती राज्यकारभार । देऊन म्हणे राज्य करणार । नथेतून तीर कांय मारणार ॥ जी ॥ सुविचारी चतुर कारभारी । शत्रूला भारी । घालविले दूरी । दुखविले त्याने चतुर लोकांस । नेमिले मूर्ख त्यांचे जागास । गुळाची चव काय गाढवास ॥ जी ॥

चाल १– बारभाईनीं केलें कारस्थान । राघोबाचें करण्या उच्चाटण ॥ मुत्सदी होते गुणवान । नानाचें अजब शहाणपण ॥ जी ॥ अशीं जमलीं रत्न गुणवान । राखण्या राज्य शर्तीनें ॥ जी ॥ राघोबा करिल धुळधाण । राज्याची बाईलबुद्धीन ॥ जी ॥

चाल २– पुतण्याचा खून हें शल्य राघोबा दादाला ।
सारखे टोचू लागलें त्याच्या हृदयाला ।
पराक्रम करुनी हा डाग पाहिजे धुतला ।
स्वारीचा बेत यास्तव राघोबानें केला ।
तो बेत बारभाईच्या पथ्यावर पडला ।
बापूनी योग्य संधीचा फायदा घेतला ।
वेवस्था कटाची करुन स्वारीवर गेला ।
संशय राज्यक्रांतीचा येईल राघोबाला ।
मुद्दाम म्हणून स्वारीच्या बरोबर गेला ।
आजाऱ्याचें सोंग घेऊन बापु परतला ।
पुरंदरी नेले तत्काळ गंगाबाईला ।
पेशवाई वस्त्रें देऊन गंगाबाईला ।
सर्वत्र डंका नांवानें तिच्या फिरविला ।

कटाव १– बारभाई कट उमगला । राघोबादादाला । घाबरुनी गेला । परत क्षणि फिरला । मोर्चा वळविला । पुणें शहराला । संतापून गेला । सखाराम बापूनें घात म्हणे ही केला ।। जी ।। इतक्यात सैन्य घेऊन । फडके धावून आला । पाहून । तोंड वळवून । उलट खाऊन । राघोबा पळून जातो पाहून । तोच येऊन । मारा सपाटून, त्रिंबकमामान, दिले तोंड तेथें मामास त्यानें निकरान । जी । जो आला झेंडा फडकवुन, अटकेवरतून, भरारी म्हणून त्यापुढें येऊन, त्रिंबक मामान, दिले चिथाउन, त्यामुळें चिडुन, केला राघोबान, होऊन बेभान, हल्ला सपाटून, कत्तल जोरान, केले हैराण, त्रिंबक मामाला, होऊनी जखमी मामाच धणीवर पडला, ।। जी ।।

कटाव– ४ मामास आणलें पकडून, असें पाहून, आनंदीबाईनें लाथ मारून म्हणे त्याला दुष्ट बरा आला तावडीला, तूच ना सामिल नानाला, कोण तारील आता तुजला, नाहीं बोलत पाहून त्याला, वाचा तुझी बसली का रे मेल्या, बोलली अपमान करुनि, त्याला ऐकुनी बाईच्या शब्दाला मामा खवळून बोलला तिजला रांडे हा एक जरी मेला, जिते तुझे नवरे आकरा पुण्याला, बारभाइतला एक मेला, आकरापरि घेतिल सूडाला ।। रांड तुझ्या दादार जा। जी ।।

कटाव १ नागीण जणू खवळली, आनंदीबाई चिडली, मामाशी भिडली, लाल फार झाली, कापुका जिभली, म्हणाली त्याला तात्काळ हुकुम देउन ठार त्याला केला ।। जी ।।

चाल मोडते – ऐकुनी मामा रणि पडला । फडक्यानें केला । जोराचा हल्ला । सहन करवेना राघोबादादास । पळू लागला

उलटमार्गास। शेवटी शरण आला फडक्यास।।

चौक ३ रा

पुत्ररत्न गंगाबाईला। झालें पुरंदराला। पुत्रोत्सव केला। नाना फडणिसानें मोठ्या थाटांत सवाईमाधराव नांव झोकांत पुकारा केला महाराष्ट्रांत।। जी।। सुत गंगाबाईला झाला। ऐकुनि वार्तेला निराश झाला। आला राघोबा समेट करण्यास। म्हणे मी परत येतो राज्यास। द्यावें तोडून कांहि मुलखास।। जी।। तुम्ही रहावें आनंदवल्लीस घेउन वर्तनास। असा दादास तहाचा मसुदा आला पाहुन। बाईनें पायाखाली तुडवून बोलली नवऱ्यास फार टाकून।। जी।।

चाल १– शत्रुला शरण जाण्याला। शरम ना वाटे तुम्हाला।।
पुतण्याचा खून तुम्ही केला। घेईल शत्रु सूडाला।।
मारील शत्रु लाथेला। खाणार काय त्या बोला।।
तुम्ही जावे शरण इंग्रजाला। येईल राज्य हाताला।।
जर घ्याल त्यांचे मदतीला। लाभेल राज्य तुम्हाला।।

चाल २– उपदेश बाईलबुध्यास त्वरित तिचा पटला।
तात्काळ इंग्रजाकडे वकिल धाडिला।
पेशवाई नष्ट करण्यास टपुन जो बसला।
मराठ्यांच्या दुहीकडे होता गोऱ्याचा डोळा।
येतांच संधी फायदा त्याने घेतला।
पूर्वीचा तह इंग्रजानें पार तुडविला।
घेतली साष्टी ताब्यांत त्याच वेळेला।
राघोबास मदत करण्यास इंग्रज धावला।
इंग्रज घेउनी राघोबास चालुनी आला।
राहु केतु आले ग्रासण्या पेशवाईला।

हरीपंत तोंड देण्यास पुढे चालला ।
इंग्रज पाहुनि हरिपंता चकित बहु झाला ।
नापार येथे दोघांचा सामना झाला ।। जी ।।

कटाव ३ – शिस्त फार इंग्रजि सेनेला, तोफा बंदुका सुधारलेल्या भरपूर त्यांचा दारूगोळा, भीति नव्हती त्या गोऱ्याला, मारूनि टाकू म्हणे फडक्याला, राघोबाला आनंद झाला वाटले विजय मिळणार खास हो त्याला ।। हरिपंताची मावळी सेना, शिस्त इंग्रजासम ना त्यांना काय पुसावी त्यांची दैना । एक शिस्त परिठाउक त्यांना । स्वातंत्र्यास्तव रणि लढतांना । प्राणाचीना परवा त्यांना । गनिमी काव्यानें शत्रूना जेरिस आणु खातरी त्यांना । हरिपंतातासम नायक त्याना देऊनी धीर त्यानें केली समर गर्जना

कटाव २– दोघांचा सामना झाला, वीराशि वीर हो भिडला, मराठ्यांच्या चमकल्या ढाला, तलवारी फिरू लागल्या, झाल्या अधिर जणू रक्ताला, गोऱ्यांचें रक्त पिण्याला, निकराचा चढविला हल्ला, देशार्थ मराठा लढला, स्वाभिमान जागृत झाला, वीरश्री चढली सर्वाला, दसपट शक्तीनें लढला, इंग्रज हटू लागला, हरिपंत बोलला सर्वाला, शाबास भला मारिला, हर महादेव बोलला, ऐकून पुन्हा सरकला, मावळा चवताळुनि गेला, चराचरा चिरू लागला, तो मार सहन नाही झाला, इंग्रजाचा लोक ठार केला, सेनापती त्यांचा घाबरला, सैरावरा शिपाई धावला, तोफा कितिक टाकुनि गेला, मराठ्यांनीं तोफा पळविल्या, अशी फजिती हरिपंतानें केली नापारला ।।

चाल मोडते– समेटाचे बोलणे करण्याला । इंग्रज आला । किल्ले पुरंदराला । चतुर नानासाहेब म्हणे वकिलास । मदत जर केली पुन्हा राघोबास नाश होईल तुमचा मग खास ।

चौक ४ था

जे विजयी होते जगतात । त्यांच्यावर मात । मराठे करतांत । शल्य हें इंग्रजांच्या हृदयांत, सूड घेण्याची पाहती वाट, तहाची त्यांनी मोडली आट ।

हातात धरुनि राघोबास । म्हणे तुम्हास । देतो राज्यास, मारुनी गोड गोड थापास । अंतरी पेशवाई राज्यास । गट्ट करण्याचा लागला ध्यास । असा तह कैक वेळेला । इंग्रजानी केला । आणि मोडिला । त्यांच्या वचनावर जो विश्वास । ठेविल तो मुर्ख ठरेल खास । होते जाणून बारभाई त्यास ।।

चाल १ इंग्रज जसे दिसतात, अंतरी तसे नसतात ।।
गोरटीं बाळें दिसतात । परि कपटि तींच ठरतात ।।
राघोबा साश्खे फसतात, इंग्रज म्हणुन जगतात ।
अशी इंग्रजांची ही जात । होते नाना पूर्ण जाणत ।
आला हेर तोंच सांगत । इंग्रजी स्वारीचा बेत ।।

चाल उठावाची — करुनि घाइ लवलाही, नानानीं शिंद्यास । पत्र धाडियलें खास । निघा सत्वर युद्धास । स्वार घेउन पत्रास । आला शिंदे दरबारास । शिंद्यास पत्र देऊनी हो केला मुजरा खाली वाकुनी ।।

खवळुनि गेले पाहुनि शिंदे पत्राचा मजकूर । म्हणे करिन चक्काचूर । इंग्रजांचा पुरेपूर । तेव्हां डोळ्यावरचा धुर । उतरुनी महापूर । नयनाश्रुचाच वाहिल । हो पायाची धूळ चाटील ।।

कवाइति फौज मोठी घेऊनी जोरांत । करुनि पोषाखाचा थाट । शिंदे म्हणे करिन मात । खोटी इंग्रजांची जात । ज्यानी समेटाची

आट। मोडूनि टाकली गर्वात। ठार करुनि क्षणांत। धाडितो त्यांना स्वर्गात, हो बच्चाजी माझ्याशीं गाठ ॥

चाल २ री– घेउनी फौज बरोबर शिंदे दौडला।
नाना बापु फडके पानशे तोंड देण्याला।
घेउनी सेना सामुग्री तोफा सदरेला।
सत्वर शिंदे येऊनी त्यांना मिळाला।
एक चढिस एक रणशूर वीर पातला।
स्वातंत्र्य देशाचें राखण्यास्तव जमला।
मारु किंवा मरु तत्त्वानें मराठा लढला।
स्वातंत्र्य ज्योत जागृत होती हृदयाला।
राजाविण म्हणुनी सर्व मराठा लढला।
इतिहास हेंच बाळकडू शिकवि मराठ्याला।
लाभति म्हणुनि नररत्ने महाराष्ट्राला।

चा. मो.– इंग्रज चढुनिया घाट। आला काल्यात। मोठ्या जोरात। म्हणत आम्हास विजय मिळणार। गर्व असा त्यांना झाला अनिवार। गर्व परि हरण त्यांचा होणार॥

चौक ५ वा

जग जिंकणारा इंग्रज। प्रचंड फौज। समरिं तरबेज। सेनापति ज्यांचा होता रणशूर। इस्टुर फाकडा बहाद्दर वीर। युद्ध करण्यास झाला अधीर॥ मराठ्यांचा शिंदे सेनापती। फौज कवायती। गनिमी कावा वरती। दुहेरी निपुण अशा योध्यास। विजय मिळण्याचा पूर्ण विश्वास। शत्रूची भीती नव्हती चित्तास॥ अशीं जमलीं सर्व गुणवान। रत्न अति छान। पराक्रमि महान। त्यांत नाना बापु शिंदे हरिपंत। चौकडा होता फार गुणवंत।

चतुर आणि शुर होते जातिवंत ॥ जी ॥

कटाव १– समबल अशा दोघांचा, इंग्रज मराठ्यांचा, सामना साचा, झाला निकराचा, फार बहारिचा, पाहण्या आले, अंबरी देव गंधर्वं पितर धावले ॥ जी ॥ तोफांचा झाली सरबत्ती, वाद्यें वाजती, बंदुका झडती, गर्नाळे उडती, गर्जना होती, दोन्ही सैन्यात, वीरश्री चढू लागली मराठे वीरांत ॥

कटाव ४– इतक्यांत इंग्रज सैन्यांत, आला दणदणत, गोळा सणसणत, ठार केलें त्यानें फाकड्याला, सेनापति त्यांचा ठार झाला, उडविला पहिल्याच झटक्याला, हर्ष मराठ्यास फार झाला, दुप्पट जोरानें लढू लागला, शकुन इंग्रजांना वाइट झाला, माशी जणु पहिल्याच घांसाला लागली शूर इंग्रजाला, नाहीं इंग्रज परी डरला, सेनापती त्वरित दुसरा आला, विचारले त्यानें राघोबाला, होता तो आधिच गळलेला। राघोबाची मैना प्रसंगाला। धीर देण्यास नव्हती काला। त्यामुळें धीर त्याचा खचला। सेनापती विचारांत पडला। रातभर विचार पुरता केला त्यावेळीं दादा दादा रे जी जी ॥

मराठ्यानी विचार काय केला, एका वक्ताला, त्याच रातीला इंग्रजाला आत हो घेण्याला, सर्व बाजूनी वेढण्या, मराठा मागे मागे हटला घाटाखाली कांही लोक गेला, मुम्मईचा मार्ग बंद केला, गनिमि काव्याने लढण्याला चौफेर दबा धरुनि बसला, दुसरे दिवशी इंग्रज पाहू लागला, मराठा कांही, कुठे दिसेना त्याला वाटले मराठा भिउन पळाला, म्हणुनी इंग्रज पुढे गेला, पुढे येताच घेरला त्याला, वाघाच्या जबड्यांत सापडला, चहुकडे मराठा दिसू लागला, कंसाला कृष्ण जसा दिसला, तोंड वासून चकित झाला ॥ इंग्रज हो दादा दादार जी ॥

सेनापती परी नाही डरला, घुसू लागला, धरुनी धैर्याला, वडगावांत कूच केला, गाव ओसाड त्यांस दिसला, गांव मराठ्यांनी आधींचा लुटला, दाणागोटा इंग्रजांचा सरला, गावांमध्यें दाणा नाही मिळाला, मुंबई मार्ग बंद झाला, अन्नाविण लोक मरु लागला इंग्रजांच्या दादा ॥

कटाव २ इंग्रजांची उडाली दैना, काय करावे त्याला सुचेना। मराठ्यांच्या तोफा दणदणा, चहुकडूनि गोळ्या सणसणा। तलवारी वाजे खणखणा, हरमहादेव गर्जना, अंबरी ऐकूनी देवांना आनंद जाहला त्यांना, मराठ्यांनी कैक लोकांना, ठार केले त्याची नाही गणना। जणु सुरु केला कत्तलखाना लावुनी डोळे अस्मान, आकाशांतील बापाना, इंग्रजांनी केली प्रार्थना, परि नाही आली त्या करुना, चक्रव्युह, फोडय्या त्यांना एकही मार्ग सापडेना अशी इंग्रजांची हो दैना उडताच गनिमीकावा त्यांना, आला कळून तात्काळ त्यांना आले शरण मराठेलोकांना, तह करा म्हणे जोडून दोन्ही हाताना जी ॥

चाल २– म्हणे शिंदे इंग्रज सेनापतीस रागावून। जरि आला इंग्रज शरण हात जोडून असे तुम्ही कैक वेळेस शरण येऊन, फसविले आहे आम्हांस तह मोडून, स्वाधीन करा दोन गोरे ओलीस म्हणुन राघोबा तसाच द्यावा आमच्या हातीं आणून तुम्ही त्वरित मुलुख आमुचा द्यावा सोडून, अपमानकारक अशा अटी ऐकून खवळला परि करणार काय खवळून, तह केला कबुल पेचांत होता म्हणून ठेविले दोन इंग्रज ओलिस म्हणून,

चाल मोडते – जगा भारि अशा इंग्रजाला। पार जिरविला। भगवा फडकविला। बारभाइनी अखिल जगतांत। दाउनि शौर्य बुद्धी अचाट। राखिले राज्य जाहलें ख्यात ॥ जी ॥ ❋❋

# कॉंग्रेसचा पोवाडा

आधीं नमू शारदारमणा। मग ठेवूं माथा स्वातंत्र्य-देवीच्या चरणा ।। कॉंग्रेसदेवी तुज नमना । स्वातंत्र्य अमृत पाजिलें तूंच ना तरुणां ।। १ ।। जिजाईनें शिवाजीराजांना । स्वराज्यपान्हा । पाजुनी त्यांना । सिद्ध केलें तूंच ना आम्हां स्वातंत्र्यरणा ।। २ ।। जनतेच्या हृदयसिंहासना । बैसुनी तेथें तूं करिशी स्वराज्य-गाना ।।३।। संघशक्ति घालि धिंगाणा । दाविलें तूंच ना असे तुझ्या ग शत्रूंना ।। ४ ।। कॉंग्रेसदेवि तुज शरणा । तुझी कृति देई मज स्फूर्ति करण्या गे कवना ।। ५ ।। चमकले हिरे हिरकण्या । अर्धशतकें आयुमध्यें तुझ्या त्याची नाहीं गणना ।। ६ ।। प्रतिवर्षी तुला पाहण्या । लोटती गरिब श्रीमंत तुझ्या गे स्थाना ।। ७ ।। तुजपाशीं नाहीं प्रतरणा । समतेनें मातेपरी पहाशी तूंच सर्वांना ।। ८ ।। या सुवर्णमहोत्सव दिना । आत्मारामतनय हें अर्पी कवन तव चरणा ।। ९ ।।

चौक १ ला

भूलोकीं स्वर्गिची गंगा यावी धांवून, चमकावी वीज वा मेघ-मंडळांतून, कॉंग्रेस तशी जन्मली दास्यामधुन, कॉंग्रेस राष्ट्राचें मुख, दावी अचूक, मार्ग जनतेस सांगे निक्षून ।। कॉंगेस राष्टाची शक्ति पाहुनि जिची कृति, सरकाराला भीति, वाटले नित्य त्यांचे हृदयांत, म्हणून नेत्यास ठेवी तुरुंगांत, परी फोफावे कॉंग्रेस जोरांत। बिजांतुन जसा वाढावा वृक्ष, कॉंग्रेस पक्ष तसा प्रत्यक्ष वाढुं लागला आहे देशांत, फुलांनीं आला आहे बहरांत, गोड गोड फळें पुढील कालांत ।। जशी गानदेवि श्रोत्यास, मधुरालापास, काढुनी त्यास

गुंगवी तशी काँग्रेस तरुणांस, स्वराज्यगान ऐकुनी त्यांस, केलें तल्लीन आहे सकलांस ।। चाल ।। नि:शस्त्र अशा जनतेला, इंग्रजा तोंड देण्याला । काँग्रेस आली जन्माला, भय वाटे त्या इंग्रजाला । जसा कृष्ण येतां जन्माला, भिती पडली त्या कंसाला । वसुदेव देवकी तुरुंगांत, परि कृष्ण गेला गोकुळांत । काँग्रेस पुढारी तुरुंगांत काँग्रेस बाहेर जोरांत । पूतना आली गोकुळांत, कृष्णाचा कराया घात नोकरशाही टपली देशांत, काँग्रेस कराया नष्ट ।। चाल ।। भेदनीति पूर्ण इंग्रजाची ओळखी काँग्रेस । काँग्रेस एकी करण्यास झटे अहर्निश । लालूच दावुनी पुन्हां बेकी करण्यास । एकींत आमुच्या मरण दिसे इंग्रजास । सरकार म्हणुनी बैसलें बेकी करण्यास । सरकार बैसलें टपुन असे प्रंसगास । करण्यास एकी पुढाऱ्यांस पडती सायास । देशार्थ तिलांजलि देती घरादारांस । देशार्थ त्याग हा धडा देती तरुणांस । काँग्रेसमध्ये असे वीर येती जन्मास । काँग्रेसचा पुढच्या चौकांत ऐका इतिहास ।।

चाल मोडते – सत्तावनच्या बंडानंतर, हिंदी प्रजेवर, खूष सरकार म्हणुनी नि:शत्र केलें लोकांस, तुमची रक्षणचिंता आम्हांस, यास्तव आलो हिंदुस्थानास ।।

चौक २ रा

आगगाडी तारायंत्राला, गौरवर्णाला, पाहुनी लोक भुलला, म्हणे देवदूत आले देशास, आमचें रक्षण जणूं करण्यास, हायसें वाटलें त्यांचे जीवास ।। मानभावी कपटी बोलास स्वार्थी गोऱ्यास भुलुनि निखालस, विसरले सर्व स्वाभिमानास, पारतंत्र्याची चीड चित्तास, वाटेना गेलें पार विलयास ।। जसा यावा काळ्या-कड्यांतुन, खडक फोडून, झरा धांवून, दादाभाई आले तसे जन्मास, हिरा तळपला हिंदुस्थानास ज्यांनीं काँग्रेस आणली उदयास ।।

आठराशें पंच्यांशी सालाला, मुंबई शहराला अठ्ठाविस डिसेंबरला दादाभाईआदि पुढारि येईन, निशाण काँगेसचें त्यांनीं रोवून, धन्य झाले दादाभाई जन्मून ॥ चाल ॥ बंधु नये ऋषीचें कूळ, काँग्रेसचें आहे तसें मूळ । भांगेंत यावि जशि तुळस, इंग्रजांत ह्यूम सालस । स्थापन करण्या काँग्रेस, केली मदत दादाभाईस । बहात्तर लोक मुंबईस, स्थापन करण्या काँग्रेस । अध्यक्ष पहिल्या बैठकीत, निवडले उमेशचंद्रास । जसा शोभे चांद अस्मानास, उमेशचंद्र तसे बैठकीस ॥ चाल ॥ जशी गंगा आहे उगमास अतीशय लहान । काँग्रेस तशी आरंभीं झाली स्थापन । वाढत गेली जशी गंगा पुढें जोरानं । काँग्रेस पुढें वाढत चालली वेगानं । गंगा गेली मिळाया समुद्रासि प्रेमानं । काँग्रेस स्वातंत्र्याकडे चालली तोऱ्यानं । चळवळ नाव चालवा याच गंगेंतून । काँग्रेसरूपी गंगेंत करा हो स्नान , घ्या पवित्र गंगेमध्ये हात धुवून । मुक्तता तरिच होईल दास्य-पंकांतून ॥ (चाल मोडते) ॥ एकोणीसशें पांचपर्यंत, होते नेमस्त, काँग्रेस भरवीत नवयुगारंभ तेथपासून, बालरवि उदयाचली येऊन, तरुण जागृत तेज पाहून ॥

चौक ३ रा

टिळकासम कार्यक्षम वीर विलोकून, कीर्तिप्रभेनें दिपून, तरुण गेले हरकून, वाटे अंतरापासून, हा एक मार्ग दावील, देशास स्वराज्य देईल ॥ (चाल) ॥ टिळकांची ऐकुनी कीर्ति, उज्ज्वल कृति, तशीच देशभक्ति, तेजस्वी मूर्ति, वहावा म्हणती । जणुं पाणीदार मोती दाणा, टिळक शहाणा, चेतवी तरुणा, ऐकवुन त्यांना, स्वराज्य- कर्णा । टिळकासम पाहुनी हिरा, अष्टपैलु खरा, तेजस्वी तारा, दिपूनि गेला सारा, तरुण सभोंवरा । काँग्रेसचें रोपटें लावून, दादाभाईनं, वाढविलें छान, करिल परि कोण, तिचें रक्षण ॥

(चाल मोडते ) वृद्ध झाले दादाभाई जणुं पिकलें पान, कन्या कॉंग्रेस लहान, चिंता मनांत थैमान, चिंता जाळीं बलवान, पालनकर्ता शीलवान्, कोणी दिसेना महान्, उगवला तोंच तेजाळ, रवि टिळक शत्रूचा काळ ।। खवळून जातां स्फोटक, द्रव्यें पृथ्वीचे पोटांत, पोट फाडुनीयां त्यांत, होई भूकंप बेफाट, तशी चळवळ जोरांत, वंगभंग भर त्यांत, आली स्वदेशीची लाट, नोकरशाहिचें पोट फाडून, नोकरशाहि गेली हादरुन ।। कर्झन परी कायदा जारी करुनी तोऱ्यात, म्हणे वंगभंग लाट, दाबुन टाकिन क्षणांत करुन दडपशाही मात, मारुन जनमता लाथ, म्हणे तुम्हीं काय करणार हो, निःशस्त्र असेच मरणार ।। (चाल दांगड) ।। एकोणीसशें पाच सालाला, कर्झन साहेबाला, उमाळा आला, । बंगालची फाळणी करण्याला, हिंदु मुसलमान फोडण्याला, । वंगभंगाचा उपाय काढला, करायला कर्झन एक गेला । झाले परि भलते प्रसंगाला, वंगभंग करण्या सिद्ध झाला । तेजोभंग त्याचा परी झाला, अकरा सालीं स्वता बादशहाला । फाळणी रद्द करणें प्रसंग आला, कॉंग्रेसचा पहिला विजय झाला । कसा तें सांगतों या वेळेला, रुसो-जपान लढा सुरु झाला, जपान विजयानें जागृत झाला । काळचा-गोऱ्याचा लढा झाला, गोऱ्याला पार चित केला, स्वाभिमान हिंदुस्तानचा सगळा, फुंकर घालितां अग्नि फुलला । टिळकासम फुंकर घालण्याला, ज्वालामुखी जणुं जागृत झाला, तसा स्वाभिमान जागृत झाला, एक संस्कृती भाषावाला । एक रक्ताचे हो लोकाला, प्रांत बंगाल फोडण्याला । कर्झन जेव्हां पूर्ण तयार झाला, लाथाडून अर्जविनंत्याला । सारा बंगाल खवळुन गेला, दर्या जणु फार खवळुन गेला, समुद्र मंथनीं रत्न देवाला, जनसागरीं काय देशाला । मिळाले ऐका सांगतों तुम्हाला, देह देशार्थ अर्पण्याला, ।

तयार नररत्नें मिळालीं आम्हाला, स्वदेशीबहिष्कारशस्त्र हाताला, अचुक हा बाण मिळाला आम्हाला, शत्रुच्या मर्मी जाऊन बसला। कारण इंग्रज व्यापारी पडला, देशभर पुकारा याचा केला,। लाल बालपाल या वेळेला, दत्तात्रय अवतार जणु झाला। काँग्रेसचा भाग्यकाल आला, स्वदेशी पुकारा सर्वत्र केला,। वंगभंगाचा वणवा पेटला, तरुण खडबडुन जागृत झाला। हिंदु मुसलमान एक झाला। तिटकारा इंग्रजाचा आला, विदेशी कपड्याच्या होळ्या केल्या, क्रांतिकारक जन्मा आला। हरताळ सर्वत्र दिसू लागला, वंगभंग जोंवर नाहीं गेला॥ बहिष्कार ब्रिटिश मालाला, शपथा सर्वांनीं अशा घेतल्या, त्या वेळी दादा.॥ (चा. मो.)॥ जळिस्थळीं जसा कृष्ण कंसाच्या मनांत, तसा कर्झनच्या चित्तांत, दिसे टिळक कृतांत कृती टिळकांची अचाट, पाहुन चळवळीची लाट, भीती वाटे हृदयांत, उलथुनी राज्य टाकील, हा डोईजड खास होईल.॥

## चौक ४ था

पुष्पांनीं वृक्ष बहरला, तसा काँग्रेसला, तरुण गोळा झाला, आली काँग्रेस कलकत्याला, दादाभाई अध्यक्षस्थानाला, स्वराज्य ज्यांनी मंत्र बोलला॥ जरि होते ब्यायशी वर्षाचे, हृदय परी त्यांचें होते तरुणाचें, स्वराज्य घोषणा म्हणुनी कलकत्त्यास, दिसेल कां स्वराज्य माझे डोळ्यास, लागला ध्यास त्यांचे चित्तास॥ स्वराज्य हें ध्येय आमचें, सिद्ध करण्याचें, साधन साचे, स्वदेशी-बहिष्कार - राष्ट्रीय - शिक्षण, चतुःसूत्रीचें जाहीर घोषण, यानें देशांत झालें अंदोलन॥ आजवरी मवाळ झाला, मालक काँग्रेसला, त्याना कलकत्त्याला, स्वदेशी बहिष्कार नाहीं रुतला, झीज अंगास लागेल असला, मार्ग कां रुचतो मवाळाला॥ चाल,॥ सुरतेस

काँग्रेस आली, तेथें जहाल मवाळ बंडाळी । दादाभाईची स्वराज्य आरोळी गोखल्यांना पसंत न पडली । त्या ठरावाची खांडोळी, करण्यास मंडळी जमली । टिळकांनीं मख्वी ओळखिली, सुरतेस काँग्रेस उधळली । काँग्रेसची झाली चिरफळी, जहाल मवाळांची दुफळी । मवाळांची फजीती केली टिळकांची सरशी झाली ॥

(चाल २)

प्रतिपक्षी चीत करण्याची अजब हातोटी । सरकारी धोरणावरी केसरी पत्रीं । टिळकांची टीका फार कडक अशी ख्याती । त्यामुळें त्यांचेवर वळली सरकारची दुष्टी । पहिली सजा दीड वर्षाची परि न त्या खंती । येतांच सुटुन सुरु झाली यांची देशभक्ती । दिनरात देह झिजविला स्वदेशासाठीं । स्वदेशीची चळवळ केली टिळकांनीं मोठी । सार्वजनिक गणेश उत्सव संघटनेसाठीं । केसरी मराठा गर्जना करी महाराष्ट्रीं । स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क टिळकांची उक्ती । दारु पिकेटिंग चळवळ त्यांनीं केली मोठी । त्यांनीं केले यत्न राष्ट्रीय शिक्षणासाठीं । तरुणांचे रक्त सळसळलें स्वराज्यासाठीं । स्वातंत्र्यज्योत फुलविली अशी महाराष्ट्रीं ॥ (चाल मोडते) धरण्यास स्वराज्य धुरा, लाभला खरा, टिळकासम हिरा, म्हणुनी काँग्रेस पाऊल जोरांत वंगभंगाची चळवळ देशांत टिळकांची कीर्ती झाली जगतांत ॥

## चौक ५ वा

रोमरोमीं तेजस्वीपणा टिळकांचा बाणा, पाहुनी तरुण, येई चैतन्य त्यांचे रक्तांत, नको हें राज्य वाटे चित्तांत परी बोलण्या चोरी देशांत ॥ येतांच सूर्य उदयाला, तिमिर विलयाला, तसे देशाला टिळक देशाचे दास्य तिमिरास अहर्निश झटले दूर करण्यास, म्हणुनी वाटयांला त्यांच्या कारावास ॥ फितविती

टिळक तरुणाला, करी चळवळीला, त्यावरी खटला, राजद्रोहाचा सरकारनें केला, वाटावी दहशत लोकाला, सहा वर्षांच्या दिली सजेला ।। (चाल) ऐकुनी त्यांचे शिक्षेला, सारा देश फार हळहळला । चंद्राविण तारांगणाला नसे शोभा वद्य पक्षाला । जातांच टिळक तुरुंगाला, निस्तेज देश जाहला । तुरुंगांत जरी हा गेला, तरी नाहीं सुटत याचा चाळा। तिथें नाहीं स्वस्थ हा बसला, गीतारहस्य ग्रंथ काढिला । टिळकांच्या किर्तीमंदिराला, ग्रंथानें कळस चढविला। अनभिषिक्त राजा झाला, टिळक हा खरा देशाला । पुन्हा सुटून येतां देशाला, महायुद्ध वणवा पेटला। स्वराज्याचे हक्क मिळण्याला हा मोका चांगला आला ।। (चाल) काँग्रेस थंडावली होती सहा वर्षांत। येतांच टिळक मंडालेहून देशांत। चैतन्य येऊं लागलें पुन्हा तरुणांत । होमरूल चळवळ केली त्यांनीं जोरांत । बेझंट बाईनीं केली मदत चळवळींत । सुरतेचा सूर अद्याप होता देशांत। गोखले- टिळक हा वाद आला रंगात । मवाळ-जहालांचा हा वाद होता निश्चित। जहालांस वाटे काँग्रेस न्यावी जोरांत। मवाळांस वाटे काँग्रेस असावी ताब्यांत ।। (चाल मो.) सरकार आहे संकटांत, महायुद्धांत, मवाळ म्हणत, मागण्या मागून सरकारला त्रास, देऊं नये वाटे त्यांचे चित्तास, धडाडी कळली पूर्ण देशास ।।

चौक ६ वा

महायुद्ध संधि चांगली, म्हणे लाभली, बेझंटबाई भली, केली खटपट तिनें जोरांत, कराया समेट, जहाल मवाळांत तोंच गोखले गेले स्वर्गात, टिळकांनीं रात्रंदिन फिरुन, मोठ्या धडाडीनं आखिल हिंदुस्थान, होमरूल चळवळ केली जोरांत

अपूर्व स्वागत त्यांचे दौऱ्यांत, स्वराज्य बीज पेरलें लोकांत ॥ हिंदु मुसलमान एक केला, टिळकांनी लखनौला, म्हणून काँग्रेसला, भारतमंत्र्याचें पाचारण खास, स्वराज्यहक्क देतों तुम्हांस, तुमचें सहकार्य हवें आम्हांस ॥ (चाल) हिंदु मुसलमान मिळून, स्वराज्याची मागणी जोरान, असें संघटन पाहून, मांटेग्यू गेला घाबरुन । संकटीं होता म्हणून, इंग्रज आला धांवून । देतों स्वराज्य असें सांगून, चळवळ टाकली दाबून । संपतां युद्ध दारुण, गेलें वचन पार विसरुन । सुधारणा पोकळ देऊन, कशी केली पहा बोळवण ॥ (चाल) इंग्रजाकरितां युद्धांत वेचले प्राण । उपकार–फेड पहा कशी केली सरकारनं । रौलेट जुलमी कायदा बक्षीस म्हणून । यांतच भरतिला खिलाफत प्रकरण, पकडितां अल्लीबंधुना चेतले मुसलमान । गांधींनीं याच्या निषेधार्थ चळवळ जोरानं । सत्याग्रह शत्र हें काढलें अजब शोधून । काँग्रेसला सत्य अहिंसेचा मार्ग दावून । लाविले महात्माजींनी निराळें वळण । यामुळें पुढें काँग्रेसचे तेच झाले धुरिण । आसेतु हिमाचल केलें रौलेट प्रकरण । आगींत तेलासम झाले पंजाब प्रकरण । येईल पुढें सविस्तर त्याचें वर्णन । थप्पड एका हातानें अशी मारुन । सुधारणारुपी हातानें गाल चोळून । सरकारी वृत्ति अशी नेहमीं येते दिसून । भेदनीति यामुळें त्याची जाते साधुन ॥

(चा. मो.) पितापुत्र नेहरु लालाजी, पंडित मालवीयजी, दास पटेलजी, शोभे गांधीस प्रभावळ खास, ग्रहमाला जशी शोभे सूर्यास गांधीयुग सुरु झालें समयास. ॥

## चौक ७ वा

ठेवुनी हात स्वातंत्र्य–देविपदकमला, स्वातंत्र्य प्रतिज्ञा करुनि

नित्य कार्याला, कसुनिया कास देशार्थ फकिर जो झाला, जयाचा देव सखा बनला ।। (चाल) ज्याचि कीर्ति गाजे जगतांत, भरतखंडांत, साधुसंतांत, गांधी जाहले पूर्ण विख्यात, वंद्य जे झाले सकळ लोकांत, महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ।। पाहुनी हाल दीनांचे, कळवळें साचे, हृदय गांधिचें, हिंदीचें दुःख दूर करण्यांत, हाल सोशिले आफ्रिका खंडांत, महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ।। तन मन धन अर्पुनी, लंगोटी लावोनी, फकिर होवोनी, देशस्वातंत्र्य एक चित्तांत, ध्यास लागला ज्यास दिनरात, महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ।। परस्त्रीस माता समजोनी, विलास सोडोनी, इंद्रिय दमनीं, मिळवुनी विजय, जाहले ख्यात ऐन तारुण्य बहर कालांत, महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ।। (चाल) समजोनी बहिण स्वस्त्रीला, मारिली लाथ सौख्याला । अवघड विश्वामित्राला तो विषयपाश तोडिला । दोन तपें ब्रम्हचर्याला, पाहुनी विरक्त झाला । वैराग्य असें जगताला, पाहुनी अचंबा वाटला ।। (चाल) वैराग्य लाभलें श्रीरामासम ज्याला । रामासम वाटे गांधि शांतिचा पुतळा । एकपत्नी वचनि एक बाणी या त्रिगुणाला, पाहुनी गांधिजीपाशी त्रिगुण जगताला । श्रीराम जणु कलियुगीं वाटे अवतरला । नेसुनी वल्कलें राम निघाले वनाला । नेसुनी खादि गांधिजी गेले आफ्रिकेला । त्यानें सीतादेवि यानें कस्तुरिबाई जोडिला । मारुनी लाथ राज्याला राम नीघाला । सोडुनी पाणी वैभवावरी हा गेला । वनवास चौदा वर्षांचा त्यानें भोगिला । आफ्रिका त्रास यानें चौदा वर्षें सोशिला । वानरें साह्य त्या, सत्याग्रहि वश याला । त्यानें लंकापति यानें लंडनपती हलविला ।।

।।(चा. मो.)।। हिंदीचे हाल पाहोनी, गेले धावोनी सत्याग्रह

करुनी, केलें रक्षण अफ्रिकाखंडांत, गर्व गोऱ्यांचा जिरविला त्यांत, महात्मा म्हणुनि त्यास म्हणतात ।।

चौक ८ वा

रौलेट बिलचा वरवंटा, सत्याग्रह सोटा, दावुनी मोठा, गांधीनीं दूर पळविले त्यास, जागृत केले हिंदुस्तानास, बनविले सहनशील लोकास ।। शस्त्रास्त्र ज्यांचे हातांत, त्यावर मात, हिंदुस्तानांत, शस्त्राविण गांधी कसे करणार, शठंप्रति सत्य विजयी होणार, इंग्रजा माघार घ्यावी लागणार ।। हरताळ सर्वत्र देशांत, पडला कडकडित, चळवळ जोरांत, पाहुनी क्रुद्ध झाले सरकार, दिल्ली शहरांत केला गोळीबार, तिकडे गांधीजी गेले सत्वर ।। (चाल) गांधीजी तेथे जातात, पकडिले त्यांस इतक्यांत । खळबळ झाली जोरांत, रौलेट बिल निषेधार्थ । भीति पडली सरकारांत सोडिले गांधी मुंबईत । सरकार पडले पेचांत, पाहुनी सत्याग्रह शस्त्र । शांतताभंग सदरांत, गोळीबार पुन्हा दिल्लींत ।। (चाल) स्वामि श्रद्धानंद दिल्लींत, चालले होते शिस्तींत । गोळीबार झाला इतक्यांत, स्वामिचा घात करण्याचा हेतु हृदयांत ।। स्वामिचा सवाल शिपायांस, कारण काय गोळिबारास । ऐकुनी सवाल म्हणे त्यास, आले रागास । छेद देंगे तुमकू म्हणे त्यास । छातीचा करुनिया कोट, दावुनी धैर्य आलोट । मै खडा सामने ताठ, म्हणे मुझे काट । आला गोरा तेथ इतक्यांत । रोखिल्या हुकुमावांचून, बंदुका त्यांनीं दडपून । शिपायाच्या गळल्या हातून, गोरा पाहून । अशी फजीती तेथे स्वामीन ।।

(चा. मो.) गांधींनीं साह्य करुनिया महायुद्धांत, इंग्रजा दिला मिळवून विजय हो त्यांत, पाजुनी दूध पोशिला सर्प गृहांत, तो सर्प

जसा घे प्राण तसे शिरकाण, करुनी देशाची केली धूळधाण ।।

(कटाव ३ दांगड) जालियनवाला बागेचें, केलें रक्ताचें, अंगण साचें, कत्तलिचा असा नाहीं दाखला, कलंक हा इंग्रजी राज्याला, सांगतो एका प्रसंगाला। जालियनवाला बाग केला, पिंजरा लोकांना कोंडण्याला, वाघापरि ठार मारण्याला, वीस हजार लोक सभेला, विमान घारिपरि हो घिरटयाला, घालुं लागलें त्या समयाला। हत्यारबंद शिपाई दाराला, पाहुन गर्भगळित लोक झाला । भीती आहे जिवाचि प्रत्येकाला, भितीवरुन चढुन जाऊं लागला । जाऊं नाहीं दिले परि कोणाला, वाघ जणु पिंजऱ्यात सापडला । तसा सारा लोक कोंडला गेला, गोळिबार त्यांनी सुरु केला । मुंग्यापरि लोक ठार झाला, रक्ताचा चिखल जिमिनिला । अगणित लोक ठार केला, इतक्यामधं दारुगोळा संपला । नाहीं तर आणखि कांहीं स्वर्गाला, पाठविण्याची इच्छा होती डायरला। कांही लोक लोळुन जमिनीला, वांचवूं पाहति प्राणाला । असें पाहुन हुकुम झाला, गुडघे टेकून जमिनीला, ठार तुम्ही करा निजलेल्याला । प्रेतांचा ढीग तेथें झाला । काय वर्णावें प्रसंगाला सांगा तुम्ही दादा ।।

(चा. मो.) जालियनवाला बागेंत, केला गोळिबार, मुंग्यापरि करुनिया कैक लोकांना ठार, डोळ्याची धुंदी परि नाहीं उतरली पार, रावरंक सारे सरसकट, जाण्या फरफटत, पोटानें सरपटत, लावी सरकार। उपकारफेड ज्यानें केली करुनी अपकार, राक्षसी अशी डायर कृत्यें करणार, सरकार त्यास पेन्शन देण्यांस तयार, पाहुनी अमानुष छळा, गांधि खवळला, पुकारा केला, दुष्ट सरकार ।।

चौक ९ वा

एकोणीसशें वीस सालाला, ऑगस्ट पहिलिला, घात जवा झाला, कालानें नेले बाळ टिळकास. मायभूमीच्या भाल टिळकास, पुसुनि दुर्दैव तिच्या वाट्यास । मायभूमि ढाळी अश्रुला, दास्यशृंखला, तोडणारा गेला, म्हणे मम दया माझे पुत्रास, येति का कोणा सदय हृदयास, तोंच तापले गांधि समयास, असहकार त्यांनी पुकारुन, देश हालवुन जागृती करुन, दुःख मायभूचें कमी करण्यास, पारतंत्र्याचे पाश तोडण्यास, तुरंगवासाचा सोशिला त्रास ।

(कटाव २) असहकार कर्णा फुंकिला, त्याचा नाद देशभर झाला, खडबडून जागृत केला, जणु सिंह खायला उठला, इंग्रजा बहिष्कार घाला, नका जाऊं त्याच्या कोर्टाला, सोडा त्याच्या शाळा-कॉलिजाला, करु नका त्याचे नोकरिला कौंसिला बहिष्कार घाला, नका घेऊं त्याच्या पदवीला, नका शिवूं विदेशी मालाला, सर्वांग बहिष्कार घाला ।।

(चाल २) एक कोटी एक महिन्यांत फंड जमविला । खादिचा धंदा त्यातुनी त्यांनीं सुरु केला । जिकडे पहावे तिकडे पाहुनी गांधिटोपिवाला । क्रोधाग्नी नोकरशाहीचा त्यानें भडकला । मुस्काटदाबी कैक लोकांची केलि त्या काला । गोऱ्यांच्या पोटाला चिमटा खादिनें बसला । पकडिले त्यानें त्या वेळीं म्हणुनि गांधिला । कांही वेळ ढगाच्या आड सूर्य जाहला । कारागृह एक वर्षात त्यांचा संपला । जातांच ढग बाजुला, सूर्य तळपला । भगवान् कृष्ण गोकुळीं जसा जन्मला । मोहन गांधि हो तसे हिंदुस्तानाला, कंसाच्या कैदखान्यांत कृष्ण जन्मला, इंग्रजाचा जेल पुरणार याचे

जन्माला । मोहनी त्यानें गोकुळा, यानें भारताला । कृष्णानें सुदर्शनानें कंसवध केला । याचे चर्खाचक्र मारिते म्यांचेस्टरवाला, लक्ष्मी सदा सेविते त्याचे चरणाला । धावते लक्ष्मी याचे मागें सदा कार्याला । अर्जुना गीता सांगुनी निर्भय केला । शिकवुनी अहिंसा यानें धीट देश केला । त्यानें कौरवाशि युद्धार्थ अर्जुन सिद्ध केला । यानें देश केला तयार कायदेभंगाला ।।

(चा. मो.) असहकार काळ संपला, पुढें हो चला, कायदे भंगाला । मुंबईकर ज्यामधें ख्यात, ज्यांनीं केलि इंग्रजावर मात, त्याचें वर्णन पुढिल चौकांत ।।

## चौक १० वा

सायमन कमिशन नेमून केला अपमान, घेतला लाठी मारुन लालाजिचा प्राण, पाहुनी झाला जागृत देश अभिमान, स्वातंत्र्य ध्येय जाहीर, करण्या अधीर, तरुण तयार करण्या बलिदान ।।

(चाल) कलकत्ता कॉंग्रेस आली, अठ्ठाविस सालीं, वैभवशाली, पाहुनी दिपली, राजे मंडळी, अध्यक्ष मोतीलाल स्वारी, शोभे रथावरीं त्यांची ललकारी, सेना सागरीं, सुभाषचंद्र करी । गर्जना ऐकुनी अंबरीं, देव सत्वरी, पुष्पवृष्टी करी । अध्यक्षांवरी धन्य खरोखरी सायमनचें इकडे आगमन, परि न त्या मान, सप्तग्रह म्हणुन । काळीं निशाणें दावुन, अपमान । गांधीनीं नेहरु-योजना करुनि, भाषणा ऐकूनी, सर्वांना । मान्य योजना झाली त्या क्षणा । योजना धाडुन सरकारला, एक वर्ष दिला, काल इंग्रजाला । विचार करण्याला काल संपला ।

(कटाव, दांगड) जसा कृष्ण भगवान् गेला, शिष्टाई करण्याला दुर्योधनाला। सामोपचारानें वळविण्याला, धर्माची बाजू मांडण्याला हिताची गोष्ट सांगण्याला, दुर्योधन ऐका काय बोलला, माती जेवढी सुईच्या अग्राला, नाहीं देणार पांडवाला। पांच गांवांची गोष्ट कशाला। कपटानें घेऊन राज्याला। दुर्योधन मस्त फार झाला। दुरुत्तर भगवानाला बोलला, बुडत्याचा पाय खोलाला, गर्व जसा त्याचा हरण झाला। थेट तसा प्रसंग झाला, कृष्णापरि शिष्टाई करण्याला। गांधी गेले व्हाइसरायच्या भेटीला। गांधी म्हणे व्हाइसरसाहेबाला। एक वर्षाचा काळ संपला। सरकार काय तयार देण्याला?। नेहरु रिपोर्ट मान्य का तुम्हांला?। सरकार चा इचार काय झाला। सायबानं दिलं उत्तराला। तयार नाहीं वचन मी देण्याला। अजुन नाहीं इचार पुरता झाला। केव्हांच नाहीं होणार विचार असला। गांधी गेले लाहोर कॉंग्रेसला झटक्यान दादा ॥

जवाहिर अध्यक्ष लाहोरला, पुकारा केला, स्वातंत्र्यध्येयाला। एकोणीसशें तीस आरंभाला, जानेवारी सहवीस तारखेला। स्वातंत्र्याचा जाहिरनामा वाचला। जागृत सारा देश झाला। गांधी म्हणे कायदेभंगाला, सुरु करणार याच काला। कायद्याचि भीती लोकाला, कोणी म्हणे थांबा या वेळेला। गांधी म्हणे भिऊं नका कायद्याला, भिऊ नका मुळींच तुरुंगाला। वाघाचे बच्चे प्रसंगाला, भिउनी पळतात का संकटाला। वाघ असुनि का शेळी बनला, आरसा इतिहासाचा डोळ्याला। दिसत का नाहीं तुम्हांला, त्यांत पहा शूर पूर्वजाला। त्यांत पहा शिवाजी राजाला। पारतंत्र्यांत राहण्याला, लाज कशी नाहीं चित्ताला, काळिमा

पूर्वज कीर्तिला । हातीं घ्या सत्याग्रहशस्त्राला सविनय कायदेभंगाला । तयार व्हा त्वरितच कार्याला आज तुम्ही दादा ।।

(चाल) सविनय कायदेभंगाचा जन्मसिद्ध हक्क हा साचा । पाठिबा ज्याला सत्याचा, विजय हो त्याचा । सिद्धांत सर्व धर्माचा । मीठ कायदाभंग करण्याला । गांधी निघाले मार्च बाराला । सत्याग्रही ऐंशी लोकाला, घेऊन मदतीला । चालत गेले दांडिला ।। लोटले लोक बघण्याला, उधळती फुले पैशाला । धन नको लोक या काला, पाहिजे मजला । असें सांगून कायदा तोडला ।। शस्त्रासि टक्कर देण्याला, शस्त्रहीन सिद्ध कसा झाला । परदेश लोक लोटला, युद्ध पहाण्याला, आश्चर्य वाटे जगताला ।।

(चाल २) एकनाथ, प्रल्हाद, तुकाराम या कसोटीला । उतरुन झाले जर विजयी त्या प्रसंगाला । सामुदायिक रीतीनें तसें, सोसुं कष्टाला । सोसुनि हाल देशार्थ, मिळवुं विजयाला । उतरले सर्व सत्याग्रहि, या कसोटीला । करणार म्हणे गांधिजी, मिठागरीं हल्ला । करुं गोळिबार जर कराल, मिठागरीं हल्ला । प्राणाचि पर्वा देशार्थ नाहीं हो ज्याला । तो भिईल काय, सरकारी गोळिबाराला ! । सत्याग्रही कैक तयार हल्ला करण्याला सरकारनें असें पाहून पकडले गांधिला ।।

(चाल बदलून) सेनापति गांधि गेले तुरुंगाच्या दारांत, कायदेभंगाची सुरवात, केली चळवळ जोरांत, परि सरकार तोऱ्यांत, म्हणे गोळिबार चहुंकडे, ठार करुं जशीं माकडें । माकड-साह्यें श्रीरामाने, रावण केला ठार, मस्त झाला होता फार। गेला रसातळा पार, असे मी मी म्हणणार, गेले कैक मृत्युपंथास, इंग्रज जाईल खास ।। लावणागिरी, करुनि स्वारी, घेऊं या हातांत,

झेंडा लावोनिया त्यांत, करुं इंग्रजावर मात। शंका नको अंतरांत, एकजूट करुनि सत्वरी, केला हल्ला शिरोड्यावरी ॥

(चाल) पेशावरला केला गोळिबार, राक्षसी असे सरकार, लोकांत अनत्याचार, बाणला फार। घेतल्या गोळया छातीवर ॥ सोलापुरीं गोळी बार करुन, दिसला तो ठार मारुन, लष्करी कायदा पुकारुन, घेतले छळुन, बंद व्हावी चळवळ म्हणुन ॥ मुंबईत रोज लाठिमार, खाण्यास लोक तयार, चिळकांड्या उडति भराभर, रक्ताचा पूर, निर्दयी असे सरकार ॥

कटाव ४– शिस्त पांडवासम पाळाया, देश सर्व हा तयार झाला, झेन्डावंदन करावयाला, स्वयंसेविका जमल्या अबला। आझाद–मैदानावरतीं आल्या, राष्ट्रीय झेंडा त्यांनीं रोविला, सरकारनें लाठीवाला, पोलिस ताफा आंत सोडिला। केला स्त्रिया-वर लाठिहल्ला, स्त्रिया गरोदर कितीक पडल्या। डोक्यावरती जखमा झाल्या, रक्ताचा तो चिखल झाला। एका सुंदरशा तरुणीला, दुःशासनानें जशी कृष्णेला। सार्जंटानें कृष्णकुमारिला, लाठी मारुनि तिजवर हल्ला। करुनी जखमी केलें तिजला। ऐका सरकारच्या लीला। कितीक वर्णू मी या काला। घ्या ध्यानिं तयांचे मर्म विनती तुम्हांला ॥

चाल मो.– मस्त हत्ती खाति जेव्हां अंकुशाचा मार, मस्ती उतरते पार। तसे इंग्रज सरकार, ज्यांचा जीवनव्यापार, मुंबईनें केला ठार। नाक दाबुन तोंड उघडिलें समेटाचें बोलणें सुरुं केलें ॥

चाल– ऐशि हजार लोक तुरुंगांत कायदेभंगांत। लाखोनी लाठिमार खाल्ला याच युद्धांत। तसा गोळिबार चहुंकडे सर्व

देशांत । सरकारी लाठि गोळिबार तुरुंग हीं शस्त्रं । जाहली सर्व बोथट शस्त्रविहिनांत । जाहला सत्य अहिंसेचा मार्ग हो श्रेष्ठ । राष्ट्राचा दर्जा वाढला सर्व जगतांत । पांडवासारखी शिस्त दिसली देशांत । देशार्थ त्याग ही वृत्ती बाणली त्यांत । याचें श्रेय सर्व गांधिना आहे निश्चित । गांधिजी होते बिनमुदत जरी तुरुंगांत । सोडिले त्यांना बिनशर्त करण्या वाटाघाट । अर्धनग्न फकीर समेटास राजवाड्यांत । वैभवशालि व्हाइसरॉय करण्या स्वागत । हें दृष्य अपूर्व वाटे सर्व जगतांत । आदर गांधिविषयीं वाढला यानें जगतांत । होऊनी समेट जाहली काँग्रेस ख्यात । बहुतेक सर्व सत्याग्रही झाले मुक्त । आनंदी आनंद झाला सर्व देशांत ।।

चाल मो.– कराचीची काँग्रेस भरली समेटानंतर, गांधि आर्विन पॅक्टावर, करण्या काँग्रेसची मोहोर, असा उत्सवाचा भर, तोंच दुःखाचा सागर, भगतसिंग फासावर, असा वीर, खरोखर झाला नाहीं आजवर, त्याचे अभिनंदनपर, गांधिनीं ठराव मांडला, त्यांचा कंठ दाटुनीं आला ।।

## चौक १२ वा

समेटाची शाई वाळली नाहीं इतक्यांत, त्याचा भंग करण्यांत, घाई झाली सरकारांत, जुलूम सारावसुलांत, पाहुन गांधी म्हणतात, चौकशी याची करण्यास, नेमावी पंचायत खास ।। नोकरशाही तयार नाहीं चौकशी करण्यास, पाहुन गांधी व्हाइसरायास, म्हणे राऊंड टेबलास, घालुं बहिष्कार खास, कळलें इंग्लंड सरकारास, त्यांचा हुकुम व्हाइसरायास, करा मान्य गांधी तत्त्वास, पाठवा त्यांना इंग्लंडास ।। मान्य होतां सरकाराला चौकशीची अट, गेले

मुंबई शहरांत ।। गर्दी झाली आटोकाट, जनसमूह अफाट, असा स्वागताचा थाट, जणुं देशाचा सम्राट, जसा वामन गेला बळि-कडे, तसे गांधी इंग्रजाकडे ।।

चाल– वामन गेला जसा बळिकडे तसे महात्मा गांधी। इंग्रज राजाकडे चालले करण्याला संधी। दर्भ हातीं कटि लंगोटीचा वामनाचा थाट। टकळी हातीं कटी लंगोटी मोहनाचा थाट। सर्व शक्ति देवांनीं दिधल्या बटु वामनास। पसतीस कोटी जनांची शक्ति लाभली गांधीस। त्रिपाद भूमीदान मागण्या गेला वामन। स्वातंत्र्याचें हक्क मागण्या गेला मोहन। बळी लागला उदक सोडण्या त्याच्या हातांत। उदक पडेना म्हणुनी पाहतो वामन झारींत। शुक्राचार्य बैसले पाहुनी घेऊनि दर्भांकुर। त्याचा डोळा फोडुन पाडले उदक हातीं झरझर। शुक्राचार्यासम येईल जो जो स्वातंत्र्याआड। गांधी हातीं टकळी घेउनि मोडतील खोड। वामनमूर्ति थोर कीर्ती त्यांची जगतांत। उक्ती कृतीचा मेळ दाविती जे आचरणांत।

चाल मो.– धैर्य सत्य अहिंसेचा तिरंगी विख्यात झेंडा घेउनि हातांत। गांधी गेले इंग्लंडांत, लंडन राउंड टेबलांत, केली खटपट जोरांत। परि भेद करण्यांत सरकार असे पटाईत, तें काय त्यांना वठणार, मुसलमान फोडिले पार ।।

### चौक १३ वा

गांधींनी स्वराज्य-घोषणा केली लंडना, यत्न केले नाना, कृष्ण शिष्टाई परि जशी फोल, वाऱ्यावर गेले गांधीचे बोल, मागुन कोण देइ राज्य बहुमोल ।। अर्धनग्न फकिर गांधींना, करुनी सन्मानां,

बादशाही खाना, अपूर्व हा योग आहे खरोखर, परि येताच स्वदेशावर, राजद्रोही म्हणून केलें गिरफदार ।। येनांच परत हिंदुस्तानां दिसले गांधींना, जवाहिरलालांना, पकडुनी केला समेट भंग, काँग्रेस दडपून टाकण्याचा चंग, म्हणुनि सुरु झाला पुन्हा कायदेभंग ।।

चाल– तात्काळ महात्मा गांधींना पकडिलें, कैक पुढाऱ्यांना अबदूल गफूर खाना, पकडिलें सुभाषबाबूंना । पकडिलें कस्तुर-बांईना, तसे सरोजिनीबांईना । मांगा सम हजेऱ्या कोणा, स्थान बद्ध केलें कैकांना । सत्याग्रही लाख लोकांना, घातले जेलमधे त्यांना ।

चाल– जातीय निवाडा गांधीना, तुरुंगांत वाचुनी त्यांना । हृदयास होती वेदना, त्यांनीं त्या क्षणा, केलें प्राणांतिक उपोषणा ।। शरीराच्या जणु अवयवांना (भागांना) वेगळे करणें मूर्खपणा । परि वेगळे केले अस्पृश्यांना, भेद साधला ना, हा कावा उमजे गांधिना । आत्मीक बल गांधिना, वचकलें सरकार त्यांना । मोकळें केलें गांधिना निवाडा बदलण्या, असा विजय त्यांचा झालाना ।

चाल २– कायदेभंग पुढे तहकूब गांधिनीं केला । मुंबईस भरली काँग्रेस चौतीस सालाला । काँग्रेसनें दिली मान्यता कौन्सिल प्रवेशाला । अन्सारी झाले अध्यक्ष कोन्सिल बोर्डाला । शांतता-कालीं विधायक कार्य देशाला । करण्यास लावी गांधिजी तसें या काला । ग्रामोद्योग संघ गांधिनीं स्थापन केला । काँग्रेसनें मान्यता दिली याच कार्याला । खेड्याची जनता यामुळें मिळेल काँग्रेसला । भीति अशी वाटुं लागली आहे सरकारला । गमक हें

खरे काँग्रेसच्या भरिव कार्याला । असेंब्लिचा विजय पाहुनी धक्का सरकारला । काँग्रेसचा जिवंतपणा भोवे सरकारला । काँग्रेसनें नविन सुधारणा पार फेटाळल्या । हर घडीं पराभव असेंब्लींत सरकारला ।।

चाल– काँग्रेसनिष्ठा राष्ट्रांत, वृद्ध तरुणांत, गरिब श्रीमंतांत । त्याग देशार्थ करण्या झटतात ।। काँग्रेस भीत नाही कुणा तेजस्वी बाणा, बाळकडु तरुणा । तयार करी त्यांना स्वातंत्र्य रणा । सेनगुप्त विठ्ठलभाई, स्वराज्यापायीं, मृत्युमुखीं जाई । कैक असे भाई गणति त्याची नाही ।। काँग्रेस झेन्डा घेउनी, कर्णा फुंकुनी, स्वातंत्र्य ध्वनी । ऐकवुनी कानीं, जागृती आणि । पाहुनी चाँद अस्मानाला, भरती समुद्राला, तसा जनतेला, प्रेमभर आला पाहुनी काँग्रेसला ।। कृष्णाची ऐकुनी मुरली, राधा जणु भुलली, स्वातंत्र्य मुरली । काँग्रेसनें फुंकिली, जनता तशी भुलली ।।

चाल– काँग्रेस केले सरकार, राष्ट्राला प्यार, गांधिनी सत्वर, हुकुम काँग्रेस जो जो करणार, तो तो पाळण्याचा करा निर्धार, तरिच स्वातंत्र्य हातीं येणार । आत्माराम तनय शाहिरास स्फूर्ति पोवाड्यास । ज्युबिलीप्रसंगास, काँग्रेसचा भक्त म्हणुनी ये खास स्वातंत्र्य ध्येय तिचे देशास, जसे अमृत वाटे देवास ।।

श्री. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र 235/9
मंत्रालय.